# शब्दाई
## 'ग्रामीण कथा' विशेषांक
२०२१ -२०२२

कामधेनू सेवाभावी संस्थेचे,

# वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
## कला, विज्ञान व वाणिज्य
ता.अंबाजोगाई,जि.बीड-४३१५१९


**Email** : principalvcg@rediffmail.com
**Website** : www.vasundharacollege.org.in
**Facebook** : vasundharacollege2000@gmail.com
**Youtube** : Creative Vasundhara
**Instagram** : Vasundhara college
**WhatsApp** : **9421342148**
**Cell** : **9822898727**


संपादक

**प्राचार्य, डॉ. अरुण दळवे**

सहसंपादक

**उपप्राचार्य, डॉ.अर्जुन मोरे**

कार्यकारी संपादक

**प्रा.डॉ.संजय खाडप**
**प्रा.मकरंद जोगदंड**
**प्रा.डॉ.बायजा कोटुळे**
**प्रा.डॉ.गजानन सवणे**
**प्रा.नरसिंग उदार**
**श्री.प्रशांत देशमुख**

विद्यार्थी संपादक : कु.गायत्री बोधने

# शब्दाई

**'ग्रामीण कथा' विशेषांक**
**२०२१-२२**


**प्रकाशन :** जानेवारी २०२३

**प्रकाशक :**
**प्राचार्य,डॉ.अरुण दळवे**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

**मुद्रक :**
**जीत प्रकाशन**
विठ्ठल-रूक्मिणी चौक,
आनंद नगर,अंबाजोगाई
मो.९४२२३७७९७२



**© सर्व हक्क संपादकाच्या स्वाधीन**



**अक्षर जुळवणी :** गिरी आर्टस्,अंबाजोगाई
मो.९८८१८८२२२०

**मुखपृष्ठ रेखाटन:** संजय गिरी,अंबाजोगाई

साहित्य संकलन :
डॉ.संजय खाडप, मो.९८२२०३६१७६
प्रा.नरसिंग उदार, मो.९४२१३४७८१४


टीप : 'शब्दाई' या विशेषांकातील सर्व मजकूर संबंधित व्यक्तिचा असून, त्या मजकुराशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.



# संस्थापक सचिवांचे मनोगत

'जनसेवा हीच ईश्वरसेवा' या उक्तीप्रमाणेच विद्यार्थी, पालक, सेवाभाव जपणाऱ्या संस्था, संघटना या सर्वांना हितावह ठरणाऱ्या उद्दिष्टांना केंद्रभागी ठेवूनच कामधेनू सेवाभावी संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेने निश्चित केलेल्या उद्दिष्टांना मूर्त रूप देण्याचे मौल्यवान कार्य गेल्या बावीस वर्षापासून वसुंधरा महाविद्यालयाच्या माध्यमातून अविरतपणे सुरूच आहे.काळ, वेळ आणि परिस्थिती यांचा सुरेख संगम साधून वेळीच प्रगतीची दिशा शोधण्यामध्ये महाविद्यालय सतत अग्रेसर असते. महाविद्यालयामधील विद्यार्थी व समाजकेंद्रित असणारी नवनवीन उपक्रम महाविद्यालयाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जात आहेत. म्हणून हे महाविद्यालय ग्रामीण भागासाठी सर्वांगीण दीपस्तंभ बनले आहे. याचा मला अभिमान व आनंद आहे.आजची पिढी ही अत्यंत संवेदनशील असून त्यांची आकलन शक्ती अतिशय प्रभावी आहे.म्हणूनच विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठीची उपक्रमशीलता महाविद्यालयाने जपावी, म्हणून संस्था नेहमीच महाविद्यालयाच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते व यापुढेही उभे राहील. वसुंधरा महाविद्यालयामध्ये कार्यरत असणारे सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांच्या आचार विचारांमधील सकारात्मकता, आशावाद या बाबी मुलांना जगण्याचे बळ देतात. असे म्हटले जाते की, प्राध्यापकांनी सुपर असावे तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा सुपर विद्यार्थी व्हावे, यावरच नेहमी संस्था व महाविद्यालयाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात येतो. आजचा विद्यार्थी उद्याचा आदर्श नागरिक घडणार असून, ते देशाचे भवितव्य ठरविणार आहेत. मुलांचे दडपण कमी होण्यासाठी व आनंददायी शिक्षण घेण्यासाठी महाविद्यालयातील संपूर्ण घटक, वर्गातील वातावरण प्रेरक करण्यामध्ये तरबेज बनले आहेत. कथा या शीर्षकाखाली प्रकाशित होणाऱ्या महाविद्यालयाच्या 'शब्दाई' विशेषांकामधून मिळणारा जीवनाचा आनंद हा प्रत्येक वाचकांसाठी फार मोठा वैचारिक ठेवा असून, तणाव मुक्त जीवन जगण्यासाठी सुसंस्कारित करणारा दीपस्तंभआहे. ग्रामीण वास्तवाचे चित्रण या कथा विशेषांकातून मोठ्या प्रमाणात होणार आहे. ग्रामीण कथांचा प्रवाह नेहमीच तेवत राहावा व सर्वांना आपल्या जीवनातील परमोच्च आनंद कळण्यासाठी हा विशेषांक प्रेरणादायी ठरेल...! अशा या सर्वांसाठी वैचारिकतेचा महामेरू असलेल्या महाविद्यालयाच्या शब्दाई विशेषांकास माझ्या अंतकरण पूर्वक शुभेच्छा..!

**मा.गोविंद बालासाहेब देशमुख**
संस्थापक सचिव,
कामधेनू सेवाभावी संस्था,घाटनांदूर

## प्राचार्यांचे मनोगत

सन २०२१-२०२२ या वर्षाचा 'शब्दाई' हा वसुंधरा महाविद्यालयाचा कथा या शीर्षकाखाली प्रकाशित होणाऱ्या प्रेरणादायी विशेषांकास आपल्या कवेत सामावताना मनस्वी आनंद होतो आहे. कथा, मनोरंजन करते, कथा वाचताना वाचकाला अंतकरणातून आनंद देते, वाचक स्वतः कथेतील पात्राच्या विश्वात कधी विरून जातो ते त्याला समजत नाही. वास्तवातील ताण-तणावापासून कथा वाचक व्यक्ती काही काळासाठी दूर राहतो. कथेच्या माध्यमातून सुसंस्कारित पिढी निर्माण होते. हेच सर्वांना दाखवून देण्यासाठी वसुंधरा महाविद्यालयाचा 'शब्दाई' हा विशेषांक घाटनांदूर व परिसरातील नामांकित कथाकारांच्या कथा शब्दबद्ध करून प्रकाशित करत आहोत. तणाव मुक्त जीवन व जीवनातील आनंदाचा ठेवा म्हणजे कथा.

या कथांच्या अध्ययनामुळे विसरून जाल, आपापल्या जीवनातील दुःखमय व्यथा कथेतील घटना,प्रसंगातून, वागण्या, बोलण्यातून चांगल्या वाईट मूल्यांचे दर्शन घडते. कथेमध्ये चांगल्या व वाईट मूल्यांच्या संघर्षात चांगल्या मूल्यांचा विजय दाखवलेला असतो.या संघर्ष दर्शनाने वाचकास मोठी प्रेरणा व स्फूर्ती मिळत असते. हीच प्रेरणा व स्फूर्ती वाचकांच्या अर्थात विद्यार्थ्यांच्या मनात सतत तेवत राहावी, याच उद्देशाने प्रेरणादायी कथा 'शब्दाई' या विशेषांकात शब्दबद्ध केल्या आहेत. महाविद्यालयाच्या यशोगाथेचे चक्र अविरतपणे सुरू ठेवणारे महाविद्यालयातील नवनवीन उपक्रम हे विद्यार्थ्यांमध्ये अंगभूत कौशल्य निर्माण करणारी ऊर्जा केंद्र ठरत आहेत. याचा मला सार्थ अभिमान आहे .संगणकीकृत ग्रंथालय,इंटरनेट सेवा,सुसज्ज क्रीडा विभाग, स्पर्धा परीक्षा केंद्र, सांस्कृतिक विभाग,महिला तक्रार निवारण समिती, कमवा व शिका योजना, खुले लोककला महोत्सव, विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणारी कोर्सेस,वक्तृत्व- वादविवाद स्पर्धा समिती, स्नेह संमेलनामध्ये गरीब व होतकरू मुलींच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन, माजी विद्यार्थी संघटना अशा विविध उपक्रमांच्या सहभागातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील मोठ-मोठी पदे प्राप्त करून यशाची गरुड झेप घेतली आहे व महाविद्यालयाचे नावलौकिक केले आहे. नैतिकतेला प्राधान्य देऊन सामाजिक बांधिलकीची विद्यार्थ्यांमध्ये नाळ घट्ट करून एक जबाबदार नागरिक घडविण्यामध्ये महाविद्यालयातील सर्व घटक नेहमीच अविरतपणे परिश्रम घेत असतात. महाविद्यालयाच्या यशामध्ये माजी विद्यार्थी व पालक यांचाही अतिशय मोलाचा वाटा आहे. आतापर्यंत आपण केलेल्या सहकार्याची जाणीव ठेवून मी यापुढेही आपल्या सहकार्याची मनोभावे अपेक्षा करतो..!

**डॉ.अरुण दळवे**
प्राचार्य,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

# संपादकीय...

सन २०२१- २०२२ या शैक्षणिक वर्षाचा वसुंधरा महाविद्यालयाच्या यशाचा आलेख प्रतिबिंबित केलेला ‘शब्दाई’ हा विशेषांक कथा या शीर्षकाखाली प्रकाशित करण्यात येत आहे.यातील सर्वच कथा मानवी जीवनातील व्यथा दूर करणाऱ्या असल्याने अंतकरणपूर्वक आम्हास आनंद होतो आहे.एका विशिष्ट स्थल, कालात पात्रांच्या परस्पर संबंधातून घडलेल्या घटनांचे विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा होय.

कथेमध्ये अनेक घटना समाविष्ट असतात. लेखक या घटना विशिष्ट क्रमाने रचत असतो. या रचनेतून पात्रांच्या कृती, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, भोवतालचे सामाजिक वातावरण, परस्पर संबंधातून निर्माण होणारे संघर्ष हे सर्व घटक उलगडत जातात व प्रत्येकाच्या जीवनात कोणते मूल्य हितावह आहेत, याची जाणीव कथांच्या माध्यमातून वाचकास होत असते. स्वातंत्र्य,समता, बंधुता, न्याय, मानवता अशा उदात्त मूल्यांच्या कथांमधून वाचकांच्या मनावर मौल्यवान संस्कार होतात.

आपण जीवनात कोणत्या मार्गाने जावे व कोणता मार्ग टाळावा याची दिशा वसुंधरा महाविद्यालयातील वाचकांना मिळावी,या उद्देशानेच ‘शब्दाई’ हा विशेषांक प्रकाशित करीत आहोत.समाजमनात नैतिक मूल्यांची रुजवन व्हावी व माणूस माणुसकीच्या पात्रतेचा बनावा, म्हणूनच व्यक्ती जीवनाच्या सर्वांगाना स्पर्श करणाऱ्या कथा या विशेषांकामध्ये शब्दबद्ध करण्यात आल्या आहेत.

सदरील विशेषांकामध्ये  घाटनांदूर व परिसरातील सर्व नावाजलेल्या कथाकारांच्या कथा समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत सर्वांसाठीच दीपस्तंभ असलेल्या ‘शब्दाई’ या विशेषांकास नामांकित कथाकारांनी, जाणकार मंडळींनी मोठा प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचेच धन्यवाद व यापुढेही सहकार्याची अपेक्षा...!

**संपादकीय मंडळ**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
ता.अंबाजोगाई, जि.बीड

# अनुक्रमणिका


१. छोट्या मामी ................ डॉ.मुकुंद राजपंखे ................ ०७

२. समायोजन .................... सिद्धेश्वर इंगोले .................... १३

३. कुंकवाचं बोट ............... नागनाथ बडे .......................... १८

४. मनासारखा पाऊस ........... डॉ.अलका तडकलकर ............ २३

५. धक्का .......................... रमेश मोटे .............................. २८

६. मोठाय् नं मी ? ............. आबासाहेब वाघमारे ............... ३३

७. शिकार ........................ नागनाथ बडे .......................... ३६

८. आईची तन्मयता ............ प्रा.नरसिंग उदार ................... ४३

९. घडी ............................ रमेश मोटे .............................. ४८

१०. हावळा ....................... सुरेश पाटील ......................... ५५

११. चंद्राबाईचे ईमान ............ आबासाहेब वाघमारे ............... ६८

१२. भालू ......................... विद्याधर पांडे ....................... ७१

१३. अवकाळी .................... दत्ता वालेकर ........................ ७८

१४. तळ्यावरची भाकर .......... प्रा.डॉ.बालाजी रुद्देवाड ........... ८२

१५. टक्कर ........................ सिद्धेश्वर इंगोले .................... ८६

१६. जूना खड्डा नवं झाड ........ विश्वंभर वराट ........................ ८९

१७. आपुलकी ..................... प्रा.डॉ.देविदास खोडेवाड ........... ९३


***

सभ्यता आणि जिवाजतन जपवणूक करावी अशी आज्ञाधारकता आमच्या मामींच्या अंगी बालपणापासूनच आलेली होती जिचा सहनशीलतेनं त्यांनी कौशल्यपुर्ण विकास केला आणि आपल्या गणगोतातील लेकीबाळींच्या त्या मौलिक मार्गदर्शक ठरल्या आहेत.सून आणि जाऊ म्हणून त्यांनी कधीच भांडणाला कारण दिलं नाही आणि आता आई आणि  सासू म्हणून त्यांनी कधीच तोरा गाजवला नाही, हा त्यांचा समजूतदार स्वभाव. निर्मळ घर आणि रांगोळींनी सजलेलं आंगण ही त्यांच्या सात्विक सुसंस्कृतपणाची ठाम ओळख आहे.



# छोट्या मामी !

**डॉ.मुकुंद शंकरराव राजपंखे,**
(पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी.संशोधन इंग्रजी विभाग प्रमुख)
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई,

कांही माणसांचं आपल्या आयुष्यात असणं किती आनंददायी असतं, हे त्या माणसाच्या हातून घडत गेलेल्या कामांवरुन मोजता येतं. परंतू होतं काय की घरात तिस-या चौथ्या नंबरवर असलेल्या माणसांच्या कामांबद्दल बोलावं असे प्रसंगही येत नाहीत कधी आणि कोणी तसा प्रयत्नही करत नाही. आज आमच्या छोट्या मामांनी छोट्या मामींच्या वाढदिवसानिमित्त छान पोस्ट टाकली फेसबुकावर चारच ओळींची आणि मला फार आनंद वाटला. मामांनी जगजाहिर मामींना 'आय लव्ह यू !' लिहिलं. आमचे छोटे मामा अर्थात कवी आणि विचारवंत शेषरावजी शिंदे असोत नाही तर थोरले मामा आयकर सहाय्यक आयुक्त बाबुरावजी शिंदे असोत, यांनी आपापल्या अर्धांगीनींचा अर्थात मोठ्या मामी सुधाताईंचा आणि धाकल्या मामी शांतामामी उर्फ किरणमामींचा फार आदर करताना आम्ही पाहिलं आहे. आमच्या ह्या धाकट्या मामांच्या स्वास्थ्यपुर्ण आरोग्याची आणि अर्थातच आयुष्याची आम्हा कुणालाच काळजी नसते त्याचं मुख्य कारण आमच्या मामींची सत्शिल, प्रेमळ वागणूक आणि आज्ञाधारक आनंदी स्वभावाचा वाटा मोठा आहे.मामांनी त्यांच्या मनात मामींबद्दल असलेला आदरभाव ज्या सहजतेनं व्यक्त केला ती सहजता सगळ्यांना जमणे शक्य नाही. यासाठी अगोदर आमच्या छोट्या मामांच्या मनमोकळ्या स्वभावाला हार्दिक धन्यवाद द्यायला हवेत.मनस्वी आनंद आणि अभिमानानं भरलेला, बहरलेला मनस्वी सॅल्यूट मामा अर्थात अंत:करणपुर्वक सलामच ! जिओ !

आमच्या पाहुण्यारावळ्यांच्या पाहुणचारात आमच्या  मोठ्या मामींच्या खांद्याला खांदा लावून किचनमधे रुचकर स्वयंपाक कसा करावा याचा वस्तुपाठ म्हणजे आमच्या दोनही मामी.दोनही सुगरणी आणि दोनही अन्नपुर्णा. नाजुक, साजुक तुपातला सुवाशिक मऊसुत भात आणि वरण, गरम गरम तव्यावरल्या पोळ्या आणि फुरके मारुन खावी अशी भाजी म्हणजे जगणं धन्य झालं वाटायचं.  कधी कधी अगदी अशा रुचकर जेवणांसाठीच मामांच्या गावी सुट्यांनी रहावं वाटायचं आणि आम्ही रहायचोही. आमच्या मामांचं घर म्हणजे कायम पाहुण्यारावळ्यांची वर्दळ आणि आनंदाचा दर्वळ होता, त्याला आमचे  आजोबा गणपतबाबांच्या, मामांच्या अभ्यासू कष्टाचा आणि खस्तांचाही मोठा इतिहास आहे त्यामुळं आजोळ हेच आमचं तिर्थक्षेत्र राहिलं आहे. या घरातल्या, आमच्या मावळप्रांतातल्या आमच्या सगळ्यांनाच मायमाऊल्यांनी आनंददायी सकारात्मक हातभार लावला आहे आजवर. ही गणगोताच्या सणसमारंभाच्या, उत्सवांच्या निमित्तानं वास्तव्याला येण्या-जाण्याची परंपरा अगोदर मोठ्या मामींनी लेकरांच्या वाढदिवसांच्या निमित्तांनी सुरु केली आणि मग तीच पुढं छोट्या मामींनीही चालती बोलती ठेवली. या अशा आनंदात आम्ही नातलग मंडळी नेहमी सहभागी होत रहायचो आणि तो मोठा आनंदोत्सव असायचा.हा आनंद आम्हा गणगोताला वाटणा-या आमच्या छोट्या मामींच्या वाढदिवसानिमित्त आज मामांनी आनंद व्यक्त करुन फेसबुकावर पोस्ट टाकली याचा मला मोठा आनंद झाला. या आणि अशा सगळ्या कारणांनी मला माझं आजोळ कोष्टगाव आणि दोनही मामांची नौकरीनिमित्त झालेल्या भ्रमंतीची सगळी गावं अत्यंत प्रिय वाटत राहिली आहेत.

**''झुकझुक झुकझुक आगीनगाडी**
**धुरांच्या रेषा हवेत काढी**
**पळती झाडे पाहुया**
**मामाच्या गावाला जावुया.''**

ही कविता मला आवडण्याची ही सगळी कारणं आहेत आणि खासकरुन या कवितेतील...

**''मामाची बायको सुगरण**
**रोज रोज पोळ्या शिकरण**
**गुलाबजामुन खावुया.**
**मामाच्या गावाला जावुया.''**

या ओळी तर माझा जीव की प्राण. ग. दी. माडगुळकरांनी जणू माझ्याचसाठी या ओळी लिहिल्या आहेत असंच आजही वाटंत राहीलं आहे. जगातल्या कुण्याही भाच्चा-भाच्च्यांना ही कविता



आपली वाटते त्याचे कारणं हे असंच आणि याहून वेगळेही असू शकतं.या कवितेतील निरागस आनंदी बालपणाची ही आनंदी छटा माझ्या आजोळाच्या अंगानं आहेच माझ्या आयुष्यातही.

आमचा मावळ प्रांत म्हणजे आमच्या भावनीक आणि वैचारिक आणि अर्थातच आर्थीक आरोग्याची संपुर्ण हमी. आमच्या मामांनी कांही छान चांगलं ठरवलं आणि आमच्या मामींनी त्यात खोडा घातला हे आम्हा लेकरांना कधीच जाणवलं नाही. एवढी मामांवरील आपली निष्ठा आणि दृढ विश्वास आमच्या मामींनी गणगोताला वंदनीय मानुन ठेवलेला आहे.आमच्या मामांसोबत सुखदु:खात सावलीसारख्या राहिल्या आमच्या मामी आणि हीच आम्हा मागच्या पिढीच्या लेकरांना खरीखरी आदर-आपुलकी आणि श्रमप्रतिष्ठेची कार्यशाळा राहिली आहे. मानसानं मनानं संतुष्ठ कसं असावं याचा जणू वस्तुपाठच राहिलं आहे आमच्या मामींचं आचरण.

आमच्या मामींचं माहेर ढाळेगाव, स्व. वंदनीय घन:शाम पलमटे मामांच्या लेक, ज्ञानोबा गुरुजी, वैजनाथ आणि जगन्नाथ या तीन भावांची एकुलती एक बहीण, त्यामुळं लाडात आणि अर्थातच घन:शाम मामांच्या खाणदानाच्या शालीन संस्कारात वाढलेल्या. तसा हा अहमदपूर परीसरातला आमचा पाहुणारावळा मोठा कष्टाळू, कल्पक आणि इज्जतदार माणुस. चिखलीचे बाबासाहेब (आपासाहेब)गोपले साहेब आणि कुसुमताई या आमच्या मामींचे माहेराकडून जवळचे नातलग.हा असा माहेरचा नितांत सुंदर जगण्याचा वारसा घेऊन मामी सासरीही तितक्याच तन्मयतेनं कार्यरत राहिल्या.कधी कसली तक्रार नाही ना कधी कसली धुसपुस म्हणुनही मामांच्या जीवनाला आनंदाची बैठक लाभली.आमच्या सुधाताई या मोठ्या मामींनी रुळवलेला सभ्य सुंदर वर्तन व्यवहार आणि पाककलेतील कल्पकता या छान कष्टाच्या वाटेवर नेटानं कल्पक प्रयोग करत राहिल्या.या आमच्या छोट्या मामींना मोठ्या मामींसोबत जेंव्हा जेव्हा सणावाराला आणि शेतातील येळवशीच्या कार्यक्रमाला स्वयंपाकाची आणि जेवणं वाढण्याची कामं करताना जेंव्हा जेंव्हा पाहिलं तेंव्हा तेंव्हा

माझ्या नजरेसमोर लक्ष्मीच्या सणात मकरांनी उभ्या केलेल्या दोन महालक्षुम्याच उभ्या राहिल्या सारख्या वाटल्या आहेत.त्यांच्या हातात मला कायम अन्नपुर्णा देवतेचा रहिवास दिसून आला आहे.नेहमीच गणगोताला हा असा तृप्तीचा ढेकर येई पर्यंत आनंदानं जेवू घातलेलं आहे आमच्या मामींनी. ही त्यांच्या जीवनाची आनंदयात्रा आम्हा भाच्चे कंपनीला विसरता येत नाही.

अगदी पहिल्यापासूनच आमचे मामा कायम परिवर्तनवादी विचाराचे राहिले आहेत आणि मामींनी कायम त्यांच्या आचार आणि विचाराचं बळ म्हणून त्यांच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या आम्ही पाहिलं आहे. ही टोकाची सभ्यता आणि जिवाजतन जपवणूक करावी अशी आज्ञाधारकता आमच्या मामींच्या अंगी बालपणापासूनच आलेली होती जिचा सहनशीलतेनं त्यांनी कौशल्यपुर्ण विकास केला आणि आपल्या गणगोतातील लेकीबाळींच्या त्या मौलिक मार्गदर्शक ठरल्या आहेत.सून आणि जाऊ म्हणून त्यांनी कधीच भांडणाला कारण दिलं नाही आणि आता आई आणि  सासू म्हणून त्यांनी कधीच तोरा गाजवला नाही. हा त्यांचा समजूतदार स्वभाव सर्व गुणवैशिष्ट्यांसहीत कुण्याही मातांनी आणि सासवांनी मुळातुन समजून घ्यावा असाच आहे.निर्मळ घर आणि रांगोळींनी सजलेलं आंगण ही त्यांच्या सात्विक सुसंस्कृतपणाची ठाम ओळख आहे.

आमच्या मामांचं घर माजलगाव, गंगाखेड आणि आता लातूर या गावी दिर्घकाळ वास्तव्याला राहिलं. आता सेवानिवृत्तीनंतर ते लातुरात स्वगृही आहेत. आम्ही लेकरं जेंव्हा कधी अडी-नडीला मामांकडं हक्कानं यायचो तेंव्हा तुमच्या कपाळावर कधीच आडी पडली नाही.माझ्या दोनही मामींनी मला भाच्चा असल्याचा माझ्या मामांच्या खिशावरला आणि खाऊवरला अधिकार नेहमी गाजवू दिला. मी जून सुरु झाला की हमखास मामांकडून वह्या,पुस्तकं,दप्तर  आणि कपडे घेऊन यायचो, तेंव्हा नेहेमीच गोडधोड करुन खाऊ घातलं आहे आमच्या दोनही मामींनी.

मामा एरिगेशनला नौकरीला होते आणि मग कार्यालयीन कामकाजानंतर त्यांचा वावर कायम परीसरातील शिक्षक, प्राध्यापक,सामाजिक कार्यकर्ते, विचारवंतांशी जवळीकतेचा असायचा.सामाजिक कार्यकर्त्यांची वरदळ असायची.मामा कार्यालयातून आले म्हणजे घंटा घंटा चर्चा चालायच्या. मामा लिहायचे फार सुंदर लयीत आणि गाऊन सादरही करायचे फार छान.लोक गुणगुणंत रहात. अशा वेळी मग हमखास चहा-पाणी आणि कांही छान खायला करणं आलंच.आपल्या नवऱ्याची इज्जतीची जाणिव  आणि मूळच्याच अंगभूत सुसंस्कारामुळं त्यांनी कधीच कुरकुर केल्याचं ना आमच्या बघण्यात आलं ना कधी ऐकण्यात. या मामींनी मामांना दिलेल्या स्वातंत्र्याचाच तर परिणाम आहे की मामा आज समाजाच्या चार चांगल्या वैचारिक प्रगल्भता असलेल्या माणसांपैकी एक आहेत.माजलगावात ते सहकारी आणि स्नेही इंजीनिअर कोंगे साहेब आणि मानवी  हक्क अभियानाचे

संस्थापक धडाडीचे नेते स्व.एकनाथरावजी आवाड साहेबांच्या वैचारिक वर्तुळात राहिले.

''दुखडेगावी घर आहे बाभुळबनात
अनाथांचा कैवारी तो एकनाथ''

ही मामांची कविता माजलगावातच जन्माला आलेली आहे.जयंत्या पुण्यतिथ्यांमधून विचाराला बळ देणारी भूमिका मामा मांडत आले आहेत आणि हे आमच्या आदरणीय मामींच्याच बळावर.

आमच्या मामा-मामींचा गंगाखेडचा वास्तव्याचा काळ तर सुवर्ण अक्षरांनीच लिहावा असा आहे. अभय, अरुण, मीना आणि बबली लहान होते.मी एक वर्षांनी मोठा रवीला.अरुण आणि बबलीच्या वाढदिवसांना यायचोत आम्ही आणि वाढदिवसाचा आनंद काय असतो कळायचा. मामांचं तिथलं मित्रमंडळ आदरणीय गोटमुखले मामा, गवाले मामा, शेजारी गायकवाड महोदय, वाळवंटे महोदय, जंगले महोदय आणि इतरही सगळेजन असायचे आणि मग चहा-पान- फराळासोबत ही मंडळी कितीतरी वेळ सामाजिक चर्चा करत असायची.या मंडळींनी गंगाखेडच्या कँपवर साज-या केलेल्या अण्णाभाऊ, बाबासाहेब, महात्मा फुले या महापुरुषांच्या वैचारिक जयंती उत्सवांनी गंगाखेड परीसरासह माझंही वैचारिक भरण-पोषण केलेलं आहे.ग्रीक विचारवंत सॉक्रेटीस, प्लेटो आणि अरिस्टॉटल सारखी ही मंडळी एकादा समकालीन आणि अगदी ऐतिहासिक विषयावरही गांभिर्यानं प्रश्नोत्तरं करत. अतिशय आदरपुर्वक  एकमेकांच्या वेगवेगळ्या मतांची चिकित्सा करत.विरोधाचंही मनस्वी स्वागत करत.विवादांनी उत्पन्न झालेल्या क्लिष्ट विचारांचं खंडण-मंडण करत आणि भल्या भल्या अवघड विषयाचा गुंता सोडवत. गंगाखेड आणि तत्कालीन जयंत्यांचे पोस्टर्स जरी नजरेसमोर आणले तरी या मंडळींच्या सामाजिक अभ्यासाचा आवाका लक्षात येईल. मग या चर्चांकडं कान लावून बसलेल्या कँपवरील मामीमंडळींसाठी आणि अर्थातच  उपस्थितांसाठी या चर्चा म्हणजे प्रबोधनाच्या कार्यशाळा होत्या.या अशा अपुलकीने भारावलेल्या माणुसकीच्या प्रांतात आपलं वास्तव्य राहिलं आहे.

अशा विचारानं विकसीत झालेल्या माणसाची बायको म्हणून मामी कायम मामांच्या पाठीशी राहिल्या,हा प्रवास निश्चितच सोपा नव्हता, नसतो आणि नाही.त्यांच्या संसाराची बैठकच ही अशा वैचारिक आणि सहनशील सभ्यतेनं घडली आहे.

'नावात काय पडलं आहे ?' असं शेक्सपीअर हा इंग्रजी भाषेचा विद्वान लेखक म्हणतो.नावात नक्की कांही तरी असलं पाहिजे असं मला नेहमी वाटतं.आपलं मूळ नाव 'शांता'. लग्नात मामांनी आपलं नाव 'किरण' ठेवलं 'आशेचा किरण' या अर्थानं मामांना ते अपेक्षित असणार

आहे.त्यांच्या एम. कॉम. नंतरच्या धडपडीच्या काळातच आपला विवाह झाल्या कारणानं असेल कदाचित, मामांनी आपल्या नावात हा बदल केला आणि झालंही तसंच, मामा पाटबंधारे खात्यात नौकरीलाही लागले.या अपेक्षेनंही आपण 'किरण' हे नाव सार्थकी लागलं आणि आपल्या मूळ नावीनंही आपला कधीच पिच्छा सोडला नाही. 'शांता' अशी दिर्घ हाक मारायचे बाबा आणि सरुमाय, मोठ्या मामीही. फार गोड वाटायचं ऐकायला कारण हा आपला स्वभाव आहे.शांतता हा आपला स्वभाव आहे, स्थायी भाव आहे.आपल्याला आरडा ओरडा करताना ऐकलेला, पाहिलेला माणुस गणगोतात सापडणे शक्य नाही.अंतरंगातूनच इतकेही मायाळू माणसं असू शकतात यावर विश्वास बसणे अवघड.आपण नांदनुकीचं सोनं केलं. एक उच्चविद्याविभूषीत मुलगा आहे प्रा.अरुण आणि मुलगीही छान सुशिक्षीत आहे अभियंता पदवीप्राप्त.दोघेही लेकरं आपापल्या संसारात छान स्थिरस्थावर झालेत.हा आनंदही डोळ्यादेकत बघता येतो आहे आपल्याला ही अजून मोठी आनंदाची गोष्ट आहे. दोन मुलाला, दोन मुलीला अशा गोंडस नातवांच्या गराड्यात आपलं आयुष्य न्हावून निघालं आहे मामी.

काल आमच्या आदरणीय छोट्या मामींचा वाढदिवस होता आणि मला कामाच्या तगाद्यामुळं चार ओळी लिहायलाही फुरसद मिळाली नाही.मामांच्या पोस्टवर दोन ओळी लिहून आनंद व्यक्त केला.आज रविवार. थोडा अवकाश मिळाला आणि आजोळ, मावळप्रांत पुन्हा नजरेसमोर तरळून गेला.

अरुण आणि अनुष्का हे आमच्या मामा-मामींचे सद्गुणी लेक आणि सून आणि दान नाती आहेतच चुनचुनीत घरी.अरुण आणि अनुष्का फार चांगली काळजी घेतात मामा-मामींची. मुलगी अमृता आणि तिचे श्रीमान महोदय आकाशरावही त्यांच्या दोन चुनचुनीत लेकरांसह आनंदी असतात पुण्याला.आनंदी रहायला लागतं काय माणसाला.आमच्या संवेदनशील जाणीवजागृत मामा-मामींसारखी मनाची श्रीमंती असली म्हणजे झालं.

वात्सल्यसिंधू, मातृतुल्य आदरणीय मामी,

तुम्हाला आरोग्यदायी आणि अर्थातच मामांच्या, लेकराबाळांच्या, नातवांच्या, अवघ्या गणगोताच्या सानिध्यात आनंददायी दिर्घायुष्य लाभो ! ■

साहेब गुरूजींविषयी बरंचकाही बोलत होते. गुरूजी मात्र आतून खूप भावनाविवश होत चालले होते. त्यांना बोलण्याची वेळ आली तेव्हा ते काहीच बोलू शकले नाहीत. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहत होता. त्यांना हुंदका आवरता आला नाही. गुरूजीच भावनाविवश झाल्यामुळे समोरील विद्यार्थीही आपोआपच रडायला लागले. सगळं वातावरणच गंभीर होऊन बसलं. गुरूजी क्षमा मागून जागेवर बसले.

# समायोजन



**सिद्धेश्वर पांडुरंग इंगोले**
साहित्यिक, परळी वै.

ऑगस्ट महिना संपत आला होता. यावर्षीही पटसंख्येची बरोबरी झाली नव्हती. मागच्यावर्षी पंधरा विद्यार्थ्यांची तूट पडली होती. म्हणून माने गुरूजींचे नाव अतिरिक्तशिक्षकांच्या यादीत होते. यावर्षी केवळ सहा विद्यार्थी कमी असल्यामुळे यादीतील नाव वगळता येणार नव्हते. मागील सहा महिन्यांपासून अतिरिक्त असूनसुद्धा गुरूजी पुढील ऑर्डर न मिळाल्यामुळे मूळ ठिकाणच्या शाळेवरच अध्यापन करत होते. परवाच त्यांना नवीन शाळेवर रुजू होण्याची ऑर्डर मिळाली होती आणि उद्या नवीन शाळेवर रुजू व्हायचे होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि गावचे सरपंच यांना तसं कळवलं होतं; म्हणून त्यांनी माने गुरूजींचा छोटेखानी सत्कार समारंभ ठेवला होता. माने गुरूजी शाळा सोडून जाणार आहेत ही बातमी सर्व ग्रामस्थांना मिळाल्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणारे त्यांचे विद्यार्थी, पालक आणि गावकरी कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार होते.

कार्यक्रम दहा वाजता सुरू होणार होता; परंतु गुरूजी दररोजच्या वेळेप्रमाणे सकाळी साडे आठ वाजताच शाळेत येऊन बसले होते. कालपासून डोक्यात फक्त आणि फक्त शाळेबद्दलच्या आठवणी येत होत्या. तेवढ्यात सुदाम, नागनाथ, सारिका, गजानन ही मुलं त्यांना भेटायला आली होती. परंतु चौघेही जण जरा लांबच थांबली होती. त्यांच्या चेहऱ्यावर असणारी नाराजी स्पष्टपणे गुरूजींना जाणवत होती. या मुलांबद्दल सांगायचं म्हटलं तर सुदाम हा चौथीत शिकणारा अतिशय खोडकर मुलगा. तो पहिलीत असताना शाळेत जातो आहे म्हणून घरी सांगायचा आणि मारुतीच्या



पारावर खेळत बसायचा. मुलांना पाठवून त्याला बोलावून घ्यावं लागायचं; तरीही तो यायचा नाही मग मात्र गुरूजींनाच तिथं जावं लागायचं आणि त्याला शाळेत घेऊन यावं लागायचं. बरेच दिवस गुरूजींनी ते केलं. सुदाम नंतर न बोलावताही शाळेत येऊ लागला. सारिका ही तिसरीच्या वर्गात आहे. तिला सुद्धा शाळेबद्दल आणि खासकरून  मानेगुरूजींबद्दल खूप भीती वाटायची. तसंच नागनाथला सुद्धा पहिलीत असताना शाळेची खूप भीती वाटायची. त्याची आई त्याला वर्गात आणून बसवायची पण तो सारखा रडत असायचा. गुरूजी त्याला खडू द्यायचे, चॉकलेट द्यायचे तरीही तो सारखा रडायचा. मग गुरूजी दररोज वेगवेगळं गाणं म्हणायचे, नाचायचे, हसवायचे नकला करून दाखवायचे. त्यावेळी तो वर्गात शांत बसायचा. त्याच्यासाठी गुरूजींना दररोज वर्गात काहीना काही वेगळं करून दाखवावे लागायचे. हळूहळू त्याला ही शाळेची सवय झाली आता तो गुरूजींचा खूप लाडका झाला आहे. डस्टर आणणे, खडू आणणे, ही कामे  आता तो पटकन करतो. गजानन हा आता चौथीच्या वर्गात आहे. गजानन  पहिलीत होता त्यावेळी त्याची सहा महिने शाळा झाली. तो शाळेत येत नव्हता म्हणून गुरूजींनी इतर मुलांना विचारले; त्यावेळी त्यांना कळाले, की तो त्याच्या वडिलांबरोबर उद्या ऊस तोडणीला जाणार आहे. तो ऊसतोडणीला गेल्यावर त्याचं नुकसान होईल हे गुरूजींना कळलं आणि गुरूजी गजाननच्या वडिलांची समजूत घालण्यासाठी त्यांच्या घरी गेले. त्यावेळी गजानन चे वडील सामानाची बांधाबांध करत होते. गुरूजी आल्याचं पाहून त्यांनी  नमस्कार घातला आणि बसावयास सांगितलं.

''काय गुर्जी, कसं काय येणं केलं आम्हा गरिबांच्या घरी.''

''तुम्ही गजाननला ऊसतोडणीसाठी घेऊन जाणार आहात असं मी ऐकलं आहे.''

'' गुरुजी, तुम्ही बरोबर आयकिलं हाय. आमी सम्देच ऊसतोडीला चाल्लाव. मंग गज्याला कुणाजवळ ठिवावं?''

गजाननच्या वडिलांनी आपला प्रश्न मांडला.

''गजानन खूप हुशार आहे. सहा महिन्यातच त्याला वाचायला यायला लागले आहे. त्याला अंकओळख झाली असून संपूर्ण उजळणी तो म्हणतो. त्याची शाळा बुडल्यास त्याचं खूप मोठं नुकसान होईल.'' ते अगदी पोटतिडकीने सांगत होते.

''गुर्जी आमी त्यला ठिवलं आस्तं पर आपल्या गावात हास्टेलबी न्हाई. आन त्यला संबाळणारं दुसरं कुणीबी न्हाई.'' गुरूजींना त्यांची अडचण कळाली होती. क्षणाचाही विचार न करता ते म्हणाले,

त्याला माझ्या जबाबदारीवर सोडून जा. मी त्याला घरी घेऊन जातो आणि माझ्या मुलांबरोबर सांभाळतो.

गुरूजी गजाननला घरी घेऊन आले. पुढील चार महिने त्याला त्यांनी सांभाळले. पुढील वर्षी गजाननच्या वडिलांनी ऊसतोडणीला जाण्यापूर्वी त्याची योग्य ती सोय केली होती. या मुलांना गुरूजींचा आणि गुरूजींना मुलांचा लळा कधी लागला हे कळलंच नाही! आज हे चौघेहीजण गुरूजींसमोर येत नव्हते. त्यांचा रडका झालेला चेहरा गुरूजींना स्पष्ट दिसत होता.

सातवीच्या वर्गातील मुली त्यांना भेटावयाला आल्या. आम्ही आत यावं का सर? गुरूजींनी मान हलवत हं म्हटले.

''सर आता तुम्ही आम्हाला सोडून जाणार मग आम्हाला कविता आणि गाणी म्हणायला कोण शिकवीन?''

सरिताने गुरूजींना तिची कविता व गाणे शिकण्याविषयीची तळमळ बोलून दाखवली. मी जरी गेलो, तरी अपर्णा मॅडम, जाधव सर आहेत की! ते तुम्हाला खूप चांगलं शिकवतील. कावळेवाडीच्या या जिल्हा परिषद शाळेतील सर्वच शिक्षक आणि शिक्षिका अतिशय हुशार आणि गुणवान आहेत.

''सर, आम्हाला तुमच्या आवाजाची सवय झाली आहे. तुम्ही लावलेल्या चालीमुळे आम्हाला कविता कधीही घोकून पाठ कराव्या लागल्या नाहीत. त्या आपोआपच पाठ झाल्या.''

वंदनानं कवितेच्या चालीबद्दल तिचं मत सांगितलं. कवितांना चाली लावण्याचा गुरूजींना लहानपणापासूनच छंद असल्यामुळे वर्गात आजवर कोणतीही कविता चालीविना म्हटली नव्हती. त्यांनी लावलेल्या चालीसुद्धा विद्यार्थ्यांच्या ओठावर सहज रुळतात याचं प्रमाणपत्रच वंदनानं गुरूजींना दिलं होतं.

''सर, मागच्या वर्षीच्या डान्सच्या स्पर्धेत आणि गाण्याच्या स्पर्धेत आपण बक्षीसं मिळवली. त्यासाठी घेतलेली प्रॅक्टिस माझ्या कायम लक्षात राहील! कारण त्यादिवशी डान्स करताना मला अचानक चक्कर आली आणि तुम्ही मला दवाखान्यात नेलं. हा प्रसंग मी कधीही विसरू शकणार

नाही.''

शिल्पाने तिच्याबाबत घडलेल्या त्या प्रसंगाची आठवण करुन दिली. त्या प्रसंगाने इतर मुली खूप घाबरल्या होत्या. गुरूजींनी तिला लवकर दवाखान्यात नेलं. खरंच गुरूजींची त्या दिवशी खूप धावपळ झाली होती.ते जरी चौथीच्या वर्गाला शिकवत असले तरी शाळेतील सर्व मुलांशी त्याची खूप जवळीकता होती. पहिल्यापासूनच शाळेत कोणताही कार्यक्रम अथवा कोणतीही स्पर्धा असली तरी माने गुरूजीच पुढाकार घेत आले होते.

केंद्रप्रमुख खाडे साहेब आणि गावचे सरपंच येताना गुरूजींना दिसले; आणि ते मुलींना म्हणाले, ''मुलींनो, आपण कार्यक्रम झाल्यानंतर बोलूया. कार्यक्रमासाठी पाहुणे आले आहेत आता थोड्याच वेळात कार्यक्रम सुरू होईल.''

खरं तर हा सत्कार समारंभ गुरूजींना नकोच होता. शाळेतील विद्यार्थी, शाळेच्या भिंतींकडे पाहिलं की मन दाटून येत होतं. आठवणींचा पूर मनात थैमान घालत होता. अशा वेळी निरोप घेणे त्यांना खूप जड जाईल म्हणून त्यांनी तो टाळण्याचा प्रयत्न केला; परंतु सरपंचांनी त्यांच ऐकलं नाही हा कार्यक्रम ठरला.

व्यासपीठावर गुरूजींसोबत गावचे सरपंच, केंद्रप्रमुख साहेब, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आणि गावातील दोन-तीन प्रतिष्ठीत व्यक्ती बसले होते. अपर्णा मॅडम यांच सूत्रसंचालन सुरू होतं. गुरूजींवरवर प्रेम करणारे त्यांचे आजी माजी विद्यार्थी, पालक आणि गावकरी समोर बसले होते. सरपंच भारतराव बोलण्यासाठी उठले आणि ते बोलु लागले.

गावकरी बंधूंनो, आणि विद्यार्थी मित्रांनो, माने गुरूजींसारखे आदर्श शिक्षक या गावाला मिळाले हे या गावचं भाग्यच! ते गावात आले त्यावेळी शाळा विटांची आणि पत्र्यांची होती. चौथी पर्यंतचे वर्ग तीनच खोल्यात भरत होते. आज शाळा सातवीपर्यंत आहे. संपूर्ण तालुक्यात नसावी अशी सुंदर शाळा गुरूजींनी बनविली आहे. विद्यार्थी वाढले, शिक्षक वाढले. गुरूजींनी हातात ब्रश घेऊन संपूर्ण शाळा रंगविली. वर्गांमध्ये आणि बाहेर सुंदर चित्रे काढली. शाळेत प्रोजेक्टर बसवला. सगळ्या सुखसोयी केल्या. एवढंच नाही तर ते मुलांचे स्कॉलरशिपचे तास घेत होते म्हणूनच दरवर्षी चार-पाच तरी विद्यार्थी शाळेतून मिरीट येत होते. गाण्याच्या आणि डान्सच्या बऱ्याचशा स्पर्धेत गुरूजींनी शाळेला अनेक बक्षीसं मिळवून दिली आहेत. सगळं व्यवस्थित आणि चांगलं चाललं होतं परंतु, आजकालची इंग्लिश मिडियमच्या शाळेची संख्या वाढल्यामुळे लोकांचाही तिकडे ओढा वाढला आहे. याचा परिणामसुद्धा आपल्या गावावर झाला आणि मागच्या दोन वर्षापासून शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाली. माने गुरूजींसारखे चांगले शिक्षक शाळेतून अतिरिक्त झाले. असो, माने

गुरुजींसारखे शिक्षक ज्या शाळेला मिळतील ती शाळा आणि ते गाव नशीबवान असेल.

सरपंच गुरूजींबद्दल बरंच काही सांगत होते. माने गुरूजींचे समायोजन थांबवण्यासाठी आपण गावकऱ्यांनी खूप प्रयत्न केले परंतु ते यशस्वी झाले नाहीत. फक्त सहा महिने त्यांना नवीन शाळा मिळाली नव्हती म्हणून ते या शाळेत आजवर काम करत होते.

सरपंचानंतर केंद्रप्रमुख साहेब बोलत होते. माने गुरूजींसारख्या सर्वगुण संपन्न शिक्षकामुळे य कावळेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला आहे. गायन, नृत्य, चित्रकला आणि प्रभावी अध्यापन इत्यादी कुठल्याच बाबतीत गुरूजी कमी नाहीत. संपूर्ण तालुक्यातीलच सर्व शिक्षकवर्गात त्यांचं नाव खूप प्रसिद्ध आहे. त्यांच्यापासून इतर शिक्षक सुद्धा प्रेरणा घेतात. त्यांचं काम अतिशय प्रामाणिक आणि तत्परतेच आहे.

साहेब गुरूजींविषयी बरंचकाही बोलत होते. गुरूजी मात्र आतून खूप भावनाविवश होत चालले होते. त्यांना बोलण्याची वेळ आली तेव्हा ते काहीच बोलू शकले नाहीत. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहत होता. त्यांना हुंदका आवरता आला नाही. गुरूजीच भावनाविवश झाल्यामुळे समोरील विद्यार्थीही आपोआपच रडायला लागले. सगळं वातावरणच गंभीर होऊन बसलं. गुरूजी क्षमा मागून जागेवर बसले. थोड्यावेळात कार्यक्रम आटोपला. विद्यार्थ्यांचं रडणं आणखीन थांबलं नव्हतं. गावचे सरपंच, केंद्रप्रमुखसाहेब इतर लोक आणि गुरूजी स्वतः विद्यार्थ्यांना खूप समजावून सांगत होते तरीही मुलांच रडणं थांबत नव्हतं.

इतक्यात चार-पाच ग्रामस्थ गुरूजींना भेटायला आले. सरपंच आणि केंद्रप्रमुखसाहेबसुद्धा सोबत होते. साहेबराव नावाचे ते गृहस्थ बोलू लागले, गुरूजी, आमची चूक झाली. आमची लेकरं आम्ही तुम्हाला भांडून या शाळेतून काढली होती. आणि इंग्लिश स्कूलमध्ये घातले होते. आम्हाला आता मराठी शाळेचे महत्त्व कळालं आहे. ह्या दोन वर्षात गुरुजी तुम्ही शाळा खूप चांगली बनविली आहे. आम्ही केवळ इंग्रजी शाळेच्या देखाव्याला आणि टापटीपपणाला भुललो होतो. सुंदरराव बोलत होते. आम्ही आमच्या पोरांच्या टी.शी आणल्यात. ह्या घ्या! आता तरी शाळेतल्या पोरांची संख्या वाढंल की न्हाई!

एवढं बोलून रामरावांनी टी.सी. गुरूजींच्या हातात दिल्या. केंद्रप्रमुखसाहेब पुढे आले. गावकऱ्यांनो आणि विद्यार्थीमित्रांनो, गुरूजींना आता आपली शाळा सोडून जाण्याची गरज नाही. गुरूजींचं समायोजन आता आपण थांबवू शकतो. केंद्रप्रमुख साहेबांचे ते शब्द ऐकून गावकऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. त्या चार-पाच पालकांमुळे भावनाविवश झालेले चेहरे आनंदाने पुन्हा फुलले. ■

नाव लक्ष्मी, वागणं बावन कशी सोण्याणी ! आता भोगा तुमच्या । करणीचे फळ ! म्हणतात ना, पेरील तसं उगवतं. तसे सुंदरानं घरातले बैलाला येसनी ओढून आकळावे तसे सारे आकळीले होते. साऱ्यांना पाश्चताप होत होता. धरल तर चावतय अन् सोडलं तर पळतय अशी साऱ्यांची आवस्था झाली होती. पण..पण.. आता विचार करून काय फायदा ? सुटलेला बाण जसा परत घेता येत नाही.



# कुंकवाचं बोट ...

**बडे नागनाथ पाटलोबा**
ज्येष्ठ साहित्यिक,चोपनवाडीकर

पांडू तसा मुळचा आवडगावचा. पण नौकरीच्या निमित्तानं तालुक्याला राहत होता. त्याला गावाकडे चार-पाच एकर जमीन पोटापुरती होती. त्याचं एक मुलगा अन तीन मुली असं पोटपाणी पिकलं होतं. नवरा बायको सहीत सहा खाणारे तोंड घरात होते. नौकरी साधीच होती. तरीबी तुटपुंज्या पगारात ते गुजरान करीत होते. सारेच लेकरं त्यानं शाळंत घातले होते. शिक्षणात लेकर हुशार होते. पाडूचा स्वभाव गरीब मनमिळाऊ, एकात नाही दोनीत नाही असा होता. तो पायपुरतंच अंथरुण करीत होता. पैसा-आडका जमवून ठेवीत होता. पुढचं भविष्य तो जाणून होता. त्याची बायको शामल त्याला साथ देत होती. संसार दोघांचा म्हणतात तशी ती संसारीक होती. बघता बघता थोरली लक्ष्मी आता बारावीला शिकत होती. अंगापिडीनं ठांबुस हाडाची अन् मजबूत बांध्याची ! नाकी डोळी छान, गोरी पान देखणी दिसत होती. पोरांच्या शिक्षणा बरोबर लक्ष्मींच्या लग्नाच्या काळजीत दोघंही घुरमाळत होते.

एके दिवशी गावाकडचा रानबा पांडूकडं आला. त्याची घरवाली दवाखान्यात आणली होती. बऱ्याच दिवसानं त्या दोघांची भेट झाली होती. दोघांनी गळाभेट केली होती. रानवा म्हंजी पांडूचा बालपणचा मित्र ! दोघं एक तीळ दोन जागी खायचे. रानबाची चांगली ऊठबस सुरू झाली. बसल्या जागी गावाकडच्या ख्याली खुशाली सुरू झाली. एवढ्यात घरातून लक्ष्मी चहा घेऊन बाहेर आली. तिला बघून रानबानं विचारलं, पांडू ही प्यार ? तेवढ्यात पाडून त्याला लेकराबाळाची सारी कुंडलीच



वाचून दाखविली. अन् मूळ मुद्याला हात घातला. ''औंदा लगीन करीन म्हणतोय !'' असं बिगर उदाचं भूत बोलावं तस त्यानं सांगून टाकलं. रानबानं पटकन् गोष्ट हेरली. अन् चहाचा फुरका मारीत-मारीत बोलू लागला,'' पोरगा झंक हाय.जोडा काय फिटनफार बसतोय राव ! आरं निवडगावचा संभा भुसे हाय नव्ह ! आरं त्यो दुधवाला ! त्याला एकुलता एक पोरगा हाय ! नारायण, चांगला पहिलवान गडी हाय की ! संभानंबी लगीन करायचंच म्हणून बाजारात कालच सांगितलच ! तवा त्याला उगाचाच कायी हारकत नाही.'' ऐकून  पांडूचा जीव भांड्यात पडल्यागत झालं, अन् हातभर पुढे सरकत विचारू लागला, ''पर त्याचं शिक्षण ?'' ''कालेजात शिकलाय म्हण ! पाणभरती शेती  हाय, रहायला गावाकंड टूमदार घर हाय, पर आजून नौकरी लागल्याली न्हायी. भरतीत जायचय असा नाद हाय म्हणं. रानबानं बी पान खात खात त्याच सारं पंचाग उकलून टाकलं.''

पांडू अन् शामलच्या ही गोष्ट पार डोस्क्यात शिरली. सुईत दोरा  ओवावा तसं सोयरीकीचं रानबानं बुड लावलं. अन बघाबघीचा लगेच कार्यक्रम ठरविला. सगळयांनाच पटापटी झाली. सोयरीकीची बैठक बसली, बोलाबोली झाली. अन् झोकात बेंड लावून पांडूनं सुपारीचा बार उडवीला.

दिवाळीच्या सणातली गायगोऱ्या बारस पाठ-म्होरी झाली.  तुळसीचे लगीन लागले. तशी पाउनं थित काढून आपल्या दारात लगीन लावून दिलं. निवड गावचे सारे लोक लक्ष्मी-नारायणाचा जोड बघून तोंडात बोटं घालू लागले. नवरदेव नवरी एकवून एक चढ दिसत होते. लक्ष्मीची येती जाती झाली. तिचा संसार सुखात चालला होता. पण..पण..तिची सासू हौसा! जरा करळ स्वभावाची ! म्हणील तेच खरं म्हंजी चांदभाई मुझे गिनो अशा मताची. आधून मधून हिडीस फिडीस करायची, भांडण काढायची.  तरीबी लक्ष्मी त्याला तोंड देत होती. कायी दिवस झाले होसानं पोराचे कानं भराय सुरू केलं. नवरा बायकोत जूपन दिलं. चालू गाडयाला खीळ म्हणतात तसं नारायणाला एकच्या-दोन

करून सांगायची चहाडीला गोडी म्हणतात तसं त्याबी माईचंच ऐकायला. पहिल्या सारखा तो राहिला नव्हाता बदलून गेला होता. बायकोशी वादत होता. अशा आपटा टपरीत दुसरं संपून तिसरं वरीस लग्नाला लागले होते. त्याची दोस्त कंपनी त्याला चिडवीत होती. मुलाबाळाचा पताच नाही, एवढाच धागा पकडून हौसानं तिला जाच जुलूम करण्याची हौस फेडून घेतली होती. कुरबुरी, कटकटी ह्यांन घरात चांगलाच धुमाकूळ माजवीला होता. लक्ष्मीला बापजल्मी हे माहित नव्हते, आधून मधून टेन्शन घालविण्यासाठी नारायण दारू पिऊन घरी येवू लागला. लक्ष्मीला हाणमार करू लागला.

लक्ष्मीला चौकूनच वैतागून सोडलं होतं; तेवढ्यात दिवाळीचा सण आला म्हणून पांडू तीला न्यायला आला तसा तिला माहेरी पाठविले, दिवाळीसण संपला तरी तिला न्यायला कोणी आले नाही, वाट बघत पांडून सोताहून तिला आवडगावला नांदाय आणून सोडलं. पर तिला ठेवून घेतलं नाही चार माणसाच्या कानावर पांडून गोष्ट घातली. आणली ती लक्ष्मी परत आणली.

दिवसामगून दिवस जात होते. पांडू आन् शामलला नव्या नव्या गोष्टी ऐकाय येऊ लागल्या, दोघांचा काळजी वाटू लागली. त्याला पुंढआड आन माग हिर झाली होती. करायला गेलं एक अन् झालं एकेक अशी त्यांची आवस्था झाली. बरेच लोकं मदावर्ती घातले. पण पाव्हणे कोणाचेच ऐकायच्या तयारीत नव्हते. पोरीची जरी बाजू असली तरी किती सहन करणार ! डोक्याहून पाणी जात होतं. अन्याय करणारा पेक्षा अन्याय सहन करणारा दोषी म्हणतात. तसं त्यांनी महिला तक्रार केंद्रात नोंद केली. तरी तितक्या परंत ते हो म्हणायचे अन् पुन्हा पहिले पाढे पंचावन्न करायचे. पांडून खूप दम काढला होता. पण शेवटी त्याचाही इलाज चालत नव्हता. त्याला कुंठच हाताला यश येत नव्हत. कोणतीच औषधी गुणकारी लागू पडत नव्हती. अखेर आज ना उद्या होईल बरं म्हणून त्यानं हात टेकले होते. शेवटी फारकत घ्यायची ठरली. झालेला खर्च, भांडी-कुंडी, अन् ओटी भरून घ्यायचं ठरलं. तसं एक दिवस फारकत झाली लक्ष्मी ढसढसा रडत होती. अखेर नारायण मोकळा झाला होता. साधासुधा नाही त्याचं कायमचंय कंबरडं मोडलं होतं. त्याच्या डोळयावर धुंद आली होती. फारकती पायी त्याला गावकरची पाणभरती आर्धा एकर जमिनीला मुकावं लागलं होतं. जमीन गमवावी लागली होती. त्याच्या हातानं त्याच्या पायावर दगड पडला होता. खाती दुनिया त्याला आठवली होती. गावात कुजबूज सुरू झाली. साऱ्यांना प्रश्न पडला होता. की, एवढी सारी टोकाची गोष्ट कशी काय घडली? तर्क वितर्क चालू होती. चोरी अन् सिंदळकी जास्त दिवस झाकून राहत नाही म्हणतात, तसं नारायण अन् गावातल्या सुंदराचं लफडं उघड झालं अन् वाऱ्यासारखं गावभर पसरल. नारायणच्या घरच्यांची तोंड बंद झाली होती. जगाला तोंड दाखवायला जागा ऊरली नव्हती. खरं खोटं गावकऱ्यांनी बघीतलं अन् एके दिवशी सुंदराला नारायणच्या घरात बळचं घुसविलं. नारायणच्या माईला असं होणार हे

आधीच माहित होतं. कारण याला झाला. कारणीभूत तीच होती. पण मी त्या गावची नाही असा लटकाच आव आणीत होती. माहित नाही अस ती दाखवित होती.

सुंदरा साऱ्याच्या नाकावर टिच्चून घरात नांदत होती. चार दिवस नवीन नवाळं म्हणतात तसं लवून चोपून वागली खरी पण हळू हळू तिनं तिचे गुणं घरातल्यांना दाखवायला सुरू केलं. मूळ स्वभाव जाईना एक कोट म्हणता राहिना तसं घरात पुन्हा कटकटी, हाणामारी सुरू झाली. घरातले भांडणं आता रस्तयावर आली. दोन्ही पार्टी गावतल्याच. म्हंजी ज्या गावच्या बाभळी त्याच गावच्या बोरी तसं कोणी कोणाला कमी नव्हत. इतकंच काय तर...सुंदराच्या घरच्यांनी नारायणच्या घरच्यांना कित्येकदा रस्त्यात मारामारीत लोळविलं होत पण सांगाव कुणाला ? आपलीच करणी अन् आपलीच भरणी. डराला पिर भेटल्यानं गचगुमान सहीन करीत होते. एकीच झालं थोडं अन् दुसरीनं धाडलं घोडं म्हणून काही लोक त्यांना हिणवीत होते. ते म्हणीत होते. तुम्हाला मस्ती आली होती आता घ्या जिरवून पहिल्या पोरीला नावं ठेवायला जागा नव्हती. नाव लक्ष्मी, वागणं बावन कशी सोण्याणी ! आता भोगा तुमच्या करणीचे फळ ! म्हणतात ना, पेरील तसं उगवतं. तसे सुंदरानं घरातले बैलाला येसनी ओढून आकळावे तसे सारे आकळीले होते. साऱ्यांना पाश्चताप होत होता. 'धरल तर चावतय अन् सोडलं तर पळतय' अशी साऱ्यांची आवस्था झाली होती. पण..पण.. आता विचार करून काय फायदा ? सुटलेला बाण जसा परत घेता येत नाही. तसं आख्खा गाव त्यांच्या तोंडात माती घालीत होतं. आता तर नारायण पुन्हा रम-रमारमी मध्ये गुरफुटून गेला होता. त्यांची दारू वाढली होती. निशात कुठही दिवस दिवस पडत होता. पत उघडी झाली होती. माणसात माणूस राहिलं नव्हतं. सुंदरानं साऱ्या घराला ओळखलं होतं. म्हणूनच तीनं एके दिवशी अचानक वेगळाच मार्ग धरला होता. म्हणूनच भल्या रातीला नारायणला गुंगारा देवून कायमची मुंबईला पळून गेली होती. आता ती परत येणार नव्हती. वढाळ जनावर धानाला लकावं तसा तिचा मूळ स्वभाव जात नव्हता. म्हणून तर ती आता जीवाची मुंबई करण्यासाठी कायमची पळून गेली होती. हां हां म्हणता गावभर बातमी पसरली. सगळीकडे हवी तू झाली. उलट सुलट सूर निघत होते. इकडं लक्ष्मी मात्र एक नाम केशवा, तस ती दुसऱ्या लग्नाच्या भानगडीत पडली नव्हती. वापाला तिनं कायमचं सांगून टाकलं होतं. मला दुसरं लगीन करायचं नाही. जन्मात एकदाच लगीन करायचं असतं. एकालाच करायचं असतं. म्हणूनच ती धुतल्या तांदळागत वागत होती. खाण तशी माती म्हणतात तसं तिचं वागणं खानदाणी होतं. तिच्या आजीची तिला शिकवण होती. तिच्या लहाणपणी आजी म्हणायची, कुंकाचं बोटं तर जन्माचं नीट ! बाईच्या जातीनं नांदून नाव कमवाव ! त्या शिकवणीनं तीनं दुसरा करायचा नाही असा निर्धार केला होता. फारकत होवून ही नारायणाच्या नावानंच ती कुंकू लावीत होती. आधीच तीला देवाधर्माचा नाद होता. म्हणून

ती सारखं देवदेव करीत होती. पोथीपुरानात ती पार रमून गेली होती. हां हां म्हणता तिची माहिती आवड गावात पसरली होती. म्हणूनच गावातल्या चांगले चार चौघांनी विचार केला होता. विचार करून ते तालुक्याला पांडूच्या घरी आले होते. त्यांनी चूक कबूल केली होती. पदर पसरीत होते. पुन्हा लक्ष्मीला पाठवा म्हणीत होते. विणवण्या करीत होते. तिच्या नांदण्याची हमी मारून घेत होते. घरात लक्ष्मीला देवी साक्षात्कार झाल्याचा भास होत होता. पांडून लक्ष्मीची सहमती घेतली होती. साऱ्या घटनेवर पडदा टाकून तोही पाठवायला तयार झाला.

एकूणच काय ? ती आवडगावला आवडीनं नांदाय आली होती. घराची कारभारीन बनली होती. घरात, दारात, पावलोपावली नारायणची लक्ष्मी नांदत होती. कार्यक्रमात ती नाव घेत होती. ''डोकं विचरून वेणीला घालते गोंडा ! नारायणरावांनी कितीही केल्या रांडा तरी मीच लावीन झेंडा.'' 'लक्ष्मी नारायणाचा जोडा' गावभर शोधून दिसत होता. त्यांच्या संसाराचा सुगंध दरवळत होता. सर्वांना आनंदी आनंद झाला होता. तिचं कुंकू बळकट होतं. म्हणून तिचा संसार नीट चालला होतो.

■

देवा मी फकस्त माझं काम करत हुतो मनापासून बोलत हुतो. म्या कधीच कोणाची तक्रार केली नाही. पण मरतेवेळी असा दुष्काळ पाहून तुला पाणी पाडायला सांगितलं रे... तू माझ्या मनासारखा पाऊस पाडलास आता यंदाची दिवाळीबी चांगली हुनार.... पण मला तुझ्यासंग आताच ढगात यायचं नाही. आनिक तीन चार वर्ष तरी इथेच पावसाले दाखीव. दाखवशील का रे बाबा....



# मनासारखा पाऊस

**डॉ.अलका प्र.तडकलकर**
अंबाजोगाई

पावसाळ्याचे दिवसही नव्हते ते. परंतु एकाएकी आभाळ भरून आले चोहीकडे अंधार पसरला. वादळी वाऱ्याचा इशारा जाणवू लागला आणि वाऱ्याचे विचित्र थैमान सुरू झाले घराची दार खिडक्या धडाधड आपटू लागली. रस्त्यावरची झाडे थयथयाट करू लागली. धुळीचे लोट आकाशात उडू लागले आणि पाहता पाहता आभाळातून टप्पोरे थेंब पडू लागले. अवकाळी पाऊस हां हां म्हणता जोरात कोसळू लागला. मोठ्या चिंचोक्या एवढ्या गारा ही आभाळातून टपकू लागल्या. वाऱ्याचे उग्र रूपही पावसातच आणखीन उग्र भासू लागले. वाऱ्याचे तांडव सुरू होताच पारावरच्या पिंपळावरची पक्षाची घरटी सावरीच्या कापसागत हेलकावे खात भिरुथरुन आकाशात उडून जमिनीवर पडली. सपसप पडणारा पाऊस, घोंगवणारा वारा हे दृष्य गावकरी पहिल्यांदाच अनुभवत होते.

नरहरी एक तरुण शेतकरी घरातून शेताकडे पळत सुटला. नुकतेच गाय आणि तिच्या वासराला शेतावरच्या खोपट्यात बांधून तासभर पूर्वी घरी परतला होता. न जाणो अशा वादळी पावसात वीज पडून जनावराचे प्राण जातील या भीतीने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता तो वेगात पळू लागला. नरहरी शेतावर पोहोचला तोपर्यंत वातावरण एकदम शांत झाले होते. जणू हीच वादळापूर्वीची शांतता वाटावी असा प्रकार. अनामित भीतीने त्याचे काळीज घाबरले. तरीपळ फारसा विचार न

करता त्याने खोपटाचे दार उघडले. गाय व वासराला दावणीतून सोडवले. अंब्याच्या झाडाखाली ज्वारीचा कडबा रचलेला होता. त्याच्यावर ताडपत्री पांधरली होतीच पण वाऱ्याने ती निसटली गेल्याचे दिसताच पुन्हा ती सरळ करून मोठमोठाले दगड ठेवून त्याने मोठा निःश्वास सोडला. चला आता या गाय - वासराला गावातल्या गोठ्यात बांधूया या विचाराने त्या जनावराची कासरे ओढत पुन्हा झपाट्याने गावाकडे पळू लागला. त्या मुक्या जनावरांनाही परिस्थितीचा अंदाज आला होता जणू. त्यामुळे ती कावरी बावरी होत नरहरी सोबत पळू लागली. गावात पाटलाच्या वाड्यासमोरच्या मोठ्या दगडी गोठ्यात नरहरीने गाय वासराला बांधले. पुन्हा एकदा दीर्घ श्वास बाहेर टाकला. तितक्यात एक जोरदार विजेचा लोळ शेताकडे पडताना नरहरीने पाहिले. धडामड् - धुम - कड् - कड् - कड् अशा आवाजासह सहस्त्र सूर्याचा उजेड त्याच्या डोक्यावरून शेताकडच्या गोठ्याकडे जाताना त्याने पाहिले. तत्क्षणी नरहरीने स्वतःचे डोळे मिटून घेतले. केवडा तेजस्वी प्रकाश तो...! बापरे....! एका क्षणात आहेचं नाही करणारा असा अग्नीचा लोळ हा...! बरं झालं बाबा आम्हाला वाचवलं...! नरहरीच्या काळजात धस्स झालं. असे म्हणत त्याने दोन्ही हात जोडले व नमस्कार केला.

तोच कानावर मोठमोठ्या किंकाळ्या ऐकायला आल्या. जिकडे तिकडे गोंधळ, आरडा ओरडा बाया माणसचे विचित्र आवाज ऐकू येऊ लागले. नरहरीने वाड्या बाहेर जाऊन पाहिले तर लोक सैरावैरा पळत होते हे दिसू लागले. पाटलाच्या वाड्यासमोर माणसाची गर्दी जमू लागली. जमावातल्या प्रत्येकाला अनामिक भीतीने ग्रासले होते. भीतीने प्रत्येक माणसाला काय बोलावे ते सुचत नव्हते. अशा प्रकारचा वादळी पाऊस व विजेचा लोळ गावकरी पहिल्यांदाच पाहत होते, अनुभवत होते. निसर्गाचे हे रौद्रदर्शन पाहून जणू प्रत्येकाची बोबडी वळली होती आणि म्हणून जो तो ओरडत आपल्या घरातून पाटलाच्या वाड्यासमोर येऊन थांबत होता. आता पाटील तरी काय करणार अशा पाऊस माऱ्याला पण कुणाचा तरी आधार हवाचं अशा संकटकाळी. म्हणून सगळे वाड्यासमोर गर्दी करू लागले. तितक्यात पुन्हा एकदा वीज कडाडली. लखखपैकी उजेड पुन्हा सगळीकडे पसरला आणि त्यानंतर क्षणभर सर्व समोर काळा कुट्ट अंधार पडला. कोण काय बोलतोय, कुणाला कुणाचे काहीच कळेना. पुन्हा तिसऱ्यादां वीज कडाडली आणि पारावरचे शंभर वर्षांपूर्वीचे पिंपळाचे झाड कडाड् कड् कडाड् कड् धडाम् धूडूम असा आवाज करत जमिनीवर आडवे पडले. जमीन काही क्षण थरथरली जणू धरणीकंप झाला आहे असे वाटले. मग वाड्यासमोर जमलेली मंडळी घाबरून आपापल्या घराकडे पळू लागले. आपल्या घरच्यानां संभाळा रे...! असे म्हणून आपापल्या घराकडे पळत सुटली निसर्गाच्या या रौद्र वातावरणामुळे माणसाचे ज्ञान ,अनुभव, श्रीमंती, शक्ती हे सारे अगदी नगदीच नगण्य असते हेच जणू दाखवायला हा अवकाळी पाऊस अवतरला होता.

नरहरी विस्मयकारक होऊन शुष्क मन:स्थितीने हे सगळे दृश्य पाहत होता. लहानपणी आपण ज्या पिंपळाच्या झाडाखाली खेळलो, बागडलो ते झाडच कोसळल्याचे पाहून त्याला एकदम पोरकेपणा जाणू लागला. त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. पुन्हा एकदा आकाशाकडे बघत म्हणू लागला. देवा, तुला आम्ही जेवढे काही समजतो त्यापेक्षा तू खूप खूप वेगळा आहेस रे...! बाबा..! आणि आपल्या घराची काय अवस्था झाली पाह्याला तो घराकडे निघाला.

माणसाच्या जगण्यात आणि भाव विश्वास नकळतपणे वावरत असलेला निसर्ग हा माणसाच्या स्वभावाप्रमाणे खूप लहरी  बेभरवशाचा आहे हे आज सगळेजण अनुभवत होते. अवकाळी पावसाच्या माऱ्याने गावातली लहान मोठी झाडे केस पिंजारून निस्तब्ध उभी होती. पारावरचे पिंपळाचे मोठे झाड तर पार जमिनदोस्त झाले होते. त्या दिवसापासून नरहरीला जीवन गोड लागेना झाले. तो मनातून हादरला होता. त्याचे वृद्ध पिता केरबा देखील विमनष्क झाले आणि कुणाला काही न बोलता कुणाचे किती नुकसान झाले हे पाहत पाहत मुकपणे पारावर जाऊन बसू लागले. दोन-तीन दिवसानंतर पावसाचा मागसूस उतरला नाही. चक्क कडक ऊन पडू लागले. आणि अख्खा गाव कडक उनाने त्रस्त झाला. सगळेजण घामाघुम होऊ लागले. हा कसला बदल...! कुणालाच हवामानाचा अंदाज येईना. सर्वामुखी एकेक शब्द काय हा उखाडा....! असे ऊन कधी पाहिलेच नाही. त्या दिवशी असाच उखाड्याने त्रस्त होऊन केरबा पहाटे चारला उठून पारावर झोपायला गेला. पार उजाडल्यागत झाला असला तरीही प्रकाश होता त्यामुळे आजूबाजूला पडलेल्या झाडाच्या फांद्या घरटी व पानाचा खच हे पहात पहात तिथे केरबाचे मन गुंतून जाऊ लागले. पाठ टाकताच विचार करत करत डोळ्यावर झापड येऊ लागली आणि निवांत झोप मिळाली.

मग रोजच पारावर निजायला जाण्याचा क्रम केरबानी अनुसरला. एक दिवशी मात्र झोप येईनाशी झाली, डोळे मिटून पडला. तरीही डोळ्यावर झापड येईना त्याने शांत चित्ताने गावावरून एक नजर फिरवली. गावाची या अवकाळी पावसाने खूप दुर्दशा केली होती ती पाहण्याजोगी नव्हती. केरबा कळवळला. पोटातून उमाळून आलं आणि मग थरथरल्या हाताने आभाळाकडे बघत नमस्कार करत देवाला म्हणाला, हे देवा, काय रे तुझे तंत्र, कसले हे नियोजन. अरे बाबा चार-पाच वर्षेतर दुष्काळात गेली आणि आता यंदा अशी दुर्दशा केलीस. बाबा हे या म्हाताऱ्याला बघवंनारे.... यंदा तरी मनागत पाऊस धाड रे... बाबा...! असे केरबा कळवळून म्हणाला. असं म्हणून डोळे मिटले. पुन्हा डोळे उघडले तर डोळ्यासमोर एकदम लख्ख उजाड पडला. रात्रीच्या अंधारात हा तर कसला प्रकाश....! केरबा आश्चर्यचकित झाला. पापण्याची फडफड करीत त्याने समोर नीट पाहिले त्याच्यासमोर एक देवदूत उभा होता. अगदी प्रसन्न मुद्रेत..! जणू केरबाची प्रार्थना त्याने ऐकली होती व

त्याला बोलण्यास आला होता.

कोण रे बाबा... कोण आहेस रे तू...? केरबाचा प्रश्न. मी देवदूत आहे. तुला भेटायला आलो, देवदूत माझ्यापाशी काय हाय... का भेटतूया मला... केरबा अरे तू या गावातला सर्वात ज्येष्ठ श्रेष्ठ माणूस आहेस. गावाच्या भल्यासाठी तू उभं आयुष्य राब राब राबलस. आज तू घाबरलास म्हणून आलो भेटायला. देवदूतने खुलासा केला. केरबा आश्चर्यचकित झाला. काही क्षण गोंधळून गेला मग स्वतःला सावरत मनाला, मला भेटून काय करशील बा... माझ्या लेकरांना नीट सांभाळ रे...! बाबा मला काही बी नग..... केरबा म्हणाला. अरे तू तर या गावातला अतिशय पुण्यवान माणूस आहे. तुझी इच्छा नेहमी गावाच्या कल्याणासाठीच असतात. म्हणून पुन्हा तुला काय पाहिजे हे विचारायला आलो देवदूत म्हणाला. मला काही बी नगं पुन्हा एकदा केरबा म्हणाला फकस्त पाणी चांगलं धाड लेकरांना पोटभर आन खायला मिळल एवढं धाड. असला विध्वंस नगं हात जोडत केरबा मनाला.

तथास्तु! देवदूत म्हणाला आणि आंतरधन पावला. ही त्या दिवसाची घटना केरबानं कुणाला म्हणजे कुणालाच अगदी घरच्या मंडळीला नाही सांगितली. एक तर थंडीच्या अशा वातावरणात त्याचे पारावर झोपायला जाणे हेच घराच्या सर्वांना खुळ्यागत वाटत होते, आणि त्यात हे देवदूताची गोष्ट सांगणे म्हणजे आणखी खुळ्यागत वाटेल. म्हणून गप्प गप्प राहिला केरबा दुसऱ्या दिवशी पुन्हा पारावर निजायला गेला. कालचा प्रसंग त्याला आठवला. खरंच देवदूतच होता का आपल्याला भेटून गेलाय.? की सपान पडलं होतं आपल्याला असं मनाशी विचार आला. कदाचित या म्हाताऱ्याला गोड गोड बोलणारा यमदूतच असेल तर कोणी पाहिले यम कसा असतो ते. अशी भोळी भाबडी शंका देखील त्याच्या मनाला स्पर्श करून गेली. तत्क्षणी पुन्हा एकदा चमत्कार घडला. पुन्हा पायरीवर लख्ख उजेड पडला. कालचाच देवदूत समोर अवतरला होता.

बोल केरबा काय पाहिजे तुला.? देवदूताने हसत प्रश्न केला. केरबाची भीतीने गाळण उडाली त्याच ध्यान करावं ते समोरच उभं राहिलं होतं. ही भुताटकी तरी नव्हे..! केरबाची बोबडी वळली.. त... त... प... करू लागला. पण उसने अवसान आणित म्हणाला, देवा कालच बोललो न्हवं. मला काही बी नगं फक्त माझ्या समद्या लेकरांना चांगलं पाणी पीक दे...! चार वर्ष संपलं दुष्काळ पडतूया लोकं घर सोडून जातंया. पोरं काळजीनं मरु लागल्याती. मला हे काही बी बघवंना तवा यंदा तरी वाचिव आम्हाला. हात जोडत केरबानं आपली इच्छा देवादूताला बोलून दाखवली. तथास्तु असे म्हणत देवदूत अंतर्धान पावला.

पुढे आठवडाभर उन्हाची भग भग वाढली आणि मग हळूहळू हवेत फरक पडला. वातावरण गार झाले. ढग दाटून येऊ लागले थंडगार हवा. गावकुसातून मनसोक्त फिरू लागले. बघता बघता

पावसाची चिन्ह उमटू लागली. मनासारखा पाऊस पडू लागला. अवकाळी पावसाच्या नुकसानीच्या खुणा अस्पष्ट होऊ लागल्या आणि केरबाला मनातून चिंब चिंब भिजवू लागला. त्याच्या मनासारखा पाऊस देवतांनी धरला होता. आभाळाकडे बघत पडणाऱ्या पावसात देवदूत शोधतो. त्याला वारंवार नमस्कार करू लागला. लोकांना वाटू लागले वय झाले केरबाचं आता मरण जवळ यायला म्हणून हे काहीतरी खुळ्यागत चाललंय आणि त्याचं गाव एकीकडे आनंदात भिजण्याच्या तयारीत लागलं. तर नरहरी देखील यंदा पीक पाणी चांगलं येणार या होऱ्यांना यंदा बापाला चांगलं कापड घ्यायचं, त्याला देवदर्शनाला घेऊन आणायचं त्याच्या मनाशी बेत आखू लागला.  यंदा उन्हाळ्यात बी आपलं म्हातार टिकलं तर त्याची इच्छा असं वा नसो आपण त्याला चांगल चुंगल खायला घालून गावास गावजेवण देऊ हेही योजून ठेवलं. पावसाळा संपला पुन्हा एकदा पहाटे पहाटे केरबा पारावर झोपायला गेला. आजही तो देवदूत भेटला. आपली इच्छा घेऊन तो तिकडे गेला आणि खरोखरच तिसऱ्यांदा त्याला तो देवदूत भेटला. केरबा बोल बोल तुला काय पाहिजे, देवदूत म्हणाला. मी एखाद्या माणसाला फक्त तीन वेळेस भेटतो  ज्याच्यावर मी प्रसन्न झालो त्याला.

तुझी सचोटी, मेहनतीची तयारी, निर्मळ मन आणि कल्याणकारी भावना तू शंभरीकडे असतानाही कधी सोडले नाहीस. हीच तुझी भक्ती मला आपलाहून प्रिय झाली आहे. म्हणून तुला भेटत राहिलो देवदूत म्हणाला. यावर केरबा म्हणाला, देवा मी फकस्त माझं काम करत हुतो मनापासून बोलत हुतो. म्या कधीच कोणाची तक्रार केली नाही. पण मरतेवेळी असा दुष्काळ पाहून तुला पाणी पाडायला सांगितलं रे... तू माझ्या मनासारखा पाऊस पडलास आता यंदाची दिवाळी बी चांगली हुनार.... पण मला तुझ्यासंग आताच ढगात यायचं नाही. आनिक तीन चार वर्ष तरी इथेच पावसाले दाखीव. दाखवशील का रे बाबा.... हात जोडत बोलकं पसरत केरबा देवदूताला म्हणाला. देवदूत मनापासून हसला म्हणाला, अरे तुला न्यायला मी नाही आलो, तुझी इच्छा कळली रे मी जगायचं सांगतोय फक्त तुझ्या इच्छेचा प्रश्न असतो आनंदात रहा, असं म्हणून देवदूत अंतर्धान पावला. आता यापुढे देवदूत दिसणार नाही ही गोष्ट मात्र केरबाला खटकली. हळहळ झाली मनाची पण तीन-चार वर्ष तरी पावसाळी बघाण्याचा आशीर्वाद मिळाला ही आनंदाची बाब आहे. म्हाताऱ्या केरबानी हसत हसत आभाळाकडे हात जोडले. गाव म्हणू लागले म्हाताऱ्याला येड लागलंय. पारावर जायचा लय नाद लागलाय. खुळं घर असताना बेघर व्हायची बुद्धी होतेय या केरबाला. नरहरी मात्र खुशीत होता आपला बाप जगावेगळा आहे तो ओळखून होता. ■

मऊ गोधडीच विसावलेलं आपलं स्वप्नमय जीवन पहाटेच्या रेशमी गारव्याने मंत्रमुग्ध होत होतं.. आवं... पळा... मेले! मायीची एक आर्त किंकाळी, झोपेच्या शांत सागराला एकाएकी वादळानं झपाटावं तशी. सकाळच्या निरव शांततेला होरपळून काढणारी. काय झालं कांहीच समजेना, आमची पार घाबरुन गाळण उडालेली, काळजाची धडधड स्पष्टपणे कानांना ऐकू येत होती.. उठून पाहिलं तर...



# धक्का


**रमेश महादेव मोटे**
प्रसिद्ध कवी, लाडझरी


वैशाखी उन्हाचा कडाका पडलेला. उन्हांच्या झळ्यांनी सर्वत्र लाटाच फिरत आहेत असं भासत होतं. कितीही पाणी पीत राहिलं तरी तहान जात नव्हती. आंब्याखाली बांधलेली जनावरं रवंथ करत तोंडातून फेस गाळत कानाने माशा झाडत होती. भाऊ भुईमुगाच्या शेंगा तोडून झालेले वेल उचलून ढिगारा लावत होते आणि जवळच दादा डोक्याला टापर बांधून शेंगा तोडत सावलीला गप्पा मारत होते. भुईमुग काढणीचे दिवस ते. त्यादिवशी सकाळ पासूनच घरातलं वातावरण जरा वेगळंच जाणवत होतं. मी चौथीला असेन त्यावेळी. लहान भाऊ दुस-या वर्गात तर सगळयात लहाना खुप बारीक होता. असे आम्ही तीघं भाऊ. त्यावेळी महिना कुळव चालायचा म्हणून आम्ही सगळेच त्या दिवसांत शेतातच रहायचो.

गावातील बरीच बाया मानसं शेंगा उकरायला शेतात आले होते. उन झाल्यामुळं आपापल्या पुढचे वेलं घेऊन सगळे जन झाडाच्या सावलीत जवळ करत होते. कुणी मोठयानं हासत होतं, कुणी गाणं म्हणत होतं, तर मध्येच लहान लेकरं गोंधळ घालीत होते. पण.... पण.... माझी माय... आज सकाळ पासूनच कसलातरी विचार करत होती, भयंकर धक्का बसला होता जणू तिला. सकाळपासून कुणालाही बोलली नाही, जेवण केलं नाही, फक्त मनाशीच बोलत होती, रडत होती. जवळच लहान बाळ मायीकडं जायला असूसलं होतं, खूप टाहो फोडून रडत होतं, त्याचं रडनं किर्रर उन्हालाही आग लावत होतं. पण... पण... कुणीही लेकराला मायीकडं जाऊ देत नव्हतं. एवढंच काय माय तर त्याला



पाजवायलाही कुणी मायीकडं नेत नव्हतं. एका दावणीला गाय बांधलीया व दुसरीकडं वासरु, फक्त एकमेकाकडं पहाणं व रडणं नशीबात होतं त्यांच्या. जिवाचा अकांत करुन बाळ टाहो फोडत होतं. पण... आजी फक्त त्याला समजावत होती, वाटीनं दुध पाजवण्याचा प्रयत्न करीत होती._ काल रात्रीपासुन बाळाला मायीच्या जवळही फिरकू दिलं नव्हतं. एवढंच काय तर मायीचं जेवणाचं ताट, आंथरुन सगळ सगळं वेगळ दिलं होतं. मायीनं स्वयंपाक करु नये, कशालाही हात लावू नये, एवढंच काय तर लेकराल पाजुही नये असं ठरलं होत. मागच्या दोन-तीन वर्षापासून मायीचं डोकं खुप दुखायचं. दवाखाण्यात दाखवायला काही कमी केलं नाही. गावठी इलाजाला तर दमच नव्हता. गावठी लोकांच्या सांगण्यावरुन ब-याचवेळा मायीच्या डोक्याला डागले पण होते. तरीही काहीच फरक पडत नव्हता. आहे तोवर ठीक पण एकदा डोकं दुखायला चालू झालं की, माय वेडी व्हायची, कधीकधी रात्रभर रडायची, ओरडायची घरात चकरा मारायची. घरच सगळे चिंतेत होते. आता दोन-तीन वर्षापासून तर या गोष्टीची सवयच जडली होती. सगळे म्हणायचे रडतीया फिरतीया अन् गप झोपतीया! पण तिच्या असाह्य वेदना तिलाच माहित. मायीचं दुखनं म्हणजे आता रोजचंच मढं झालं होतं, त्यामुळं माय रडली, ओरडली तरी कुणी तेवढं गंभीरपणे विचार करीत नव्हतं. दिवसभर मरमर कामं करावं, रात्री कोसभर चालत घरी यावं, दहाबारा माणसांचा स्वयंपाक करुन सगळे जेवणं आटपल्यास जेवण करावं. सगळी वारावार करायला खुप रात्र व्हायची. पहाटेची साखर झोप तर कधीच मायीच्या नशीबात नव्हती. आजोबांचा करारी आवाज वाडा हादरत होता. पहाटंपासून पुन्हा तोच उपक्रम. एकंदरीत मायीच्या जिवाला विसावा तो कसलाच नव्हता.

नेहमीप्रमाणेच एका वर्षी शेंगा काढणीच्या दिवसात आम्ही सगळे रानात राहिलो होतो. आण्णा (चुलते) कॉलेजात शिकायला होते. रोज शेतात येताना ते कांहीतरी नवीन पुस्तकं, चित्रसंग्रह असं घेऊन यायचे. त्या दिवशी त्यांनी गोष्टीचं पुस्तक आणलं होतं. मी पुस्तक घेऊन चिमणीच्या

उजेडाला पाणे चाळत बसलो होतो. भाऊ(वडील) दुध काढत होते, माय भाकरी थापीत होती, मध्येच रडणा-या बाळाला समजावीत चुलीत काटक्या सारीत होती. मध्येच तोंडावर येणा-या केसांना माग सारत होती. तर धुराच्या लोटानं भरलेले डोळेही मधून मधून पुसत होती. ''मी काय म्हणत्येय, तिला एकाद्या मोठ्या दवाखाण्यात घेवुन जा बरं! सारखं डोक्याला हात लावून बसतीया.''.नशीचं बोट नाकाला लावत आजी बोलली. ''आता कुठं दाखवायचं राहलयं? सगळं करता करता पार दमलो की मी! ''दुधाची चरवी टेकीत भाऊ बोलले. ''आरं बाबा हे रोजंच कुठवर सयीन करायचं? नागद-याची भागा मनीत व्हती, तीचा कुणीतरी गुरुभाऊ हाय!'' आजीनं नशीच्या डबीचं टोपण आटोपशीर लावलं. बरं मंग! वैरणीचा पाचोळा दावणीत टाकीत भाउंनी शब्द केला. ती भागा मनीत व्हती, तीच्या भावाला सम्द कळतया, काही देवधर्माचं, आवशदाचं, सम्द देतय मनं... आरं दहा दगडं हानून बगावे मानसानं.. तवा उदया त्यो येनार हाय मनं, त्येला दाखवावं म्हंत्ये मी! ''आजी दाखवायचयं तर दाखवं बुवा... पण आसल्या भामटयांचं काय बी खरं नसतय! '' डोक्याचं टापर सोडून घाम पुशीत भाऊ बोलले. त्या रात्री सगळयांनी जेवणं केले व निवांतपणे झोपले. पहाटं आण्णा व्यायामाला तळयाकडं गेले. आम्ही सगळेजन शांत झोपलेलो. मऊ गोधडीच विसावलेलं आपलं स्वप्नमय जीवन पहाटेच्या रेशमी गारव्याने मंत्रमुग्ध होत होतं.. आवं... पळा... मेले! मायीची एक आर्त किंकाळी, झोपेच्या शांत सागराला एकाएकी वादळानं झपाटावं तशी. सकाळच्या निरव शांततेला होरपळून काढणारी. काय झालं कांहीच समजेना, आमची पार घाबरुन गाळण उडालेली, काळजाची धडधड स्पष्टपणे कानांना ऐकू येत होती.. उठून पाहिलं तर... पहाटे माय चुल पेटवायला सरपण आणायला बांधावर गेली असताना... सरपणामध्ये तिने भला मोठा साप उचलून आणला होता. जेंव्हा तीच्या ते लक्षात आलं तेंव्हा भितीनं थरथर कापत माय पार भांबावून गेली होती. साप जागचा हालत नव्हता, त्यानं उंदीर गिळला होता. डोक्याच्या सनकीत मायीला काहीच समजलं नव्हतं. अशा अनेक जिवघेण्या प्रकारांना माय सामोरं जात होती, याला कारण होतं ते मायीचं डोकं. या रोजच्या दुखण्याला घरचे सगळे वैतागले होते. तिला कुणीच निट बोलतही नव्हते. सनकीमध्ये कधी माय जास्ती भाकरी टाकायची, तर कधी खुपच थोडक्यात हात धुवायची. चहात कधी साखर विसरायची तर कधी भाजी फिसकायची. भाजीत मिठ नाही म्हणून कुणी ताटावरुन उठायचं, तर कधी खरटघोट भाजी म्हणून भाऊ ताट फेकून हानायचे. कधी भोवळ आली की माय दुधानं हात धुवायची, लक्षात आल्यावर पुन्हा डोकं बडवून घ्यायची. चक्कर आल्यावर ब-याचदा मायीच्या हाताला चुलीतला विस्तव पोळल होता.


त्या दिवशी दुपारच्या पारी सगळेजन आंब्याखाली शेंगा तोडत बसले होते. माय हसून बायांना गप्पा मारत होती, इकडच्या तिकडच्या गप्पांसोबत शेंगा तोडण्याचा सपाटा चालू होता. कुत्र्याचा

भुंकण्याचा आवाज आला म्हणून वर पाहिलं तर... वरच्या माळावरुन दोनतीन माणसं उतरताना दिसत होती. मानसं जवळ आले.त्यात भली मोठी दाढी वाढलेली पांढ-या केसांचा एक साठीच्या आसपासचा इसम होता. सगळेजन आंब्याखाली आले. भागाबाई जवळ आल्या व त्यांना पाणी देत म्हणाल्या, ही पोरगी दोन वरसानं लई आपीष्टा सईन करतीया.. पर तिला गुण येत नाही! चोकस नजरेनं त्यानं मायीकडं बघीतलं, हातातला तांब्या खाली ठेवला व मायीच्या डोक्याला हात लावून बघीतलं. जोरात डोकं दुखतय ना? चक्कर येतेय, काही कळत नाही, वेड्यासारखं होतयं... असंच ना? मोठा वैद्य असल्यासारखा तो मानुस बोलू लागला. माय फक्त हो ला हो असंच उत्तर देत होती. तपासून झाल्यावर त्यानं थोडावेळ शांत झाला, खिशातला बीड्यांचा कट्टा काढला, त्यातली एक बीडी आटोपशीर पणे काढली, काडी ओढून पेटवली व झुरका मारुन भागाबाईकडं बघत बोलला, भागा ह्या पोरीचं दुखनं लय वंगाळ हाय! सगळयांच्या नजरा त्याच्याकडं लागल्या होत्या, कान असुसले होते. आता हा काय आजार सांगतोय हे ऐकायला. म्हंजी मला नाही कळलं काय ते! भागाबाई शंकेने बोलल्या. . ह्या पोरीला डोक्याचा कॅन्सरा हाय! तोंडातलं धुपन बाहेर सोडत तो माणूस संहजपणे बोलून गेला. माय विजेसरखी जमिनीवर कोसळली. प्रचंड धक्का बसला तिला. गडबडा लोळत, रडत आम्हाला पोटाशी कवटाळत होती, दोन बाळाला गोंजारत रडत सारखा आक्रोश करत होती. ती आता सगळया जगापेक्षा वेगळया अशा तिच्या जगात भावनावश झाली होती. तिला तिच्या लेकरांशिवाय कुणीही दिसत नव्हतं. आता माय मरणार, मायलेकरांची ताटातुट होणार, क्षणात सगळं विस्कटायला चालू झालं. आजी रडायला लागली, संपलं... सगळं संपलं.... संध्याकाळी जेवताना चर्चा सुरू झाली, त्यात असं ठरलं की, आता यापुढे माय कधीच लहान बाळाला पाजवणार नाही. स्वयंपाक करणार नाही. आजीनं बाळाला दुपार पासूनच मायीच्या वेगळं केलं होतं. मला पण भिती दाखवली होती. त्या रात्री माय कसलीच झोपली नाही, गोकुळात असूनही एकटी एकटी रात्रभर आमच्या भोवती फिरत राहीली. आम्ही लेकरं झोपलेलो असताना आमच्या गालावरुन हात फिरवायची ओठांवर ओठ ठेवायची, प्रेमांन कुरवाळायची, वात्सल्याचा हा वर्षाव देखील त्या वेळेने पोरका केला होता जनू. आमच्या जवळून उठून भाऊंच्या पायथ्याला जायची, त्यांच्या पायांवरून हाथ फिरवायची, व एकाएकी उमाळा दाटून आला की मग सारखं रडायची._ या काळात आण्णा बाहेरगावी आत्याकडं गेले होते. दोन दिवसांनी ते परत आले. यायला रात्री खुप उशीर झाला होता. रोजच्या प्रमाणे त्यांनी सगळयांना खुप प्रयत्न केला. पण... पण... कुणाही जास्त बोललं नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे घडलेला सगळा प्रकार आजीने आण्णांना सांगितला.

उजाडताच मायीला दवाखान्यात नेण्यात आले. त्या दिवसभर आम्ही पोरक्यांसारखे गुडघ्यात माना घालून बसलो होतो. लहान बाळ रडून रडून थक्क झालं होतं. तालुक्याच्या गावी मोठया दवाखान्यात मायीच्या तपासण्या सुरू झाल्या. डोक्याचे फोटो, रक्ताच्या चाचण्या, सगळं करून घेतलं.

पुढच्या दोन दिवसांनी मी व बारका भाऊ पाण्याच्या दांडाभोवती खेळत होतो. घराकडून आण्णा येताना दिसले. आम्ही पळत त्यांना आडवे गेलो, आण्णा आगदी हसत होते. त्यांनी मायीच्या सगळया चाचण्यांचे रिपोर्ट आणले होते. झाडाखाली आल्यावर आगोदर माझ्या पाठीत दोन दणके मारले, कान पिनगाळून दोन शिव्या हासडत म्हणाले, किती आंग भरविलय रं पाण्यानं.... व्हगाडया! तुला कळत नाही का, तुझ्या महागं ते लेकरुबी चिखलात फिरतय की! मी मुकाटपणे रडत, फिटणारी चड्डी सावरत आजीकडं गेलो... काय झालं, काय मनले डाक्तर? आजीनं काळजीनं विचारलं. तसलं काही नाही तुम्ही उगच कुणाचंबी कायबी आयकतावं ! उगच डोस्क्याला ताप करुन घेताव, च्या मायला त्येच्या .... कोण म्हणालीस त्यो मान्स... आरं अशानं जीव जाईल की येकांद्यचा! आण्णा दात ओठ खात होते. डॉक्टर म्हणाले तसं काहीही नाही, डोक्याला थोडा मानसिक तान आहे. या व्यतीरिक्त कुठलाही रोग नाही. हे ऐकताच माय पळत आली... आम्हाला पोटाशी धरलं, बाळाला कवटाळलं... आनंदाने आश्रु ढाळीत कितीतरी वेळ माय आमच्या डोक्यावरुन हात फिरवीत होती, पटापटा मुके घेत होती.... ■

जवा-तवा मनं तू मोठायस् न तू मोठायस् आका रानात गेली मंजी नाऱ्याला संबाळा, त्यायचे भांडण सोडवा बाबाचं कामबी ऐका, वासरायनी सोड-बांद करा, म्हाताऱ्या  हानीत पाण्यावर न्ह्या, गिरणीतून दळुन आणा,किती काम अन् वर मनं तू मोठा झालास. मथी, नाय मातर रडू रडू पाहिजे ते घेतात.भण्याचा राग काढत हात होता.



# मोठाय् नं मी?

**आबासाहेब वाघमारे**
ज्येष्ठ साहित्यिक,परळी वै.

झुंगराक्का सकाळचं शिळं काम आटपीत होती. झाडलोट करुन तीन चुल पेटवली. आज तीन खाखड्या घालायचं ठरवलं होतं. म्हणूनलौकर लौकर आटपायच बघत होती.तीन काटवट समोर ओढली पिठाचं घेतलं अन् समोर बघितलं.

गोधड्यावर खुडू-मुंडू होउन तीघं लेकरं झोपले होते. सात वर्साचा थोरला भग्या, मधली पाच वर्साची मथी अन धाकला नाऱ्या दोन वर्साचा. तीचा नवरा महादबा तीच्या बरोबरच उठला होता. गोठ्यात शेणचाऱ्याचं बघत होता. तीला काय ठाउक ती उठली, भग्याला हाका मारीत त्याचं पांघरुण तीनं खसकन ओढलं. भग्या हातपाय पोटाशी घेऊन दुसऱ्या अंगाडावर झाला. झुंगराक्काला राहवलंच नाही. अगदी काउन मनली,घोडसं झालय माय परिक कळत नाई ह्याला.

झुंगराक्काचा हरिपाठ सुरु झाला. तसा भग्या उठून बसला नि तडक बाहेर गेला. झुंगराक्कानं भाकरी थापाया सुरुवात केली. कोवळी पिवळी उनं अंगणात पसरु लागली भाकरी कालवणं करुन झाले.काटवटीतलं पाणी टाकायं ती अंगणात आली तर....

अंगणात 'आका का बोका' चा डाव रंगला होता. भग्यानं, मथीनं शेणाचे पोव वाटुन घेतले होते. मथी शेणाची वाटी करीत होती. अन् भग्या हीऽहा हासत होता. मथी ''मी नाई जा ऽऽ'' म्हणून



थलथलत होती. बाजुस भोंगळा नाऱ्या हे बघत होता, झुंगराक्कानी हे सर्व बघितलं.काटवटीतलं पाणी फेकून तिथंच उभी केली आक्का येऊन वल्या हाताने भग्याच्या पाटीत एक दणका घातला. '' मुडद्या ह्याच्यासाठी उठविलं व्हायरे लौकर, लेकरुन मोठं झालं की हाताखाली येतय् मन लौकर. एवढं मोठ झालय माय पर आकलीत माती ह्याच्या.'' भग्या तसाच चुरमाळीत उठलान अं ऽऽ अंऽऽ करीत न्हानीच्या धोंड्यावर गेला तोंडं धुतलं आन बापाचा निरोप सांगायला गेला.

आता हे नेहमीचचं झालय. काल नाही का इनायकरावच्यात् आवतन होत: त्यायच्या पोतीची समापती होती. महादेवाला तर लाख काम होती. जाताना त्यानं झुंगराक्काला सांगितलं होतं. मजं काई जाणं होतं नाई. दुपारी भग्याला लाऊन दी' भग्याचं पोट दुखतं होतं शिवाय पंक्तित जेवायला भग्याला आवडायचं नाई त्याच्या जेवणाला वेळ लागायचा. अन लोकं लौकर उठायचे म्हणून भग्या ऐकूणही जाणारच नव्हता, पण दुपारी झुंगराक्काच म्हणाली, जा माय् भगू तूच मोठाय्स माय आता, अन् जावं लागलं.

भग्याला राग आला त्याला वाटलं सांगावं जवा-तवा ताटात घेउन जेवाय मथी हायनं ! अन् आमी आपलं पंक्तिला जा. का तर मन तू मोठा झालास.पण भण्यानं हे आपलं मनानच महादबानं दसऱ्यासाठी नाऱ्याला कुडतं अन् मथीला झगा आणला. तवा झुंगराक्का मनली दिकिल 'आवं भग्या तेवडा व्हायला आता' तर महादबा ''काय होतं त्याला नसलं मनुन मोठाय् ते'' मनला आन् सगळं तिथचे आटलं भग्याला दसऱ्याला नवी कापडं काही मिळाली नाहीत. आन् वर मंजी मथीन् नाऱ्या नटूनटू मिरवत होती.

जवा-तवा मनं तू मोठायस् न तू मोठायस. आका रानात गेली मंजी नाऱ्याला संबाळा, त्यायचे भांडण सोडवा बाबाचं कामबी ऐका, वासरायनी सोड-बांद करा, म्हाताऱ्या हानीत पाण्यावर न्ह्या, गिरणीतून दळुन आणा,किती काम अन् वर मनं तू मोठा झालास. मथी, नाऱ्या मातर रडू रडू पाहिजे ते घेतात.भग्याचा राग काढत हात होता.''

एके दिवशी कदमाचे तात्या घरी आले आन् झुंगराक्काला मनले भाबी पैठणच्या जत्राला जावं मन्तोत आम्ही. चौंग जण निगालेत. महादाला मनलं तर, मनतोयं मला रगड कामं तवा काम तर नेहमीचीचयत् तूमी मना मंजी काढतो त्याला, पैशाची बी जोड नाई. तवा झुंगरक्का म्हणाली, 'एवढी इनंती कतेत तू जावा. बगन् मी सगळ, वेळ काई पुना पुना ये नसती. तुमी निचिंत जावा. हे ऐकलं तस्सा मंग्या मधिच मनाला, मला बी यायचं जत्राला तशी  जवळच बसलेल्या झुंगराक्कानं फाकन् त्याच्या थोबाडीत द्याला मरी आली ! कवा काय बोलावं तेबी कळत नाही माय ! धुताड ! नुस्ताच व्हाड घोडा! अन् सर्वासमोर भग्याला चुरमाळीत बसावं लागलं.

ठरल्या प्रमाणे महादवा पैठणला गेला ही संधी साधन भग्या पोहायला गेला. काय निमित्त झालं कळालं नाही पण भग्याला ताप भरला. आज तिसरा दिवस पण भग्याचा ताप गेला नाही. वैदाला दाखविलं कोणी म्हणालं डॉक्टरला दाखवा पण झुंगराक्काला काई सुदरना. .

रात्री जेवण वेळेला जत्राचे लोक परतले. महादबा आला. घरी बगतो तर सगळं चिडी-चिप, मदल्या घरात बाजावर भग्या निजल्याला. अन् उशाला झुंगराक्का, भक्तीनं दोघी-तिघी बसल्याल्या. महादबाला बघताच झंगराक्काचे डोळे पाझरु लागले.

भग्या तापात बरळू लागला. जास्ती झालं तवा डॉक्टर आणला. त्यानं इंजेक्शन दिलं, गोळ्या दिल्या आणि, घाबरु नका घाम येऊन ताप उतरेल' असं म्हणून डॉक्टर गेला.

रातरभर झुंगराक्कान् महादबा भग्याजवळ बसुन होते. भग्याला घाम सूटला होता. अन् झुंगराका ते पुसुन काढीत होती. राती त्यांनी जागून काढली सकाळी त्यांना डोळा लागला.

झुंगराक्काला चेव आला तेव्हा चांगलचं उजाडलं होतं.  झोप का काय मनाव् ही म्हणत झुंगराक्का उठली. तिच लक्ष भग्याच्या अंथरुणाकडे गेलं तर ते रिकामचं. तीथं भग्या नव्हता. तीनं महादबाला हालवलं आवं! भगा कुटं गेला वं ! कुटय् भगू''महादबा झोपेतून जागा झाला. त्याला ही कळेना भगू कुठय.

दोघंही उठली दारात आली तर गोठ्यात भग्या बैला पुढली वैरण सामरी करीत होता.

'' आता, माय भगू ! कशाला रे आलास इथं,म्हणत झुंगराक्का तिकडं धावली पण भग्या तशीच वैरण सामरी करीत म्हणाला तुमी उटला नवतात. पण मीच उटलो,मोठायनं मी.''

झुंगराक्कानं भग्याला उराशी धरलं. तीचे डोळे घळघळा वहात होते. ■

पायाला वाळू थंड लागत होती. गुदगुल्याचा भास जाणवत होता. रातकिडयांची किरकिर, टिटव्यांचा टिवटिवाट, झाडावरच्या पक्षाचा विशेष मोरांचे ओरडणे, फडफडणे, दूरवरून कोल्हयांची कुईऽ कुईऽ कुईचा आवाज कानी येत होता. सारं माझ्यासाठी नवीनच होतं. आमचा सासुल जवळच्या चंदनवाडीच्या कुत्र्यांना कळल्यानं त्यांचा वाढलेला आवाज, बेडकांनी वाढवलेला डरांव डरांव, सारं बघून मी दिकच झालो होतो. पण...



# शिकार

**बडे नागनाथ पाटलोबा**
ज्येष्ठ साहित्यिक,चोपनवाडीकर

दसरा दिवाळीचा मौसम. आगाताची सुगी ऐन जोमात आलेली. पीकं जोमानं डोलत होते. जो तो यंदा मायंदळ माल होईल असं भाकित मांडत होता. शिवारात आनंदी वातावरण होतं. दिवाळीचा सण काही दिवसांवर आला होता. सासुरवासिनी पोरी-सोरी माहेरी येत होत्या. आलेल्या पोरी-सोरी एकमेकींच्या घरी जाऊन भेटी गाठी घेत होत्या. आपआपले आनभाव, सुखा दुःखाची उकल करीत होत्या. घरा दारात नातवंडं आल्यानं किलबीलाट वाढला होता. शेतकरी शेतातले दिसभर काम धंदे करण्यात दंग होते. त्याच्या जिवाला आराम मिळत नव्हता. तरी आया-बाया रात पहाट करून दिवाळीची तयारी करीत होत्या. दळण-भरडणा रातच्याला जात्यावर ओव्या गाऊन पार पाडीत होत्या.

आमचं गाव तसं फार रशीक ! ज्याचे त्याचे रशीक ठरलेलेच ! गावानं सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वारसा जपलेला. पैलवानाचा खेळ, आरादी मेळा, भजन, किर्तन, भारूड, नाटकं, लेझिम, टिपरे, गायन, वादन ,पोथी-पुराण, वराती, सोंग, वाघ्यामुरळी, पोतराज, गोंधळी, लघुचित्रपट इत्यादी ते तमाशा पर्यंत सारा आस्वाद कमी-अधिक गावानं घेतलेला. कोणते ही कलाकार गावाला आले की, महिना पंधरादी गाव सोडायचे नाहीत. यंदा तर दसऱ्यापासून गोंधळयांनी तळ ठोकलेला. दिवसभर कामधंदा अन् रातच्याला शीण घालवाय गोंधळी, असं समीकरणच जणु ! हौसी मंडळी

त्यांच्या तैनातीत गुंतलेली. गावाच्या मध्यभागी चौकात म्हणजे वडाखाली रोज गोंधळयाचा कार्यक्रम चालायचा. रात्री नऊला त्यांची कला सुरू झाली की पहाटं तीनलाच संपायची. पैशाची खूप उधळण व्हायची. गोंधळयानं साज चढविला, संबळ - तुणतुणं वाजविलं की, पेतं तुटलेल्या लेकरापासुन ते मान हालायलेल्या म्हाताऱ्या माणसापर्यंत सारेच बघायला यायचे. लाईस-पीकराचा आवाज कानी पडायला उशीर की, गराऽ गराऽ गराऽ सारेच गोळा व्हायचे! माझ्या शिनंचे शाळकरी पोरं बी माळवदा वरल्यावरून अभ्यास सोडून हया माळवदावरून त्या माळवदावर असं करत करत वडाचा चौक गाठायचे. कुणाला विशेषतः घरच्यांना ओळखू येऊ नये, म्हणून अंगावर पांघुरणाचे घोगते पांघरूण वल सावलीला बसून ऐकायचा चान्स घ्यायचे !

पहाटच्याला गावतल्या चावडीत चातुर्मास भजन चालायचे. म्हणजे पहाटं नित-नेमानं चार महिने काकडा चालायचा गावात भजन्यांची ही संख्या कमी नव्हती. चांगले पाच-पन्नास माणसं जमायचे. गावोगावी नावजलेले भजनेच ते ! चांगलं नाचू नाचू काकडा व्हायचा. पहाटं सुरू झालेला काकडा फटफट उजडे पर्यंत चालायचा. हया गावचा त्या गावाला स्पिकर, शिरवाळ असल्यानं सरळ ऐकू जायचा. घाटनांदूरला आठवडी बाजार असायचा. तिथं गाठी भेटी झाल्या की, दुसऱ्या गावचे लोकं म्हणायचे, काकडा करावा तर चोपनवाडीनंच ! त्यांचं म्हणनं खरंच असायचं ज्याला पाठीवर रेघ वडता येत नाही. त्यालाबी रोज काकडा ऐकून ऐकूनच पाठ झालेला असायचा. कित्येक बायां आजही काकडा म्हणत्यात !

असंच एके दिवशी बसल्या बसल्या गावात कुणं हुल उठविली की, रेनला ढवांमधी लयी मासे हायतं. जसं गाव धार्मिक तसंच यडवाकडं (मटन) खाणारांची ही संख्या कमी नव्हती. जाणुन बुजुन शिकारी माणसं ती! कधी इकत तर कधी शिकार करून ते आपली तलफ भागवायचे. त्यांचेही आपआपले ग्रुप ठरलेले असायचे. तवा त्या हौसी माणसानी ती उठलेली हुल खरी का खोटी याची चाचपणी केली होती. रेनानदी गावापासून दोन तीन कि.मी. असली तरी तिथंपर्यंत त्यांनी धाव घेतली होती. ज्याला त्याला खात्री पटली. अन प्रत्येक ग्रुप ती शिकार आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी आयडीया आखु लागले. मधल्या आळीच्या सोमादाच्या अन रंबादाच्या ग्रुपनं खुणगाठ बांधली, अन् लागले तयारीला. ठरल्याप्रमाणं सगळयांच्या आगुदर आज रातच्यालाच डल्ला मारायचा बेत आखला. पण.... भिंतीला कान म्हणत्यात तसं त्यांच्या शेजारच्या सतुला हि गोष्ट कानी पडली. सतु पासुन मावल्या सावध झाला. दोघंबी त्यांच्यात सामील झाले. रंबादाचे दोन पोरं तर तयारच होते. शिकार म्हणलं की त्यांच्याही बाहया फुरफुरल्या.



रातरची येळ होती. नेटकीच पोथी संपून वडाखाली गोंधळयाचा गण, देव आवळणी संपुन कथेला सुरू झाले होते. कधी नाही ते मी ही घरच्यांचा डोळा चुकवून गोंधळयाकडं धाव घेतली होती. कार्यक्रम रंगात आला होता. एवढयात माझा मित्र मावल्या तिथं टपकला. हळूच तेवढया माणसातून त्यानं नेमकं मला हेरलं. अन मला पटकन खुणविलं. तसा मी ही लगीचं निमित्त करून अंगावरचा घोंगता सावरीत सावरीत उठलो. अन् बाहेर आलो. मावल्यानं मला काय सांगायचं ते सांगितलं. ऐकुन माझी तळयात - मळयात अवस्था झाली. माझं पुढं आड मागं हिरं झालं होतं. एक मन म्हणीत होतं. तू जन्मजात माळकरी आहेस ! तुला तुझ्या आईनं लहानपणीच माळ घातलीया. आता तर पोथीबी वाचायलास! नाहीतरी जाऊन तुझा उपेग काय ? तू खाणार आहेस थोडाच तवा जातोस कशाला ? तर दुसरं मन म्हणीत होतं. काय व्हायलंय. आपल्याला बघायला तर मिळंल, शिकार कशी करतेत ते! आमच्या घरात फकस बाबाचं मटन खाणारे होते. बाकी सारे माळकरी ! हो, ना. हो, ना, करत मी ठाम निर्णय घेतला अन झालो त्यांच्यात सामील !

गावाच्या कडला झाडाच्या वलसावलीत सारेच गोळा झालेले ! शिकारीची जय्यत तयारी झाल्ती. सोमादा अन रंबादा शिकारीत भारी माहिर होते. तेवढयात मावल्या त्याच्या मागं मी तिथं टपकलो. आमच्याकडं बघून सोमादानं रंबादाला धुंदकिलं अखेर सारा गाव गोळा केलासच की ? रंबादा म्हणू लागले, म्या कशाला सांगू ! मी नाही बुवा मी नाही. सलामीला तोफ डागल्यागत मला वाटू लागलं. तेवढयात सारेच पटापटा उठले. रातचे दहा वाजले असतेन, आम्ही सारेच चोर पावलानं भेंडेकर वाडयातून खारीत शिरलो. कारण लातूर पांदीतला चिखल पुरता वाळला नव्हता. म्हणून लोकांनी शेता-शेतानं भर पिकातून पायवाट पाडली होती, वाट कसली नगामोडी वळणावळणाची ती! धड चालताही येत नव्हते. उटया-आवटया ठसा ठसा पायाला लागून आम्ही ठेसकाळत होतो. वाट वळणं घेत, दोन दोन परोस पिवळे, वऱ्हाडी उंच गेल्यानं खाली अधार भिन्न, अरूंद, असल्यानं

चिपाडाचा आवाज कडा कडा येत होता. तरी पण रेल्वेच्या डब्यासारखं सोमादाच्या मागं किशू, इशू, मी, सतू, मावल्या अन शेवटाला रंबादा, क्रमवार एकामागं एक पावलावर पाऊल टाकीत आंग चोरून चालत होतो. चालताना दबक्या आवाजात इथं खड्डा हाय, बांध आला बघा, वाटंत दगड हाय बघा, इथं कुपाटी हाय, झुडपाचा फणगारा लागल, अशा सोमादा सूचना देत होते. रेल्वेचं इंजिन जिकडं नेईल त्याच्या मागे डबे जावेत तसे आम्ही सोमादाच्या सूचनांचे पालन करीत होतो. पिकाचे धाट, पानं थोबाडाला सप - सपा लागायचे, पायात घुटमळायचे, मधेच कुणीतरी व्हरबडायचं. एवढयात अचानक घुड घुऽ घुऽ असा आवाज आला. ऐकून माझ्या काळजाचं पाणीच झालं. तेवढयात सोमादा म्हणाले,घाबरू नका गाबरांनो ! व कट पाखरू वरडलंय ! भिती वाटत होती, राम राम म्हणीत होतो, खाली मान करून चालत होतो. सोबत दोन कंदीलं असूनसुध्दा रंबादानं लावू दिले नव्हते. कारण दुसऱ्याला कळू नये याची खबरदारी होती. म्हणजे जोडे असता काटे मोडले म्हणण्याची वेळ होती.

कराडाचं शेत वलांडून, सावकाराच्या शेतात शिरलो न् शिरलो तोच आवाज आला, कोण हाय रं ? एवढया रातच्याला कुठं चाललाव ? सोमादानं सुटता सवाल केला, तुझ्या मायला तुला काय करायचंय ? मायला पोटावरचं कुठलं, पण हाटकाय लागलंय! तुला कशाला पाहयजी रं चांभार चौकशा' ? लंगडं ते लंगडं पड गप गुमान' ! भुरटया चोरानी कणसं खुडून नेऊ नये म्हणून सावकारानं बाहेरचा माणूस राखाय ठेवला होता. त्याला आटूळयावरून आम्ही चांदण्या रात्रीत दिसत होतो. म्हणून त्यानं हाटकिलं होतं.

बघता बघता तुकाईचं रानं वलांडलं, बामनाच्या वावरातून चक्क रेणा नदीच्या आलकडंच्या गाळाच्या माथ्यावर आलो. सारेच थोडा वेळ थांबलो. मी थकवा अन् भितीनं पार गळालो होतो. थांबा ! म्हणताच जीव भांडयात पडल्यागत वाटलं. सोमादा, रंबादांन काडी - बिडी केली. आम्ही पोरं पोरं मात्र थोडया अंतरावर बसलो होतो. त्या दोघांनी कानाला कान लावले. पुढील रणनीती ठरविली. अन् रंबादानं आम्हाला इशारा केला. तिथून लातूर पांदीत शिरलोत लगेच पुढं रेणा नदीत आलोत.

चंद्र माथ्यावर आल्यानं चांदण्यानं सारं ठळक दिसत होतं. नदीपात्रात लातूर रस्त्याच्या कडीलाच वाळू साचून उंचवटा झालेला. त्या टेमकाडावर जवळचे सामान ठेवायचे ठरले. सोमादाचा पटका, सदरा, नवं कोरं घोंगडं, हातातली काठी, रंबादाचा सदरा, पटका, काठी, सतुचा सदरा, कुराड, काठी, मावल्याचं वेळ पडल्यास ढंव उपसाय आणलेलं लोखंडी टोपलं, सदरा, किसू-इशूचे सदरे कु-हाडी तसेच साऱ्यांचेच बुटं - चप्पलं, हे सारे सामान रस्त्यालगतच ठेवल. डोक्याला साऱ्यांनीच गमजे गुंडाळले. मोठयांनी धोतरं तर पोरांनी चोळणे पाण्यात भिजू नयेत म्हणून वर गुंडाळले. दोन्ही कंदीलं चेतविले. सतू अन् किशूनं हातात घेतले. दोन ग्रुप केले. सामान मात्र तिथंच

ठेवून सैनिक लढाईला जावा व शत्रुवर तुटून पडावा, त्या तयारीने आम्ही शेलवटीच्या मोठया ढवाकडं वळलो.

शेलवटीच्या ढवातलं पाणी गारंढण ! पण सारेच ढवात शिरले. मी अन् मावल्या मात्र बाहेर वाळूवरच मासे वेचाय थांबलो. पायाला वाळू थंड लागत होती. गुदगुल्याचा भास जाणवत होता. रातकिडयांची किरकिर, टिटव्यांचा टिवटिवाट, झाडावरच्या पक्षाचा विशेष मोरांचे ओरडणे, फडफडणे, दूरवरून कोल्हयांची कुईऽ कुईऽ कुईचा आवाज कानी येत होता. सारं माझ्यासाठी नवीनच होतं. आमचा सासुल जवळच्या चंदनवाडीच्या कुत्र्यांना कळल्यानं त्यांचा वाढलेला आवाज, बेडकांनी वाढवलेला डरांव डरांव, सारं बघुन मी दिकच झालो होतो. पण... मनात नाही नाही ते विचार येत होते. भेंडेकरांच्या माळावरचा खतरनाक म्हसोबा ! शेलवटी जवळचा चकवा हे सारं मी ऐकुन होतो. रानटी प्राणी पाणी प्यायला रात्री आले तर त्याचं काय ? जीव धांडारून जात होता. अंगाला घाम फुटत होता. पण मी मोकळा आव आणून पादरधिटाईनं बाकीच्यांना जाणवू देत नव्हतो. सतु, सोमादा, इशुचा एक ग्रुप तर रंबादा व किशूचा दुसरा ग्रुप आपआपल्या कामाला लागले. त्यांनी कंदिलांच्या वाती चढविल्या होत्या. रॉकेल टाकी पाण्यात बुडोस्तोर कंदिलं खाली दाबले होते. अन् चमत्कार दिसू लागला. ते मी बारकाईन बघतच होतो. पाण्यातले मासे कंदीलाच्या उजेडाने पटापटा वर येत होते. कैक तर त्या उजेडाच्या दिशेने धडका मारत होते. सतू कंदिलाला तर सोमादा अन् इशू मासे पकडून फेकित होते. वाळूवर पडल्याने त्याची ती तडफड, जीव वाचवण्याची धडपड, डोळयांनी मला बघवत नव्हती. वाईट वाटत होते. इकडं येऊन मी चूक केली असं माझं मन म्हणीत होतं. माशासारखी माझीही घालमेल होत होती. असल्या हया शिकारीचा पश्चाताप मला सहन करावा लागत होता.

एवढयात इशूनं सोमादाला खुणविल होतं. तसे ते माझ्यावर खेकसले, आरं नुस्त बघतोस काय ? तुला बघाय आणलंय का ? पटापट मासळया वेच. अन् त्या धुडक्यावर टाक ? हो ! हो ! हो ! म्हणत माशाला उचलायला सुरू केलं. त्यांचा स्पर्श मला नवाच होता. त्यांचं धडपडणं नवीनच होतं. नाईलाजानं तरीही मासे उचलीत होतो अन् धुडक्यावर टाकत होतो. आमच्या सारखंच दुसऱ्या ग्रुपचा उद्योग चालु होता. किशू अन् रंबादा मासे पकडायचे अन् मावल्या वेचायचा. असा आमचा कार्यक्रम बराच वेळ चालला. रातर उतारात पडली होती. मासेही वर येणं बंद झालं होतं. येणार तरी कुठुन ? मासेच ढवातले संपले होते. कारण कुणीतरी या ढवातल्या माशांवर अगोदरच चट्टा मारला होता. हे साऱ्यांना कळून चुकलं होतं. मासे संपले म्हणून रंबादानं सोमादाला सांगितले. तवा सारेच पटापटा ढवा बाहेर निघाले. धुडक्यां शेजारी वाळूवर बसले. त्या दोघांनी बिडया तर किशू-इशूने तंबाखूवर ताव

मारला. आपल्या आधी कुणी चट्टा मारला असंल, यावर खल सुरू झाला. एवढयान । काय होईल ? आडजिभ खाय अन् पडजिभ बोंबलत जाय, असं रबादा म्हणाला. तवा भरपूर माशासाठी दुसऱ्या माल्याच्या ढवाकड जायचं ठरलं. मला अन् मावल्याला सामान आणायला पाठवलं.

मला जावं वाटत नव्हतं, तरी पण हो ला हो करत डोळयावर कातडं ओढून मावल्या संग निघालो. ठेवलेल्या जागेवर सामान दिसत नव्हतं. जवळपास इकडं तिकडं बघितलं. पण घावत नव्हतं. म्हणून आम्ही साऱ्यांना सांगितलं, सामान सापडंना' ! तसे सोमादा म्हणाले, बैंराती कुठले ? सामान कुठं जाईल ? त्याला का पायं फुटलेत व्हय ?' आमच्या मदतीला सतु, किसू, इशू पळत धावून आले. त्यांनी ही पाहयलं पर सामान काही केल्या सापडेना ! प्रत्येक जण इथंच ठेवलं होतं, गेलं कुठं ? असंच म्हणीत होता. तवा शेवटी ते दोघं ही आले. पाहु लागले. साऱ्यांचेच पायं गळाले. एकमेकांवर पडू लागले. ओसका ओसकी सुरू झाली. आधीच ढवातल्या पाण्यानं अंगावरचे कापडं ओले चिंब झालेले, त्यात वाऱ्याची झुळूक आली की, अंगाला झोंबत होती. सोमादा म्हणाले, मी इथं हया रस्त्याशेजारी ठेवू नका म्हणीत होतो. पण ऐकतंय कोण ?'' साऱ्यांनाच हळहळ लागली होती. काठ्या, कुऱ्हाडी, टोपलं, बदलायचे धोतर, साऱ्यांचे सदरे, नवं घोंगडं, सगळयांचे बुटं चप्पलं सारं । सामान गायब झाल होत. कुणीतरी लक्ष राखून नेलं होतं. पण कुणं ? शंकावर शंका येत होत्या. पण... कुणावर शंका घ्यायची कळत नव्हतं. तेल गेलं तूप गेलं हाती धुपाटणे आले होते. सर्वांनी डोक्याचे गमजे काढले, अन् जमा झालेले मासे पसा दोन पसा वाटून घेतले. । माझी तर ना घर का ना घाट का अशी अवस्था झाली होती. फक्त । अंगावरच्या कपड्यानिशी, अनवाणी पायान आम्ही गावाकडचा रस्ता धरला. डोंगर पोखरून फक्त उंदीर सापडला होता.

पहाट झाली होती. बैलं गावातून सुटले होते. शेतकरी त्यांना चाराय नदीला आणित होते. त्यांच्या गळयातील घाटया घुगाराचा आवाज कानी घुमत होता. सारं गाव कसं सामसूम झाले होते. काकडावाले भजनाच्या तयारीत होते. बाया नेटक्याच जात्यावर बसल्या होत्या. त्यांच्या गाण्यांचा सूर कानी पडत होता. आम्ही मात्र सारेच अपराध्या सारखं चोरपावलानं गावात शिरलो होतो. अन् आपआपल्या सोईनुसार जणु काही घडलंच नाही असं भासवून आपआपल्या परीनं झोपी गेलो होतो.

सकाळ झाली. प्रत्येकाच्या घरी ज्याच्या त्याच्या परीनं हजेरी घ्यायला सुरू झालं. विचारपूस होवू लागली होती. काही केल्या तळहातान सूर्य झाकणार थोडाच ! तसं माझ ही पितळ उघड पडाय वेळ लागला नाही. मी सकाळी - सकाळी लवकरच पाठीवर दप्तर मारलं होतं. मी घरच्यांची नजर चुकवून शाळकडंचा रस्ता धरला होता. मला वाटलं, आपला जीव भांड्यात पडला! पण ... डालग्याखाली लपवलेला कोंबडा आरवायचा थोडाच थांबतो ! भावानं अचानक हाक मारली व

विचारलं, पायात बूट घातला नाहीस ? मी सांगितलं, सापडना झालाय', तुला बुट सापडलंच कसा ? त्यो कांही सापडायच्या जागेवर हाय का ? असं म्हणत त्यांनी मला एकदम माराय सुरू केलं. मला चांगलंच धुतल्यानं आरख्ख्या पाठीवर वळच वळ उठले. आख्ख्या पाठीचं दिरडं झालं होतं. मी मात्र मेलो! मेलो ! मला वाचवा ! मला वाचवा ! म्हणत होतो. वारंवार विनवणी करीत होतो. पण.... सोडवायला लवकर कोणीच धावत नव्हतं. कारण झोडपिण्याचं कुणाला काही कारण समजलं नव्हतं. भावाचा ताव कमी होईस्तोर मला झोडपणं चालूच राहिलं. खूप रडारड झाली. पश्चाताप होत होता. कराय गेलो एक अन् झालं भलतंच ! म्हणून माझ्या मनालाच मी खाऊन घेत होतो. आम्ही शिकार करायला गेलो खरं पण आमचीच शिकार झाली होती! कुणीतरी चोरावर मोर झालं होतं. हां हां म्हणता आख्ख्या गावात बातमी पसरली. बाहेर तोंड काढायला जागा उरली नव्हती. जो तो आम्हाला टोमणे मारत होता. शिकार कराय गेला होता म्हणं ! किती आणली शिकार ? का तुमचीच झाली शिकार ! अजुन करायची का शिकार ? अजून करायची का शिकार ? ■

सावित्री ला आश्चर्याचा धक्का बसला ती भिमाच्या सहज बोलण्यावर ध्यान देऊ लागली. एकाएकी विंचवाने ढसावं अंगाची लाहीलाही व्हावी तशी सावित्रीच्या जीवाची तगमग झाली. तिने उन्हा तान्हात जीवाची पर्वा न करता काम केलं होतं. रोजगारातला एक रुपयासुद्धा खर्चीला नव्हता. तिला भीमाचे बोलणे सहज आणि खोटारडे वाटू लागले.



# आईची तन्मयता

**प्रा.नरसिंग उदार**
वसुंधरा महाविद्यालय घाटनांदूर

आकाशात ढगांनी दाटी केली होती .लिंबाच्या झाडावर डहाळीत लपलेली कोकिळा कूहूऽ कुहूऽ करीत होती. गुलमोहराच्या झाडावर पाखरांचा किलबिलाट चालू होता. वैशाख सरत आला . वैशाखातला ऊन मी म्हणत होतं. उन्हाच्या झळांनी पिसाट रूप धारण केलं होतं .मधूनच उठणारी वावटळ फुफुटा उधळीत लुप्त होत होती. नद्या-नाले आटले होते .पाणी आटल्यामुळे कोरड्या पडलेल्या नदीचे पात्र रंडक्या कपाळासारखे उदास दिसत होते.

कडक ऊन्हाच्या माऱ्यापुढे मोठे झाड कोमेजली होती. पानातलं तेज नाहीसं झालं होतं. पाहुण्यासारखे हजर होणारे ढग सोसाट्याच्या वाऱ्याने पसार होत होते. पानाआड लपलेली पाखरे किलबिलाट करून पावसाला आवाहनच करीत होती. त्यांना आता पावसाच्या पाण्यात मनसोक्त जलक्रीडा करण्याची ओढ लागली होती. रणरणत्या उन्हात शेतकरी होईल तेवढे शेतीचे काम उरकून घेत होते. उन्हाची पर्वा न करता रक्ताच पाणी करून कामाला गती देत होते. गेलसालची मेहनत त्यांच्या पदरात पडली नव्हती. अवकाळी आलेल्या पावसाने पोटरीत आलेली ज्वारी हातची घालवली होती. शेतक-यांची दयनीय अवस्था झाली होती.कापसाच्या पिकानं शेतकऱ्यांला कर्जबाजारी केलं, म्हणूनच तो यंदा नव्या जोमानं मातीतून सोनं काढण्यासाठी मेहनत करीत होता. निसर्गाने शेतकऱ्याला

दगा दिला, तसा शेतमजूर उघडा पडला . धन्याचं पिकलं तरच आपलं पोट भरणार....... धन्याचे हात रिते राहिले तर आपण काय  पोटाला बिब्बे घालायचे. या विचाराने शेतमजूर हवालदिल झाला.  . संबा आणि सावित्रीची भयंकर अवस्था झाली. घरादाराला अवकळा आली.  घरादारावर उठलेला ढग दूर व्हावा म्हणून ते धडपडत होते .सावित्री हातापायात जीव आणून धस्कट वेचत होती. तिच्या वयाने पन्नाशी ओलांडली.

तिला पोराच्या भविष्याची चिंता होती. पोरांनं शिकून नोकरीला लागावं, असं तिला वाटे .त्यासाठी ती जीवाचीही पर्वा करीत नव्हती .ऊन, पाऊस, वारा काहीही असो ती घरी बसत नव्हती. एकदा पोराला नोकरी लागली की त्याचं सार्थक होईल असं तिला वाटे .भीमाने खूप खूप शिकावं असं तिला वाटे. सावित्रीची ही ओढ तिला तिच्या उतरत्या वयाची जाणीव होऊ देत नव्हती म्हणूनच ती रोज  धसकट वेचणीला जात होती.  नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून पुरुषासारखं काम करीत होती .  रोजगाराची कामं करताना ती कधीच खचली नाही .तिने स्वतःच्या हिमतीवर दोन मुलीचे लग्न केले . दोन महिन्यापूर्वी तिने एका मुलीचं लग्न केलं होतं.तिच्या परीने तिने लग्नात खूप खर्च केला होता. लग्नापासून चणचण भासत होती, तरीही ती डगमगली नाही. संबा तिच्या रोजगाराला बळ देत होता. तो घरच्या चार म्हशी राखीत होता. म्हशीच्या दूध दुभात्यातून घरखर्च भागत होता. सावित्रीचा रोजगार मागे पडत होता. मागे पडलेल्या रोजगारातून जमल तशी बचत करून पोराकडे देत होती.भीमावर तिचा खूप जीव होता .एवढेच काय त्याच्यावर तिचा मनापासून विश्वास होता. भीमाने स्वतःच्या नावावर बँकेत बचत खाते उघडले होते, आणि तो सावित्रीने दिलेले रोजगाराचे पैसे स्वतःच नावे टाकीत होता. भीमाच्या शिक्षणासाठी ती जिवाचं रान करीत होती .भीमाचा सावित्री आणि संबा यांना अभिमान वाटत होता. अभिमानाने त्यांचा ऊर रबर तानल्यासारखा ताणत होता .सावित्री रानात बायांना पोराची कर्तबगारी सांगत असे .आज ना उद्या भीमा नोकरीवर जाईल ,आणि आपलं स्वप्न साकार होईल असा तिला आत्मविश्वास होता .

वैशाख संपला .ज्येष्ठाचं आगमन झालं. यंदा ज्येष्ठात धोंड्याचा महिना आला होता.नव्या नवऱ्या आपल्या नवरदेवासोबत धोंडे जेवायला जात होत्या. प्रत्येक जण आपल्या कुवतीनुसार मानपान करीत होता. मुलीला आणि जावयाला धोंडे जेवायला बोलवावं असं सावित्रीला वाटू लागलं .आज ती घरीच होती .काम नसल्यामुळे तिला दिवस जात नव्हता. घरात बसल्या बसल्या ती पोरीला धोंडे जेवायला बोलावण्यासाठी निरोप देण्याचा बेत करीत होती. जेवायला बोलावनं तेवढं सोपं नव्हतं. रीत -मोळा, काकण -चोळी आपल्याला घडलं एवढा पैसा भीमाकडं असंल का .... याचा ती विचार करू लागली. संध्याकाळ झाली . दाराच्या दावणीला संबा म्हैशी बांधत होता. एवढ्यात भीमा आला.

अचानक दारात आलेल्या भीमाकडं बघून ती बोलली,
''आरं भीमा धोंड्याचा महिना हाय जनु की ''
'' हो मग काय करायचं धोंड्याच्या महिन्याला''
'' धोंड्याच्या जेवणाला सोयऱ्याला धोंडे खायला बोलवावं लागतया, लोक नव्या नवरीला बोलवायला लागलेत नव्हं का ? आपली बायजा नवी नवरी होऊन गेलीया, तवा तिच्या सगळ्या घराबाराला जेवाय निरुप धाडावा मनते ''
'' मंग बोलवकी, तुला जसं कळतयं तसं कर मला यातलं काय कळतय'''
''तसं नव्ह रंऽ भीमा, तु बी कळता झालास, तवा आपल्या सगळ्यांचा विचार असावा. तुझ्या बापालाबी पुस की कसं कसं करावं ते .''

सावित्री जसं बोलली तसं वागत होती. ती करणीला सढळ हाताची होती. सावित्री असं बोलली तवा हातपाय धुवितच संबा बोलला,
''अगं मी म्हणतो, धोंड्याचा महिना हाय तर घराबाराला बोलवायला खर्च व्हईल. आत्ताच लगीन केलेल्या खर्चाचा बोजा सरला नाही तोवर ह्यो बोकांडी बसलं. सगळी माणसं आली म्हणजे त्यास्नी गोडधोड खायला करावं लागतया.कापड करावी लागत्यात,म्हंजी हजार दोन हजार रुपये खर्चा व्हईल न्हवं.''

बापाचं बोलण भीमाच्या ध्यानात आलं. धोंड्याच जेवण परवडणार नाही. भीमानं सगळा विचार केला ,आणि मग आपल्या मनातल बोलला,
'' माय सगळ्याला बोलवण्या परीस एकट्या बायजाअक्काला आणि तिच्या नवऱ्याला बोलावून घेऊ, म्हणजे खर्चबी झेपाय सारखा होईल.''
मधीच संबा बोलला, '' व्हय मलाबी तसचं वाटतया, माणसानं हात्रुन बघून पाय पसरावे.''

बापलेक असं बोलले तेव्हा तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. तिने मानेला झटका दिला. तोंडाची खोबरवाटी केली. बाप लेकाकडे पाठ फिरवून ती मनाशीच काहीतरी बूट बुट करायला लागली. तिचे विचार खूप वेगळे होते. तिला वाटत होतं की पोरीबरोबर सगळ्या घरादाराला बोलवलं तर आपली वाहवा होईल. लोक आपल्याला नावाजतील. त्यातच आपला मोठेपणा होईल .बायजाच्या घरचे सासू -सासरा ,दिर,नवरा सगळ्यांना आनंद होई. तिला सासर घरी जाच व्हायचा नाही .कोणी घालून पाडून बोलणार नाही. उलटे म्हणतेल सोयरे जालिला जोल मिळाले.जगात चर्चा होईल. पोरीच्या सासरी दुजेभाव झाला तर सोयरे-धायरे नाव ठेवतील. पोरीचा सुध्दा समज होईल की, माय आता पहिल्यासारखी राहिली नाही. आता तिची सगळी वड भीमासाठी आहे. मी आता परक्या घरची झाले

मग माझी चिंता आता कशाला करील या सगळ्या गोष्टीचा सावित्रीला उलगडा झाला. ती पुन्हा पुन्हा रीत मोळा न झाल्यास त्याचे परिणाम शोधू लागली. जेव्हा जेव्हा तिला पक्षपात होईल असे वाटेल तेव्हा तेव्हा ती बसल्याजागी स्वतःशीच हातवारे करून बोलत असे. रीत मोळा झाला नाही तर जगात चर्चा होईल. सोयरे धायरे सावित्री खूप बदलली असे म्हणतील.

न राहून भीमा बोलला, '' माय समद्यला बोलवायला दाम बक्कळ लागतय ,तेवढ दाम कुठून येईल ''

'' बुकात किती दाम हाय रोजगाराचं '' सावित्रीनं भीमाकडे बघत विचारलं ,

भीमान पासबुक न बघताच अंदाजे सांगितल, '' अस्तेल दोन अडीशे रुपये ''

सावित्रीला आश्चर्याचा धक्का बसला ती भिमाच्या सहज बोलण्यावर ध्यान देऊ लागली. एकाएकी विंचवाने ढसावं अंगाची लाहीलाही व्हावी तशी सावित्रीच्या जीवाची तगमग झाली. तिने उन्हा तान्हात जीवाची पर्वा न करता काम केलं होतं. रोजगारातला एक रुपयासुद्धा खर्चीला नव्हता. तिला भीमाचे बोलणे सहज आणि खोटारडे वाटू लागले. ती घरातल्या पेटीकडं हात करीत भीमाला म्हणाली.

'' भीमा ती बुक हिकड आण आंशिक मला त्यातलं दाम बगुदी. त्याच्यामदी सताटशे रुपये तरी फायजी..दोन अडीशे सांगून मला येड्या बांगड्याला भुलवू नकू.''

भीमा पेटीकडे गेला पासबुक उघडून बघितलं तेव्हा त्याला पावणे पाचशे रुपये असल्याचे लक्षात आले.त्याने तिला तसं सांगून पासबुक तिच्या पुढे टाकलं सावित्रीला वाचता लिहिता येत नव्हतं तरीही पडलेले पासबुक उघडून ती वाचीत असल्यासारख करून म्हणाली,

'' भीमा बुकात सताटशे रुपये असायला फायजी.''

या बोलण्याने भीमाचा राग अनावर झाला. त्याला वाटू लागलं की आईचा आपल्यावरचा विश्वास उडाला. पासबुकावरच्या लाल रेघोट्या कडे बघत राग रागच म्हणाला ,

'' माय तुझे सताटशे रुपये होते तर म्या खाल्लेत काय ? तू काय बी मन माय तुझा माझ्यावर तिळभर विश्वास राहिला नाही.''

भीमाचा राग अनावर झाल्याचे बघून सावित्री नमते घेत बोलली ,

''तसं न्हव भीमा तुह्यावर ? इस्वास हाय र पर त्या बँकेवाल्यांन रुपये काढून घेतले अस्तेल असं वाटतया मला ''

'' माय आता बिनबुडाच कायबी बोलू नकू..त्यो बँकेवाला पैसे घेत असता तर लोक गेलेच नसते त्याच्याकडं.''

बराच वेळ गप्प बसलेल्या संबाला जाग आली. तो सावित्रीला म्हणाला,

'' कस करावा म्हणतीस पोरीचं ''

''  कसं करायचंय धाडावा निरुप. पाचशे रुपयात जसं घडलं तसं करावं ''

सावित्री असं बोलली तेव्हा समाधान झालं . पण प्रत्यक्षात मात्र ती करणीला सढळ  हाताची होती. सावित्री बोलणार एक आणि करणार दुसरेच असा तिचा खाक्या होता. शाळेसाठी भीमा तिच्याकडे पैशाची मागणी करू लागला. ती पैसे देण्यास टाळाटाळ करू लागली. ती त्याच्याकडे पासबुक सुद्धा देईना. त्याला वाटू लागले की, मायची माया कमी होऊ लागली आहे. मी एकुलता एक असून माझा विचार ती करीत नाही.तिची बायजावर माया आहे.

बायजाला माहेरचा धोंडे जैवणाचा निरोप देऊन आठ दिवस झाले. निरोप मिळताच बायजाचे सगळे  घरदार वाडीत पोंहचले .पाहुण्यांचा पाहुणचार झाला .पाहुण्यासाठी काय करावं आणि काय नाही असं तिला वाटू लागलं .ठरल्याप्रमाणे  धोंडे जेवणाचा कार्यक्रम झाला .पोरगी सासरला जायची घाई करु लागली ,तेव्हा ऐनवेळी सावित्रीने बार फुकला. तिने संबाजवळ कापडाचे खुसपट काढले .आता मात्र सावित्री  रंग बदलणा-या सरड्यासारखी वाटू लागली .पाहुण्याच्या समोर त्याला काहीच बोलता येईना .तो हताश झाला. रिन काढून सण साजरा करणं त्याला बरं वाटलं नाही,  नवीन नवरी वाट लावावी तशी पोरगी नव्या कपड्यात वाट लावली. पाहणाऱ्यांना कौतुक वाटलं. त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे आनंदाची लहर होती. सावित्रीच्या डोक्यातल रीत मोळ्याचं भूत गेलं होतं ,पण भीमा आणि संबा एका मानसिक परिस्थितीतून जात होते. तिच्या हृदयात मात्र मायेचा पाझर फुटत होता. ■

हळदीने रंगवलेली, मेहंदीने सजवलेली, माळा, गजरे अशा सुगंधीत स्वैर अंधाराला साक्षी करुन पुन्हा एकदा मी यात प्रवेशत होते. अंगावर होणारा मोरपिसांचा हळूवार स्पर्श मला बाभळीच्या काट्यांसारखा भासत होता. पण.. पण.. मी घायाळ जीव. कुणाला काय बोलणार. मेहंदीनं सजलेलं, धजलेलं सुगंधी शरीर आज एक वेगळंच आव्हान पेलत होतं. खोलीतील दिवा विझला. माझ्या स्वप्नांची राख झाली.



# घडी


**रमेश महादेव मोटे**
प्रसिद्ध कवी,लाडझरी


ये आई.... मामा आला गं.. थोरल्यानं अंगणातून हाक दिली. तसा पदरानं हात पुशीत मी बाहेर डोकावलं. माझा दादा आला होता. गडबडीनं तांब्या भरुन पाणी दिलं, चहाला चुलीवर कपभर पाणी टाकलं, आदरकाचा एक तुकडा त्यात टाकला, बाहेरच्या पटांगणात लिंबाखाली बाजेवर घोंगडी आंतरली आणि चहा उकळायची वाट पाहात बसले. सम्दे लेकरं मामाच्या भवती गोल गिरका घालून बसले. गावाकडं सम्दं बरं हाय नं? चहाचा कप दादाच्या हाती देत इच्यारलं.

''बरं हाय सगळं. जत्रा दोन दिसावर आलीया, आई सारखी पट्टी लावून हाय माझ्या मागं, पोरीला घेवून ये..पोरीला घेवून ये... तवा मनलं आजच मोकळीक हाय, उद्या आनखीन दुसरं काम निघायचं'' हातातला मोबाईल चाळत दादा बोलत होता.

''आणि काय गं, भाऊजी दिसत नाहीत?''

'' ते व्हय गवत आनायला गेलेत शेतात, येतेलच येवढयात.''

मामानं आनलेला खाऊ लेकरांच्या हातावर दिला. वानरं नाचावी तशी सगळी नाचत ओरडत बाहेर खेळायला गेले.

गावची जत्रा. आता कितीतरी दिवसांनी मी जत्रेला जात आहे. किती शोभा वाटायची जत्रेला. आम्ही लहानपणी खुप हुंदडायचं, खेळायचं, पोरींसोबत पहाटे कार्तीक स्नानाला जायचं.



मंदिरासमोर रांगोळी काढायची, कुणाची रांगोळी जास्त सुंदर दिसते यावरुन पोरींनी गलबला करायचा. सकाळचा मंदिरातला आगरबत्यांचा घमघमाट, शांत वातावरणात वाजणारी मंदिरातील घंटा, हृदयाच्या ठोक्यासारखीच हवीहवीशी वाटायची. आज कितीतरी वर्षे झाले हे सगळं करुन. पण आजही सगळं च्या सगळं डोळ्यांपुढं दिसतयं. आता ते दिवस कधीच येणार नाहीत. त्या आठवणींना देव्हाऱ्यात पुजल्यासारखं मनामध्ये सारखं चिंतन करते नेहमी.

फळीवरचा पिठाचा डब्बा घेतला कणिक मळायला सुरु केली. मालक शेतावरुन आले होते. उभ्या उभ्या चार तांबे अंगावर घेतले अन् दादाला घेवून शेताकडं गेले. ते घरी यायच्या आगोदर स्वयंपाक पाणी झालं पाहिजे. आज माहेरची ओढ लागली खरी पण का कोण जाने हात हालत नव्हते. कनिक मळता मळता सगळा गतकाळ मी हाताखाली चुरत होते, रगडत होते. वेदनांच्या उमाळ्यांवर पाणी ओतून घट्ट दाबत होते.

मी जत्रेला गावी जाणार, सगळे जमणार, जुण्या मैत्रीनी जमणार, आज कितीतरी वर्षांनी त्यांना भेटणार. ती शिल्पा मास्तरीन झालीया म्हणं. ती सोनाराची बबली पोलीस झालीया. नटवी मेली. आदीच नटवी त्यात आता तर किती तोरा आसन तीचा. आणि ती कल्पना रेल्वेखात्यात आहे म्हणं तिचा नवरा. राणीवानी राज करीत आसल. आमच्या पुढच्या वर्गातली गोदी तर कलेक्टरची परीक्षा द्यायली म्हणं. आनखीन लगीन नाही तीचं. सगळ्या पोरींच आगदी चांगल ऐकायला मिळायलय. आणि..... आणि... माझं काय? तर म्हणे एका शेतकऱ्याची बायको. छे गं... काय माझी जिंदगी. माझ्या बराबरीच्या समदया पोरी सुखानं संसार करायल्यात, नौकरी करायल्यात, सगळे पोरं पण शिकुन मोठे झालेत. मी एकटीच मागं राहीले. खुप माग... आगदीच खुप....

गावी गेल्यावर सगळे भेटतेल, आपापलं सांगतेल. मी काय सांगू? कुठला तोरा दाखवू, कुठला मोठेपण मिरवू? सगळं माझ्या हातानं झालंय हे. दोष तरी कुणाला द्यायचा. दहावीच्या वर्गातच माझ्या

हातून नको ते घडलं. मग कुठला बाप सहन करीन... पण.. पण.. मला काहीच कळालं नाही. का झालं कसं झालं.

२६ जानेवारीच्या खेळाच्या स्पर्धा चालू होत्या. सगळेच वर्ग बाहेर ग्राउंडवर जमले होते. शर्यत लांब उडीची होती. दहावीचे पोरं समोर होते. सर प्रत्येकाची उडी मोजत होते. उडीसाठी केलेल्या मऊ जागेच्या डाव्या दिशेला मी पोरीमध्ये बसले होते. आता किसना उडी मारणार होता. किसना आमच्या गावातलाच, गोरा गोमटा, नाकीडोळी निटास. अंगानं सडपातळ, डाव्या हातात घडी, उजव्या हातात मन्यांचा दोरा, कपाळावर रुळणारे समोरचे केस, चमकदार डोळे, फुलांची करंडी उंचावरुन सैल सोडावी तसं प्रसन्न व निखळ हास्य आगदी कुणालाही आवडेल असा.

किसना समोरुन पळत येत होता. पळताना त्याच्या केसांची होणारी हालचाल काळजाला हवा घलत होती. पळता पळता त्याने जोराची उडी मारली त्या धक्याने त्याची घडी तुटून एकदम माझ्या अंगावर पडली. झालं त्या घडीनंच जण मध्यस्ती केली. स्पर्धा संपल्यावर मी त्याच्याकडे गेले घडी परत करायच्या निमीत्ताने. त्याला सारखं पहात राहिले.

''ही घडी, मघाशी पडली होती.'' लाजत मुरकत मी मान खाली घातली. पटकन घडी घेवून तो निघूनही गेला. साधं पाहिलंही नाही त्यानं माझ्याकडे. माझ्या काळजात मात्र जाळ पेटला.

किसना जर कोणत्या मुलीला बोलू लागला तर मला खपायचं नाही. मी उगीच त्रागा करुन घ्यायचा. पण त्याचा कांहीच उपयोग व्हायचा नाही. त्याला काहीच कळायचं नाही. त्याला बोलण्याची एकही संधी मी सोडत नव्हते. मुद्दाम पणे त्याच्या समोरुन जायचं, कांहीतरी निमित्त करुन त्याला बोलायचं. पण मला काहीच साध्य होत नव्हतं.

एके दिवशी शाळेत जाताना मी मुद्दाम त्याच्या सोबत निघाले. तो झपझप चालत होता. मी पण गती वाढवली.

''ये किसना.... मला येवू दे की. येवढा का पळतोयस.''

''पळतोय, अन मी... नाही गं.... माझं चलनंच आसं हाय.'' तो सहज लिलया बोलला.

''किसना, तुला एक बोलायचं होतं.. '' घाबरत घाबरत मी बोलले.

''बोल .. पटकन बोल काय बोलायचं ते.''

''ते .. हे.. आपलं... जाऊदे काही नाही.'' माझी हिम्मत होईना.

''बोल गं.. काय म्हणतेस.'' तो सहज मोकळेपणे बोलत होता.

''ती तुझी घडी ना...''

''हां घडी.. बरं मग ... '' तो जागेवर थांबला.

''तुझी घडी खुप छान आहे बघ. ''
''हं.. पप्पांनी आनलीया वाढदिवसा दिवशी.''
''तुझी घडीपण छान आहे.. आणि तू पण.'' मी बांध फोडून टाकला.

जागेवर थांबून त्यानं डोळे विस्फाटून माझ्या डोळ्यांत पाहिलं आणि विज चमकावी तसा निघून गेला. माझी धकधक वाढली. आता हा शाळेत कुणाला बोलला तर.. किंवा माझ्या वडीलांना सांगितलं तर ... मला जीतं सोडणार नाहीत. किसना जर कुणापाशी बोलला तर काही खर नाही. तो कुठे गेला हे मलापण समजल नाही. त्या दिवशी दिवसभर तो शाळेत आला नाही. सकाळी तर शाळेकडे आला होता. पण नेमका कुठे गेला ते मला काहीच समजेना. पुढचे दोन दिवस तो शाळेत आलाच नाही. मला वेगळीच भिती वाटू लागली, बर कुणाला विचारावं तर कसं विचारावं. ते मला कळेना. मी स्वत:ला खुप अपराधी समजून वागू लागले. मन कुठेच थाऱ्यावर राहीना झालं. कुणाला बोलावं वाटंना. हसू तर पारच पळून गेलं. आपण खुप मोठी चूक केलीय, किसना खुप चांगला मुलगा आहे. त्याला हे आवडलं नसावं. मी किती मुर्ख आहे. झालं ते झालं त्याला झाल्या प्रकाराबद्दल माफी मागायची.

इंग्रजीचा तास भरला होता. सर शब्द विचारत होते. बाहेरुन किसना आला.
''आत येवू सर..''
''येस.. ये. आणि काय रे इतका वेळ? ''
''सर मामाकडे गेलो होतो. दोन दिवस आलोच नाही. आज यायला उशीर झाला.'' प्रसन्न चेहऱ्यातुन किसनाची शब्दफेक सुरु होती.
'' शब्द पाठ केलेस का, वही कंपलीट आहे का? '' तिरकस नजरेने सर बघत होते.
'' हो सर.. ही.. वही..'' चाळून वही काढली समोर ठेवली व तो जागेवर जावून बसला.

मधल्या सुट्टीमध्ये मी त्याच्या समोर जाण्याचा खुप प्रयत्न केला, पण जमले नाही. शाळा सुटल्यावर मी घरी आले. पाण्याचा हंडा घेवून हापश्यावर गेले. समोरच्या रस्त्यावर किसना सायकल शिकत होता. मधून मधून माझ्याकडं पहात होता. पण मला वेगळीच हुरहुर लागली होती. मी हंडा भरला व त्याच्या जवळून जाताना त्याला सॉरी म्हणाले. तर तो चक्क जोराने हसायला लागला. ''सॉरी? कशाबद्दल..'' डोळे मोठे करुन तो बोलला.
'' आरे ते दोन दिवसांपूर्वी मी तुला बोलले... त्या बद्दल...''
'' हो...? पण त्यात काय येवढं.. मला पण तु आवडतेस. '' आगदी न भिता त्यानं सहज बोलून गेला. मनामध्ये अनंत स्वप्नांचे गुंफीले विनत मी घरी आले. चक्क नाचावं वाटू लागलं. त्यानंतर तर

माझं संपुर्ण वागणच बदलून गेलं. वेळेपेक्षा आर्धा तास आगोदर मी शाळेत जाऊ लागले. सजनं, सवरनं, यात बरीच भर पडली. सहज येणारी हवेची झुळूकही मला एक नवा शहारा निर्माण करुन देत होती. वाऱ्याने गालावर रुळणाऱ्या केसांच्या बटांमध्येही मला किसनाचे बोट जानवत होते. हसनं, बोलणं, खुनावणं, इशारे हे सर्व आता अंगवळणी पडलं होतं. नजरेने सुरु झालेल्या या अनामिक संकल्पणेने आता शरीराचा आश्रय धरायला सुरुवात केली होती. त्याला बोलाव, भेटावं, त्याच्यासोबत फिरावं, नाचावं, बागडावं असं सारखं वाटायला लागलं.

गावातील जत्रा जवळ आलेली. सर्व तयारी जोमाने सुरु होती. भोयांचे पाल. लहान सहान रहाटपाळणे, आईस्क्रीमचे गाडे यांनी गाव थाटला होता. देवाच्या पालखीची मिरवणूक, वाजंत्र्यांचा थाट, त्यात हालगी, कडकनी यांनी सारा गाव दुमदुमुन जायचा. आज रात्री देवाची मिरवणूक. घरचे सगळे देवाकडं जाणार. घरी मी एकटीच असणार.. किसनाला बोलवून घ्यायचं... विषारी संकल्पनांचा तवंग माझ्या मनावर तरळत होता. शेवटी विजय तोच झाला. सगळे देवाकडं गेले, मी किसनाला बोलावलं. चोर पावलांनी किसना घरात आला नजरेत नजर घालून तो पाहू लागला. विषारी कामूक नजरा भिडल्या, गात्र शिथील झाले, सगळी दुनिया क्षणात अदृश्य झाली, दोघांतील अंतर मिटले, कामदेवतेने पांघरुन घातले, आणि.... आणि...

पालखी फिरली, नगारे, तोफा, यांचा सर्वत्र आवाज पांगला. जयजयकार , जयघोषाने सबंध गर्जुन गेला. पण .. पण.. मला यात कशातच रस नव्हता मी माझ्या स्वैर दुनियेमध्ये पार मग्न. देवाकडं गेलेले सर्वजन घरी परतले. रात्र उतरणीला लागली होती. सगळे गाढ झोपेत मग्न होते. प्रत्येकाच्या अंगात संचारलेला देव आता निद्राधीन झाला होता. अंधारात कुणीतरी आल्याचं भासलं. बाहेर अंगनात येवून बाबांना उठवलं. बराच वेळ ते हळू आवाजात बोलत होते. अधून मधून शांत होत होते. पुन्हा बोलत होते. त्यांचा आवाज मंद होत होता तसा मला डोळा लागला.

सकाळी घरातील वातावरण वेगळंच जानवलं. मला कुणीही निट बोलेनासं झालं. मी घाबरले मला भीतीनं पुर्ण घेराव घातला.

''ये... रुपा.. बाहेर ये..'' बाबांचा करारी आवाज. माझी पार गाळणच झाली. मी मान खाली घालून त्यांच्या जवळ गेले.

''ये बस अशी माझ्या जवळ. ''मी घाबरत चोपुन बसले.

''  हे बघ रुपा, मी आजवर तुला काही कमी पडू दिलं नाही. तु शिकावीस मोठी व्हावीस, तुझ्या पायावर उभी रहावीस, यासाठीच तर येवढा मरमर करतोय मी. तुला नोकरी लागावी, मोठी साहेब होवून तू आमच्याकडं गाडीतून भेटायला यावीस. असं मनोमन वाटतय पोरी. पण.... पण.. लक्षण

ठीक दिसत नाही. तवा तुला शेवटचं इच्चारतो.. तुला शिकायचंय का निट? ''

होय.. शिकायचंय...

'' मंग फक्त शिक्षणात डोस्कं घाला, बाकी गोष्टींत नाही. आलय आमच्या कानावर सगळं. आमची मान खाली होईल असं काही करु नका. नाहीतर...नाहीतर आत्ताच सांगा दिवस संपले नाहीत. उरकून टाकतो लग्नाचं..''

बाबांचं हे रुप मी पहिल्यांदाच पहात होते. त्यांना सगळी पुर्ण माहिती कळाली होती. मला तर त्यांच्या पुढे जाऊ वाटत नव्हतं. आणि मनात ठसलेली किसनाची आकृती मिटवनंही शक्य नव्हतं. डोक्यावर सगळाच भार होता. योग्य अयोग्य काय हे मी जाणीत नव्हते, किसना मला आवडतो. मी त्याला मनोमन पसंद केलय, कुठल्याही परिस्थीतीत त्याच्यापासून वेगळं होणे मला जमणार नव्हते.

असेच दिवसा मागून दिवस जात होते. आमचं लपून चोरुन भेटनं, बोलनं चालूच होतं. माझ्यावर कडा पहारा ठेवण्यात आला. आणि शेवटी व्हायचं तेच झालं.. माझं हे जगणं जास्त दिवस नाही राहीलं. गोष्ट डोक्याबाहेर गेल्यावर शेवटी विस्फोट झाला. माझं लग्न जमवलं. आगदी मनाविरुद्ध. बाकी सगळे शिकत राहिले. आणि मी ... मी गुंतले संसाराच्या राड्यात.

लग्न झालं, आठवणींचं भलमोठं गाठोड पदरी घेवून सासरी आले. आगदी अर्धमेली, निस्तेज मनाची मी. मालकांचा यात काहीच दोष नाही, माझ्यावर निरागसपणे प्रेम करायला सज्ज झालेल्या यांचा काय दोष. सगळा समारंभ आगदी प्रथेप्रमाणे पार पडला. मधुचंद्राची ती रात्र माझ्यासाठी जिवघेणी होती. ज्या पाटीवर अक्षरं गिरवली होती, त्याच पाटीवर परत लिहीलं जात होतं. पहिलं न पुसता. एकाच पाटीवर दोण वेळा लिहीलेलं वाचण्याची खडतर परिक्षा मला माझ्या नशीबाने दिली. आपल्या हक्काच्या पत्नीवर तुटून पडलेल्या त्या माणसाची तरी काय चुक, तो तर त्याचा अधिकार आहे. पण .. पण.. हा अधिकार माझ्या मनाचे पार भडके उडवत होता. हळदीने रंगवलेली, मेहंदीने सजवलेली, माळा, गजरे अशा सुगंधीत स्वैर अंधाराला साक्षी करुन पुन्हा एकदा मी यात प्रवेशत होते. अंगावर होणारा मोरपिसांचा हळूवार स्पर्श मला बाभळीच्या काट्यांसारखा भासत होता. पण.. पण.. मी घायाळ जीव. कुणाला काय बोलणार. मेहंदीनं सजलेलं, धजलेलं सुगंधी शरीर आज एक वेगळंच आव्हान पेलत होतं. खेलीतील दिवा विझला. माझ्या स्वप्नांची राख झाली. कशाला रडावं, किती रडावं, कुणाला दोष द्यावा. सगळेच म्हणत होते पोरीचं भलं झालं. या चरख्यात पार सोलत जाणारं माझं मन हे सगळं सहन करीत होतं. यातून तीन लेकरांची होण्याचं भाग्य मला नशीबानं दिलं. आता याला भाग्यच म्हणावं लागेल...

''झालं का गं सगळं... झालं असंल तर वाढं पटकन...'' मालक गंभीर वाणीने बोलले तसी मी तंद्रीतून बाहेर आले.

''हं झालंच बसून घ्या .. लगेच वाढते..'' ताटं वाढले. जेवणं आटोपल्यावर आम्ही निघालो. आज जा.. पण परवाला लगेच परत ये.. इकडं बरीच कामं पडलीत.. आणि लेकरांना निट सांभाळ, इस्त्या पाण्याकडं जाऊ देवू नको. पायात बुट चढवत बोलले.

आम्ही गावच्या पाटीवर उतरलो. कितीतरी वर्षांनी मी माहेरी आले होते. गाव पार बदलत गेला होता. लहान लेकरु कडेवर घेऊन मी दादाच्या मागनं चालत होते. मधली पोरगी दादाच्या खांद्यावर होती आणि थोरला पायीच चालत होता. चालताना पोरगा इकडं तिकडं रस्त्यावरुन पळत होता. अचानक मागुन भरधाव चारचाकी गाडी आली, लेकरु गाडीपुढं पळालं. ड्रायव्हरने जागेवर गाडी थांबवली. गाडीचा ड्रायव्हर खाली उतरला, ''ओ बाई लेकराला निट घेता येत नाही का? मेलं आसतं म्हणजे.. '' तावातावाने तो बोलला तसा गाडीत बसला,गाडी सुरु झाली, तसं माझं लक्ष गाडीच्या साईडच्या आरशात गेलं. एक उंची पोशाखातील व्यक्ती, डोळ्याना गॉगल, रुळणारे केस, कोण असावा...

गाडीच्या खिडकीवर त्याचा डावा हात होता. हातात तीच घडी. ओळखीची वस्तू वाटली. मनात कालवा कालव झाली. मी पहातच राहीले. गाडी कधीच नजरेआड गेली होती. न राहून मी दादाला विचारलं, कोणी नेता होता का गाडीत?

''नाही, आबाजीचा किसना होता. गेली दहा वर्ष तो कसलाच गावात आला नव्हता. मोठा साहेब झालाय. कालच आलाय गावात. गावासाठी आणि मंदीरासाठी खुप पैसा दिलाय त्यानं.'' त्यापुढंही दादा बरच काही बोलत राहिला पण... मी कुठं भानावर होते. चकरा घेणाऱ्या मनाला सावरत होते. मनाशीच बोलत होते. मी अशी गावंढळ, तीन लेकरांची माय, या आवतारावरुनच याने मला ओळलं नसावं... की, आणखीन काही..... ■

संतू मला काही उलगडून सांगत होता. काय-काय सहन करावं लागतं, पावलो-पावली त्याचा कसा अपमान होतो ते सांगत होता. मामी त्याला कशी छळते हे त्याच्या बोलण्यावरून लक्षात येत होतं. बोलता-बोलता त्याचा आवाज खोल जायचा. चेहरा केवीलवाणा व्हायचा. तो बाभळीच्या बुडाला टेकून बसला होता. मी त्याच्यापुढं गुडघ्याभोवती हाताची मिठी घालून बसलो होतो.



# हावळा

**सुरेश पाटील**, इर्लेकर
प्रसिद्ध कथाकार,अंबाजोगाई

सोलापूर जिल्ह्यातल्या एका गावात मला शिवजयंती निमित्त प्रमुख पाहूणा म्हणून व्याख्यानासाठी बोलावलं होतं. त्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून कोणीतरी पी.एस.आय. येणार होते. मी त्या गावच्या सरपंचाच्या घरी बैठकीत बसलो होतो. गावातली अनेक माणसं मला भेटण्यासाठी आली होती. तिही माझ्यासोबत बैठकीत बसली होती.

आम्ही गप्पा मारीत बसलो होतो. तेवढ्यात बाहेर एक कारगाडी येऊन थांबली. तिचा आवाज ऐकूनच बैठकीतली सगळी माणसं उठून बाहेर गेली आणि गाडीभोवती गोळा झाली. मीही कोणते साहेब आहेत म्हणून तिकडे पाहत होतो. गाडीचा दरवाजा उघडून ते साहेब बाहेर आले. अंगावर खाकी वर्दी. डोक्यावरचे केस बारीक केलेले. चेहरा करारी. डोळ्यांवर काळा गॉगल. मी त्यांच्याकडं पाहतच राहिलो. मला आठवलं तो माझा लहानपणीचा मित्र संताजी होता. मला आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

साहेबांनी गाडीतून उतरताच हात जोडून सर्वांना नमस्कार केला. सगळ्या लोकांनी त्यांना राम-राम केला. सरपंचांनी पुढे होऊन त्यांच्याशी हस्तांदोलन केले. सरपंचांना साहेब म्हणाले,
''कुठं आहेत आजचे प्रमुख पाहुणे ''
''ती काय, बैठकीत बसल्यातं.''

सरपंचांनी बैठकीकडे बोट दाखवीत सांगितलं. साहेब बैठकीच्या दारात आले. माझ्याकडं बघीतलं. मीही त्यांच्याकडं बघीतलं एकमेकांकडे पाहतच राहिलो. सरपंचांनी माझ्याकडे हात करीत ''ही आजच्या कार्यक्रमाचं प्रमुख पाव्हणं, ग्रामीण कथाकार सुरेश पाटील.''

''सुरेश! तू? '' म्हणत साहेब माझ्याजवळ येऊन बसले. मी त्यांचा हात हातात घेत म्हणालो, ''संताजी तू? किती बदललास''

सगळी माणसं आमच्याकडं आश्चर्यानं पाहत होती. सरपंच तर अवाक होऊन आमच्याकडं बघत होते. त्यांची ती अवस्था बघून संताजी म्हणाला, ''अहो सरपंच साहेब, हे पाहूणे तर माझे बालमित्र आहेत. आम्ही दोघं एकाच शाळेत शिकलो. माझा हात आपल्या हातानं प्रेमानं दाबीत तो म्हणाला,

''सरपंच साहेब, अतिशय योग्य माणसाची निवड केलीत तुम्ही व्याख्यानासाठी. माझा हरवलेला भाऊ सापडला.''

अंधार पडत होता. सरपंच साहेबांनी बैठकीतला बल्ब लावला. मी आणि संताजी एकमेकांना अरेतुरेच बोलत होतो. ते पाहुन जमलेली माणसं कौतुकानं आमच्याकडं बघत होती. मग सरपंचाच्या मुलाने चहा आणला. तो संताजीला चहा देत असतानाच संताजी माझ्याकडं हात दाखवत म्हणाला,

''अगोदर यांना दे.''

मी, '' घे रे, तू घे.'' म्हणत असतानाच तो म्हणाला, ''नाही, नाही, तुझा मान आधीचा.''

मग मी चहाची कपबशी हातात घेतल्यावर त्यांनं चहाची कपबशी हातात घेतली. आमचं दोघांचं प्रेम समोर बसलेली माणसं अनुभवत होती. तेवढ्यात बाहेर कोणीतरी आलं. सरपंच बाहेर गेले. परत आत येऊन म्हणाले,

''कार्यक्रमाची तयारी झाल्याय. निघायचं का?''

''हो-हो चला. काही हरकत नाही.'' म्हणून आम्ही उठलो. त्या दिवशी संताजीच्या साक्षीनं मी व्याख्यान दिलं. व्याख्यान चालू असताना गाववाल्यांसोबत संताजी सारखा टाळ्या वाजवायचा. त्यालाही माझ बोलणं खूप आवडत होतं.

माझ्या व्याख्यानानंतर तो अध्यक्षीय समारोप करीत होता. आपल्या समारोपाच्या भाषणात तो म्हणाला,

''तुमच्या गावाला मी कधीही विसरणार नाही. कारण या गावानं मला माझा बालमित्र मिळवून दिलाय. याच्या वाटचालीला माझ्या लाख लाख शुभेच्छा ! '' तो आणखी कितीतरी बोलला. कार्यक्रम संपल्यावर सरपंच आणि गाववाल्यांचा निरोप घेतला. मग संताजी म्हणाला.

''चल. माझ्या घरी जाऊ.''असं म्हणून त्यानं मला त्याच्या घरी सोलापूरला नेलं. घर कसलं अलिशान बंगला होता तो. सगळ्या सोयी-सुविधा होत्या आणि बागसुद्धा. ते पाहून मी हवालदिल झालो. याच्या बंगल्याच्या पायऱ्या चढून जात असतानाच त्याची आर्थिक सुबत्ता पायरीगणीक जाणवत होती. मुख्य दरवाजाजवळ गेल्यावर यानं बेल वाजवली. आतून त्याची बायको दरवाजा उघडून आली. संताजी तिला म्हणाला, ''अगं आज मी खूप आनंदात आहे. बघीतलंस का कोण आलंय ते?''

तिनं माझ्याकडं प्रश्नार्थक नजरेनं बघीतलं. मग तो म्हणाला, ''अगं माझा बालपणीचा मित्र, सुरेश आहे हा.'' त्यानं माझ्या हाताला धरून सोफ्यावर बसवलं. तोवर त्याच्या बायकोनं पाणी आणून दिलं आणि म्हणाली, ''भावोजी, थकला असाल तुम्ही. अगोदर हात-पाय धुवून घ्या.''

मी बाथरूममध्ये जावून हात-पाय, तोंड धुतलं. संताजी नॅपकिन घेऊन हजर झाला. हात-पाय, तोंड पुसून मी पुन्हा सोफ्यावर येऊन बसलो. तोवर त्याची बायको चहा घेऊन आली. चहा देत-देत ती म्हणाली,

''बरं का भावोजी! कितीतरी दिवसातून आज पहिल्यांदाच मी यांना इतक्या आनंदात बघते आहे.''

बालत-बोलत तिनं संताजीकडं तिरका कटाक्ष टाकला आणि स्मितहास्य केलं. तो चहाचा घोट घेत म्हणाला,

''मग. तशी घटनाच घडलीय आज. खरं तर मलाही खूप आनंद झाला होता. कारण इतक्या वर्षांनी आम्ही भेटलो होतो. संताजी खूप जीवलग मित्र होता बालपणी. इतक्यात त्याची तीन-चार वर्षाची मुलगी, ''माझे पप्पा आऽऽले माझे पप्पा आऽऽले'' म्हणून त्याच्या गळ्यात पडली. तिला आपल्या मांडीवर घेत तो म्हणाला

''बेटा, ते बघ, कोण आहे ते?.''

मुलगी माझ्याकडे नुसती पाहू लागली. मग तो तिला खाली ठेवत म्हणाला,'' बेटा, तुझे काका आहेत ते. नमस्कार कर '' मुलगी लटलट चालत आली आणि माझ्या पायावर डोकं टेकणार तेवढ्यात मी तिला उचलून घेतलं. तिला हातावर झेलंत विचारलं,

''बाळा, तुझं नाव काय?''

''आसावरी.''

तिनं धीटपणे सांगितलं. मी तिला गाव, शाळेचं नांव, बरंच कांही विचारलं. ती पटापट उत्तरं देत होती. ती मुलगी खूप गोड होती काही क्षणात तिनं मला आपलंसं करून टाकलं.

रात्री जेवण झाल्यावर आम्ही तिघेजण गच्चीवर गप्पा मारीत बसलो. मुलगी झोपी गेली होती. संताजी, त्याची बायको आणि मी गप्पा मारीत बसलो होतो. आमच्या दोघांच्या बोलण्यातून आमचं एकमेकांवरचं प्रेम दिसून येत होतं. संताजी सांगत होता,

''अगं, लहानपणी यानं खूप जीव लावला मला. मी मामाच्या गावी असताना. हा नसता तर कदाचीत मी मामाच्या गावी राहिलोही नसतो.''

मी म्हणालो, ''अरे! असं नाही कांही. उलट तूच मला कितीतरी जीव लावलास आणि न सांगताच निघून गेलास! ''

आभाळाकडं बघत तो म्हणाला,

''मी तेव्हा पळून गेलो रे. थेट मुंबईला. खूप कष्ट केलं. शिकलो, परिस्थितीशी झगडलो आणि पी.एस.आय. झालो. खूप काही सोसलंय रे आयुष्यात.'' बोलत असतानाच त्यानं उसासा टाकला. त्याचं अंत:करण गलबलून आलं. त्याला त्याचं पूर्वायुष्य आठवत होतं.

तो आणि मी बालपणीच्या अनेक आठवणी काढीत होतो. काही आनंददायक तर काही क्लेशदायक होत्या. त्याची बायकोही अधूनमधून आमच्या बोलण्यात सहभागी होत होती. बोलता-बोलता मी म्हटलं,

''मग पुन्हा गावाकडं का आला नाहीस एखाद्या वेळी? '' त्यानं उसासा टाकला आणि म्हणाला,

''येण्यासारखं काही राहिलं नव्हतं तिथं. मामा गेला आणि माझं आजोळ हरवलं बघ. खूप काळजी करायचा रे
माझी. पण मामीनं मला छळलं ''

मामाच्या आठवणीने त्याचे डोळे डबडबले. ते पाहून त्याच्या बायकोलाही भावना अनावर झाल्या. तिनं डोळ्याला पदर लावला. कारण आजपर्यंत तिनं आपल्या नवऱ्याच्या डोळ्यांत पाणी कधी बघितलं नसेल.

मग त्याच्या मामाच्या कष्टाच्या आणि गावाकडच्या बालपणीच्या आठवणी निघाल्या. त्या आठवणींत रात्रीचे दोन कधी वाजले कळलं नाही. मग आम्ही झोपलो. सकाळी उठल्यावर चहापाणी झाल्यावर मी म्हटलं,

''बऽऽरं, संताजी मला निघावं लागेल आता.''

''आत्ताच, इतक्या लवकर. रहा ना आजचा दिवस.''

''नाही. मला ड्यूटीला जायचंय बाबा. जावंच लागेल.'' या माझ्या बोलण्यावर त्याची

बायको म्हणाली,

''भावोजी, अहो काय गडबड करता इतकी. हे काय परक्याचं घर आहे?''

''अहो, तसं नाही वहिनी. पण मलाही ड्यूटीला जायचंय.'' मी आसावरीला कडेवर घेत बोललो. तशी लगेच त्याची बायको म्हणाली, ''ठीक आहे मग जेवूनच जा.''

''नाही वहिनी तसा आग्रह नका करू.'' मी काकूळतीने म्हणालो. तिनं आणि संताजीनं माझ्या चेहऱ्याकडं बघितलं आणि ती म्हणाली,

''ठीक आहे. पण एका अटीवर मी तुम्हाला जाऊ देईन.''

''कोणत्या?''

आसावरीच्या गालाचा पापा घेत मी विचारलं. तशा वहिनी म्हणाल्या,

''पुन्हा अधून-मधून आमच्या घरी येणार असाल तर.''

''अट कसली घालता? अहो मी आवर्जून येईल. माझ्या संताजीसाठी आणि या आसावरीसाठी.'' म्हणत मी आसावरीला उंच फेकलं आणि पुन्हा झेललं. अजून.. म्हणत ती टाळ्या वाजवीत होती. मग आणखी दोन-तीनदा मी तिला उंच फेकून झेललं आणि म्हणालो,

''बऽऽरं, संताजी, वहिनी, येतो मी.''

मी आसावरीला खाली सोडलं. तिला 'टाटा' केला. तिनं बाय म्हटलं. मी माझी बॅग उचलली आणि निघालो. संताजी मला सोडवायला गाडी घेऊन स्टँडपर्यंत येऊ लागला. मीही त्याला नाही म्हटले नाही. गाडीत बसताना पुन्हा वहिनी म्हणाल्या,'' भावोजी, येत जा मधन भावाकडं.'' आसावरीही हात हलवून 'बाय-बाय' करत या, पुन्हा या म्हणत होती..

''’हो-हो नक्की येईन. ’’म्हणत मी गाडीत बसलो. स्टँडवर उतरलो. स्टँडवर उभ्या-उभ्याच मी आणि संताजी एकमेकांपाशी मोकळे करीत होतो. खूप दिवसांचं मनात साठलेलं बाहेर येत होते थोड्या वेळात गाडी आली. मी गाडीत बसलो. संताजीनं हात उंचावून येत जा रे अधून-मधून. म्हणून सांगितलं. मीही हो-हो' म्हणत हात हलवला. गाडी सुटली. भरधाव वेगाने निघाली.

माझ्या मनामध्ये आठवू लागलं. संताजी आज साहेब झाला. पण मला आठवू लागला. तो लहानपणीचा संत्या. तो माझ्या गावचा राहणारा नव्हता. त्याचं गाव पळसगाव होतं. तो माझ्या गावी मामाकडं राहत होता. त्याच्या घरची परिस्थिती खूपच हलाखीची होती. म्हणून मामानं त्याला शिकविण्यासाठी आपल्या घरी आणलं होतं.

गावात पहिली ते सातवीपर्यंत शाळा होती. संतू सातवीत शिकत होता. गणिताचा तास चालू होता. झिंगे गुरूजी शिकवित होते. मूळ अवयव काढण्यास त्यांनी शिकविलं. नंतर ते म्हणाले,

''हं, समजलं का सगळ्यांना मूळ अवयव कसे काढायचे ते?''

पोरं ''होय, समजलं गुरूजी.'' म्हणाली. मग गुरुजींनी एक उदाहरण सोडवायला दिलं. सर्व पोरं-पोरी ते उदाहरण सोडवण्यात गुंग झाली. प्रत्येकाची नजर आपल्या पाटीवर होती. गुरुजी सगळ्या वर्गावरून हळूवारपणे नजर फिरवीत होते. सगळ्या वर्गात विलक्षण शांतता पसरली होती. अगदी टाचणी पडली असती तरी आवाज झाला असता इतकी शांतता. पण इतकी शांतता असतानादखा संतूचं लक्ष गणित सोडविण्याकडे नव्हतं. तो कधी शाळेच्या पत्याका बघायचा तर कधी वर्गातल्या इतर पोरांकडं बघायचा. गुरुजींचं त्याच्याकडे लक्ष गेलं. संतू त्याच्याा शेजारी बसलेल्या बंड्याला डिवचत होता. गुरुजींनी त्याला विचारलं,

''संतू, गणित सोडवायचं झालं काय रे? ''

संत गडबडला आणि म्हणाला.

'''न्हायी आजूक, सोडीवतूय, ही काय ''

अनेक पोरांनी आणि पोरींनी गुरुजीना पाट्या दाखवल्या. जवळ जवळ सर्वांनीच. पण संतू मात्र आपली पाटी दाखवीत नव्हता. गुरुजीच्या हे लक्षात आलं. त्यांनी संतूला सांगितलं

''उठ रे संतू, पाटी दाखव पाहू.'' संतू जाग्यावर उठून उभा राहिला. पण पाटी दाखवित नव्हता. मग गुरुजी फळ्यावर लिहिलेल्या उदाहरणाकडं बघत म्हणाले, '' हं, काढ याचं मूळ अवयव.'' संतू खाली मान घालून गप्प उभा राहिला. पुन्हा गुरुजी म्हणाले,

''अरे, ऐकलंस का तू? काढ याचं मूळ अवयव.'' संतू तसाच उभा होता. संतूला गणित येत नाही, हे गुरूजींनी हेरलं आणि ते म्हणाले, '' बऽऽरं, ठीक आहे. तू फक्त मूळ अवयव असं म्हण आणि बस खाली.''

संतूनं एकदा फळ्याकडं बघितलं. परत गुरुजींकडं बघितलं आणि नंतर खाली मान घातली. सगळ्या वर्गाचे डोळे संतूकडं लागले होते. परत गुरूजी म्हणाले, ''अरे, म्हण लवकर मूळ अवयव''

संतू मान वर करीत म्हणाला, ''मूळ आयेव''

सगळा वर्ग खदखदून हसू लागला. गुरूजी म्हणाले, ''अरे बाबा 'अ व य व' असं म्हण. ''

''आयेव''

संतू पुन्हा मोठ्या कष्टानं म्हणाला. वर्गातली सगळी पोरं-पोरी पुन्हा पोट धरून हसू लागली. गुरुजींनी मग त्याला खाली बसायला सांगितलं. पोरी 'अव्वा' म्हणून तोंडावर हात ठेवून हसत होत्या. तर पोरं ''संत्या, आयेव.'' म्हणून हसत होती. वर्गात गोंधळ वाढला होता. पोरांचे आवाज वाढत होते. मग गुरूजींनी टेबलावर छडी आपटली आणि म्हणाले,

'' हं, गप्प बसा रे.'' सगळा वर्ग शांत झाला.

संतूच्या मामाची शेती होती. दोन बैलं, एक गाय, चार शेळ्या असा त्याचा लवाजमा होता. शेतात ज्वारीची पिकं जोमानं आली होती. त्या कणसात आता दाणे भरू लागले होते. काही दिव ज्वारी हुरड्याला आली होती. पाखरांचा त्रासही वाढतच होता. ती दाणं टिपण्यासाठी पिकावर यायची. चार दिवस झाले तरी संतू का आला नव्हता. काय झालं ते बघावं म्हणून पोरं त्याच्या घरी गेला त्याची मामी भाकरी थापत होती. पोरांनी विचारलं,

''संत्या कुटाय वं?''

तव्यावरची भाकरी उलथत मामीनं सांगितलं.'' त्याला शेतावर धाडलय पाकरं राकाया. बसून खाया काय बापाची ठेव हाय, व्हय हितं.''

हे सांगत असताना तिच्या चेहऱ्यावर तिरस्कार दिसत होता. कपाळावर आट्या पडल्या होत्या. एवढंच बोलून ती पुन्हा भाकरीच्या नादी लागली. ती पोरं मग शेताकडं गेली. त्यांना पिकाच्या मधोमध तिवईवर उभा राहून पाखरं हाकणारा संतू दिसला. त्यानं बरेचसे खडे गोळा करून तिवईवर ठेवले होते. एक खडा तो गोफणीत ठेवायचा आणि ॲऽऽऽॲहॅक' म्हणून गोफण फिरवायचा. दगड पिकात पडताच पाखरं भूर्ररकन् उडून जायची. आपले सवंगडी दिसताच तो म्हणाला,

''ऐ, हिकडं कुटं वाट चुकलाव रं मावळ्यानू ''

''तुज्याकडंच आलोय.''

बंड्यानं स्पष्टीकरण दिलं. मग संतू तिवईवरून खाली उतरला. त्याचा चेहरा सुकला होता. गालफाडं आत चिकटली होती. केस विस्कटले होते. अंगावर कपडेही धड नव्हते. पायात चप्पल नव्हती. संतू काळा पडला होता. थकल्यासारखा वाटत होता. अगदी आजारातून उठल्यासारखा. बंड्यानं विचारलं,

''संत्या, साळंत का येत न्हायीच रं.''

गळ्यात गोफण अडकवीत संतू म्हणाला, ''ही काय मामानं कामगिरी दिलीया''

''आरं पर साळा...''

त्याच्याकडं निरखून पाहत बंड्या म्हणाला. तिवईच्या लाकडाला हात टेकत संतूनं सांगितलं, ''साळंचं काय घिऊन बसलाच.. मी शिकलो काय आन् न्हायी शिकलो काय, मामीला काय घेण-देणं ''

मी विचारलं, '' संत्या! आजारी हाय व्हय रं? ''

मग संतूनं एक दीर्घ उसासा टाकला. गळ्यातली गोफण खाली खाली मान घालून तो बोलू लागला. ''आजारी म्हंजीऽऽऽ आंगात कण कण भरल्याय बग. चार यालं म्या दिस-रात शेतातच हाय. आता दुपार व्हत आली पर आजून भाकरीचा पत्ता न्हायी. रोज आसंच चाललंय. मामी दुपारा एकबारंच भाकरी आणून ठिवती. तीच भाकर मी दिवसा आन् संध्याकाळी बी खातो. सांच्याला भाकर वाळल्याली आसती रं. नरड्यात उतरंत न्हायी, पर मामी मनती, दोन टायम ताजी भाकर द्याया तुज्या बापानं घबाड ठिवलंय काय हितं.'' असं बोलत असतानाच लांब कुठंतरी पाहात तो म्हणाला,

''काय करावं. आपल्या घरची गरीबी हाय. मनून ही समदं सोसतूय'' त्याचं बोलणं ऐकून आम्ही सगळेजण थक्क झालो. मामीचा विलक्षण रागही आला. पण आम्ही काही करू शकत नव्हतो. बराच वेळ त्याच्यासोबत गप्पा मारीत बसलो. नेमकं त्या वेळी त्याची मामी भाकरी घेऊन आली. संतूला आमच्यासोबत गप्पा मारताना पाहून म्हणाली,

''येऽऽ हँद्र्या हितं बसलाच काय गप्पा हानीत. पाकरं काय तुज्या बापानं राकायची.''

ते ऐकून संतू लगबगीनं उठला आणि तिवईवर चढला. गोफण फिरवू लागला. आम्ही सगळेजण उठलो आणि निघालो. परत जाताजाता मी संतूला म्हटलं,

'' संत्या, काळजी करू नकू. ह्ये बी दिवस जात्यालं.''

संतूवर माझा खूप जीव होता. मी दुकानातून कांही खायला घेतलं तर एकटा कधीच खात नव्हतो. संतुला सोबत घेऊन जायचो आणि मग दोघेजण कुठेतरी बसून ते खायचो. कधी घरी एखादा नवीन पदार्थ खायला केला तर गपचूप तो घेऊन संतूला नेवून द्यायचो. तेव्हा संतू म्हणायचा,

''कशापायी आसं करतोच. तुजं तू खात जा की.''

एकदा काही पोरं मारूतीच्या पारावर बसली होती. संतू दिसताच ती त्याला चिडवू लागली, '' ऐ. त्ये बग मामीच्या हाताखालचा नोकर आला बग. काय जगतंय कुत्र्यावानी.'' संतू ओशाळला. मला ते पाहावलं नाही.

''तुमच्यायला तुमच्या.'' म्हणत मी त्यांना बदडून काढलं. संतू देवळामागं जाऊन रडत बसला होता. मी त्याच्याजवळ जाऊन म्हणालो,

'' संत्या, तू गप बसत जाऊ नकू. कुणी काय मनलं की त्यानला सोडू नकू. आरं, मी हाय की तुज्या संगं. घाबरतूच कशापायी'' मग संतूला जरा बरं वाटलं. शर्टच्या बाहीनं डोळे पुसत तो म्हणाला

''घरी मामी सारकं घालून-पाडून बोलतीय आन् भाईर आसलं. काय करावं काय कळत न्हायी बग. कवा कवा वाटतं ही समदं सोडून निगून जावं कुटं तरी.'' त्याचं काकूळतीचं बोलणं ऐकून मी म्हणालो,

''ऐ संत्या, आसलं बोलायचं न्हायी. आरं तू साळा शिक चांगला मोट्टा व्हू. मग समदं चांगलं व्हूयील बग. ते ऐकून तो कसनूसं हसत म्हणाला,

'' साळा शिकायची मनतोच. ह्या जल्मात तरी वाटत न्हायी. ''

मी समजूतीनं त्याच्याकडं बघत म्हणालो, ''आरं, पर केल्यावर व्हत आसतंय. तू वाईट वाटून घेत जाव नकू कशाचंबी..''

त्यानं माझ्याकडं केविलवाण्या नजरेनं बघितलं आणि म्हणाला,

''तू तेवडा हाय बग. मला जीव लावणारा. न्हायी तर समदीजणं मला कशी वरबाडून टाकत्याती. बोरीच्या झाडावानी.''

त्या दिवशी संध्याकाळ झाली होती. शेतातली माणसं गावाकडं परतंत होती. बैलांच्या गळ्यातल्या चंघाळीचा आवाज होत होता. म्हशी राखणारे लोक म्हशी हाकीत गोठ्याकडं नेत होते. समोर रस्त्यावर एखादं पोरगं आडवं दिसलं तर,

''ए, बाजूला व्हू की रं पोरा '' म्हणत होते. आया-बाया घरातलं, घरासमोरचं झाडून काढीत होत्या. राख-केर भरून उकीरड्यात टाकीत होत्या. कांही पोरांचा चोर-पोलीसांचा डाव रंगला होता. चोर दिसताच पोलीस झालेला मुलगा आपला हात पुढं सरळ करीत बोट दाखवीत, तोंडानंच, 'धीडक्यांऽऽव' करीत होता. आणि चोर झालेला मुलगा गोळी लागल्याचं सोंग करून, आऽऽआऽऽऽआ' म्हणत खाली पडत होता. त्या खेळात पोरांना वेगळीच गंमत वाटत होती. तेवढ्यात रंग्या तिथं आला आणि म्हणाला, ऐ पोरानू, आमच्या शेतात भयमुंगाचा

कुळव चालू हाय. आजच सुरु केलंय भयमुंग काडाया. चला शेंगा खाया पोरं म्हणाली.

'' आरं रंग्या आता आंदार पडलाय. उंद्या जावू की सकाळच्याला.''

पोरांनी तसं म्हणताच रंग्या हात नाचवीत म्हणाला,

''आरं दिवसा न्हायी जमायचं. ''

तसं पोरातून पुढे येत बंड्यानं विचारलं,

''पर का रं? ''

रंग्या सांगू लागला,

''आरं, आमचं म्हातारं लय तरकटी हाय. तुमाला शेंगा खावू द्यायचं न्हायी.''

''आसं म्हणतोच.'' म्हणत सगळी पोरं गप्प उभी राहिली. त्यांच्याकडं बघत रंग्या म्हणाला,

''मनून तर मनतोय आताच चला.'' पोरं तयार झाली. तेवढ्यात त्यांना संत्या पाण्याची घागर खांद्यावर घेवून जाताना दिसला. रंग्या म्हणाला,'' संत्या, घरी लवकर म्हागारी यी जा.''

संत्यानं भुवया उडवीत विचारलं,

''का रं?''

''ती तुला म्हागारी आल्यावर सांगतो. जा. पटदिशी म्हागारी यी.'' रंग्या घाई-घाईत त्याला ढकलीत बोलला. संत्या काही वेळातच पाण्याची घागर घरी ठेवून परत आला. मग पोरांनी त्याला शेंगा खायला जाण्याचा बेत सांगितला. तो नको म्हणत असतानादेखील बळजबरीनं त्याला शेताकडं नेऊ लागले.

रंग्याचं शेत गावाच्या शिवेवर होतं. सगळी पोरं पांदीतून चालत होती. चालता-चालता संत्या म्हणाला, ''आरं पर मामीला कळालं तर मामी काय मनील? ''त्याच्या पाठीत हातानं धपका मारीत शिव्या म्हणाला,

'' ए, पुंदा तुज्या मामीचं नाव काडायचं न्हायी. तिला घाल चुलीत.''

सत्या गुपचूप मान खाली घालून चालू लागला. पण त्याचा चेहरा आकसला होता. त्याला मामीची भीती वाटत होती. पोरं टिंगल-टवाळी करीत चालली होती. पांदीचा रस्ता खोलगट होता. दोन्ही बाजूंना दाट झाडी होती. अंधार झाला होता. सोनकिडे चमकत फिरत होते. आकाशात कुठं कुठं काळे ढग दिसत होते. रस्त्यावर अधून-मधून काटे दिसायचे. अचानक सर्वात पुढं चालणारा बंड्या गपकन थांबला. रंग्यानं विचारलं,

''का रं, काय झालं.''

बंड्याचा  श्वास गुदमरला होता. त्यानं समोर फक्त बोट दाखविलं. तिथं कवड्या-कवड्याचा साप आडवा पडला होता. रंग्या डोळे वटारु न सापाकडं पाहत म्हणाला,

''आरं, मॅल्याला दिसतंय जणू.'' म्हणत त्यानं लांबनच दगड मारून बघितलं. दगड जवळ पडताच साप 'फुसऽऽ' करीत शेजारच्या झाडीत निघून गेला. सगळ्या पोरांच्या काळजात धस्स झाले होतं. तिथून पुढं पोरं वाटेनं जपूनच  लागली. रंग्याच्या शेतात पोहोचली.

शेतात भुईमुग बघताच पोरांच्या तोंडाला पाणी सुटलं. कारण गावात फार कमी म्हणण्यापेक्षा चार-पाच लोकांनीच भुईमूग पेरला होता. सगळी पोरं भुईमुगाचे वेल उपटण्यावर तुटून पडली. वेलाच्या खालची जागा बोटांनी उकरून तिथून शेंगा काढत होती. सगळ्यांनी अंगातले शर्ट काढले आणि त्यात शेंगा ठेवल्या. कारण चड्डीच्या खिशात फारश्या  बसत नव्हत्या म्हणून.

भरपूर शेंगा जमल्यावर तान्या म्हणाला, ''शँगा लय टचबाज हायत्या, चला हावळा करू.'' रंग्यानं खिशातली काडीपेटी काढली आणि तो आसपास पडलेलं वाळलं गवत, पालापाचोळा गोळा करू लागला. आकाशात ढग जमून येवू लागले होते. सोसाट्याचा वारा सुटला होता. विजा चमकत

होत्या. काही क्षणात आभाळ भरून आलं. शिव्या आभाळाकडं तोंड वाकडं करीत म्हणाला,

''आयला पाऊस येतंय काय की, आता लय आवगड झालं गड्या''

म्हणीत रंग्यानं हातातलं गवत झटक्यानं खाली टाकलं. तेवढ्यात पुन्हा एकदा सोसाट्याचा वारा आला. आकाश ढगांनी दाटून आल होतं आणि रपरप पाऊस पडू लागला. सगळी पोरं शेंगा सदऱ्यात घेऊन गोदणीच्या झाडाखाली जावून उभी राहिली. काही क्षण त्यांना पाऊस लागला नाही. कारण तो झाडावर अडत होता. पण थोड्या वेळानं त्या झाडाच्या पानांवरून पाणी निथळू लागलं. ते पोरांच्या अंगावर पडू लागलं. सगळी पोरं भिजून चिंब झाली. तान्या डोक्यावरचे केस हातानं झटकीत म्हणाला, ''काय करावं, भिजलाव रं समदीजन''

सगळ्यांनी एकमेकांकडं पाहिलं. शर्टमध्ये ठेवलेल्या शेंगा सगळ्यांनी तिथंच खाली टाकल्या. शर्ट फडकले. पावसाचा जोर जरा कमी झाला. शिव्या म्हणाला,

''आता काय करायचं, नव्हं घराकडं कसं जायचं म्हणलं रं मी.'' काय सुदरंना बग.

हताश होऊन आभाळाकडं बघत बंड्या बोलला. काही अंतरावर समोरच्या शेतात त्यांना दोन वस्त्या दिसत होत्या. कंदील लावलेला उजेड दिसत होता. रंग्याच्या मनात आलं. त्या वस्तीवर जावून आज मुक्काम करावा म्हणून तो म्हणाला,

''त्या वस्तीवर जायाचं का रं?.''

''अन् तिकडं जायाचं काय सोपं हाय व्हय चिकूल तुडवीत. आन् त्या वड्याला पाणी बी किती आलंय बग'' ओढ्याच्या वेगवान पाण्याकडं पाहत बंड्या बोलला. सगळ्यांची नजर गावाकडं वळाली. अंतरावर पावसात भिजत असलेला गाव त्यांना नीट दिसतही नव्हता. सगळ्यांचे चेहरे चिंताग्रस्त झाले होते. संत्या आतून घाबरला होता. कारण खूप उशीर झाला होता. दाट काळोख सर्व शिवारावर पसरला होता. मानेवर हात फिरवत तो म्हणाला,

''आता गावाकडं जायचं बी लय आवगड हाय. पांदीतनं जायचं म्हंजी तारंवरची कसरत हाय. काटकुटंबी लय हायतं'' सगळ्यांच्या डोळ्यापुढे काजवे चमकत होते. एकच प्रश्न पुन्हा-पुन्हा मनात उमटत होता, ''आता काय करायचं?'' शेवटी सगळ्यांनी अर्थपूर्ण नजरेनं एकमेकांकडं बघितलं. आणि संत्या पुढं होत बोलला,

''काय व्हईल ती व्हुईल, चला गावाकडं'' सगळेजण निमूटपणे त्याच्यामागं चालू लागले. पांदीत चिखल दाटला होता. पिंढरीइतके पाय चिखलात जात होते. तसला चिखल तुडवत ते चालत होते.

''आगं आयेऽऽव'' म्हणत संत्या जाग्यावर थांबला. त्याच्या पायात वेड्या बाभळीचा काटा

घुसला होता. पाय वर करुन काटा उपसून काढला. तशी रक्ताची धार लागली. पायाला चिकटलेला चिखल लालसर दिसू लागला.

संबाळन चला रं बाबानू म्हणत  पुन्हा चाल - निम्मी पांद त्यांनी पार केली होती. अचानक जोरात वीज कडाडली असं वाटलं की, ती आपल्या अंगावर पडली की काय तो 'उससऽऽऽ' करीत संत्यानं वळून बंड्याला मिठी मारली जाग्यावर थबकले. त्यांच्या अंगावर काटा आला होता.

पुन्हा धीर धरून सगळेजण उसनं अवसान आणून चालू लागले कसंतरी करून त्यांनी  रस्ता पार केला. आता ते गाव जवळ आले होते. पाऊस पूर्णत: थांबला होता. समोर गाव दिसत होतं गावातल्या खांबावर मिनमिनत असलेले बल्ब दिसत होते. गावात भयाण शांतता पसरली होती. बेडकांचा 'डरॉऽऽव, डराँऽऽऽव' आवाज कानावर येत होता. गावाजवळ आल्यावर सगळ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

मग दुसऱ्या दिवशी संतू भेटला. त्याचा चेहरा पडला होता. वर्गात तो बसला होता. पण त्याचं लक्ष गुरुजींच्या शिकविण्याकडं नव्हतं. तो खिन्न होऊन खाली मान घालून बसला होता. मी त्याच्याकडं अधूनमधून बघत होतो. पण काही कळत नव्हतं. मधल्या सुट्टीत मी त्याला विचारलं,

''संत्या, का रं काय झालंय. आसा उदास का दिसाय लागलाय?''

''आं, काय न्हायी. ''म्हणत त्यानं मान  वळवली. मी पुन्हा-पुन्हा त्याला खोदून-खोदून विचारलं. तेव्हा त्यानं सांगितलं,

''मामीनं लय मारलं रं राती.''

त्यानं सदरा वर करून दाखविलं. त्याच्या पाठीवर सगळे वळच उमटलेले होते. ते काळे-निळे वळ पाहून माझ्या पोटात कालवाकालव झाली. त्याकडं बघत मी म्हटलं,

''बाई हाय का औदसा हाय रं!. गुराला मारल्यावानी मारलंय. लय फेड यील बग तिला.''

''जाऊ दी. आपलं नशीबच फटकं. आसल्या घरी ऱ्हावं लागतय''

काही पोरं-पोरी शाळेच्या मैदानावर खेळत होती. काही जण वर्गात जाऊन बसली होती. तर काही जणांनी पाण्याच्या हौदापाशी गर्दी केली होती. आम्ही दोघंजण मात्र शाळेपासून थोड्या अंतरावर झाडाखाली बसलो होतो. घंटा वाजली. मैदानावरची पोरं-पोरी आपापल्या वर्गात जाऊन बसली. शिक्षक वर्गात गेले. तास सुरू झाले.

पण आम्ही दोघंजण मात्र जाग्यावरून उठलो नाही. तिथंच बाभळीच्या झाडाखालीच बसलो होतो. उठून वर्गात जावंसं वाटत नव्हतं.  संतूमुळं मीही आतून गलबलून गेलो होतो..

मग बराच वेळ आम्ही एकमेकांशी हितगूज करीत राहिलो. मन मोकळं करीत राहिलो. संतू

मला  काही उलगडून सांगत होता. काय-काय सहन करावं लागतं, पावलो-पावली त्याचा कसा अपमान होतो ते सांगत होता. मामी त्याला कशी छळते हे त्याच्या बोलण्यावरून लक्षात येत होतं. बोलता-बोलता त्याचा आवाज खोल जायचा. चेहरा केवीलवाणा व्हायचा. तो बाभळीच्या बुडाला टेकून बसला होता. मी त्याच्यापुढं गुडघ्याभोवती हाताची मिठी घालून बसलो होतो. तो  शेंग हातात घेऊन तिला निरखून बघत होता. त्यानं ती शेंग फोडली आणि तिच्यातले धामुके हातात घेतले. ते धामुके खाली टाकीत तो बोलला, '' खरं म्हंजी मी म्हागंच निगून गेलो आसतो. पर मामामुळं आन् तुज्यामुळं व्हायलो बग. तुला मी आविष्यात इसरणार न्हायी. कुटंबी जाऊदी पर तुला ध्यानात ठिवीन.'' हळूच तो  सरकला. माझ्याजवळ आला आणि माझ्या हातावर हात ठेवून म्हणाला,

''ह्येवडं वरीस झालं की मी निगून जाणार हाय. कुणालाच सांगणार न्हायी. गपचीप जाणार हाय. पर तुला सांगतो. त्वा लय जीव लावला र मला. मनून तुला सांगतो. कोण कुटला मी. गरीब घरातला. पण त्वा मला आदार दिला. तुला सोडून जाऊ वाटत न्हायी  पर काय कराव, नाईलाज हाय. आसलं जगणं, रोजची वागणूक सोसत न्हायी बग.''


त्याचा हात दाबीत म्हटलं, ''आरं संत्या, आसं बोलूनी. हिंमतीनं ऱ्हावं बग माणसानं! तू कुटंसूदा जावू नकू. मी हाय का तुला.''

बघता ते वर्ष संपलं संत्यानं आपलं बोलणं खरं केलं. तो निघून गेला. जाताना मला भेटलाही नाही. कदाचीत मला भेटल्यावर त्याचा पाय निघाला नसता म्हणूनही भेटला नसेल.

आज मला हे सगळं कांही जसंच्या तसं आठवत होतं. जसं काही काल परवाच घडलंय. आज संत्या 'साहेब' झाला. त्याला आदरानं संताजी साहेब म्हणतात.  वैभव मी पाहिलं आहे.  मला वाटलं असंच परत जावं. संतूचे खांदे घट्ट पकडावेत आणि गदगदा हलवत त्याला विचारावं,

'' संतू, कसं मिळवलंस रे तू हे सगळं?'' ■

ज्या बिकट परिस्थितीत, रोजी-रोजगारी करूनही चंद्राबाईने इमानदारी जपली. त्याला तोड नाही आणि ही इमानदारी जपली. तोड नाही आणि या इमानदारीची कदर करणाऱ्या बाळदादाची मोहिते पाटलाचीही कृती दाद द्यावी अशीच आहे.बेइमानीच्या या जगात उसणे पैसेच काय पण अख्या बँका बुडवणाऱ्या पुढाऱ्यांना या इमानदारीचा अर्थ कळेल का?



# चंद्राबाईचे ईमान

**आबासाहेब वाघमारे**
ज्येष्ठ साहित्यिक,परळी वै.

गावाचे नाव श्रीपूर. अकलूज तालूक्यातले हे गाव. तिथे चंद्रबाई राहते -सौ.चंद्राबाई विठोबा घरात नवरा-बायको दोघेच. घर म्हणजे शाकारलेली झोपडी, दिवसा सुर्य भेटायला येतो आणि रात्री चंद्र वसतीला असतो. शेत-वावर नाही. दोघांनिही दिवसभर राबावे तेव्हा पोटाची सोय होते. कामात खाडा करावे परवढत नाही. हात बंद झाला तर येणार कुठून? असे ढिगळाला ठिगळ लावून त्यांचा संसार चालला होता. दिवस उगवतो, दिवस मावळतो, तो थांबतो? दिवस-महिने -वर्ष जातच होती. दिवसा गाणिक वय वाढत होते. चंद्राबाई थकली. उठता-बसता हाडे वाजू लागली. विठोबाने अंथरूण थरले - दम्याचा त्रास आणि म्हातारपण, त्याच्याने काम होईना. चंद्राबाई तशाही अवस्थेत कामाला जायची. कांही-बाही आणायची. रांधायची. घरा-दारात दोघेच. मिळून. खायची. एकाविचाराने राहायची.अशाच एका दिवशीसकाळी. चंद्राबाईने काम-धाम आवरले. विठोबासाठी भाजी-भाकरी करून लुगड्याच्या थडुत्यात कांही बांधून घेतले. बाहेर निघाली. दारातच परतुन म्हणाली, दुपारचे जेवा.दवाई घ्या. दिवेलावयच्या आदी येतो. विठोबाने हात वर करून तिला थांबवले. शांतपणे म्हणाला, सगळं निरामायनं सांग. तुझ्या मना सारकं व्हऊ दे. त्याच्या म्हणण्याला होकार देउन चंद्राबाई घराबाहेर पडली-ते पा ऽऽ र बसस्टन्ड गाठले. अकलूजला पोहंचली. तिथे उतरून वाड्याचा रस्ता धरला. मोहिते पाटील म्हणजे दबदबा असलेले नांव खानदानी श्रीमंती, तशीच



शाळी वागणूक. राजवाड्या सारखा वाडा. । नोकर-चाकरांचा राबता. कामकाजासाठी येणारा-जाणारांची ने हमीच वर्दळ.बाई वाड्याच्या दरवाजाशी गेली. उभी राहिली. केसात चांदी चमकू लागली. अंगावर जाडे-भरडे लुगडे. हातात गाठोडे. बाई येणारा-जाणारा कडे बघत होती. कुणी तरी थांबून विचारले- लांबून आल्याल्या दिसतात.

'' हो बाबा शिपुराउन आलो.''

''कोणाला भेटायचय? ''

''बाळदादाला''

बाळदादा म्हणजे जयसिंह मोहिते पाटील. त्यांच्या परिवारातील लोक त्यांना याच नावाने ओळखतात. विचारणाराने बाईला आत वाड्यात नेले. समोर ताई होत्या. ताई म्हणजे बाळदादाच्या । पत्नी-सुलक्षणादेवी. त्यांना हे सगळे नविन नव्हते. त्यांनी बाईची विचारपुस केली. पाणी दिले. काही आग्रह केला. येण्याचे कारण विचारले. पण चंद्राबाई एकच धरून बसली होती. 'मला बाळदादाला भेटायचय' सुलक्षणादेवींनी निरोप पाठवला. 'इकडे येउन जा म्हणावं'. निरोप्या गेला. निरोप पोहंचला.

बाळदादा बैठकीत होते. निरोप मिळताच, दादा उठले, 'आलोय'. म्हणत आत वाड्यात आले.सुलक्षणादेवी आणि चंद्रबाई आमोरा-समोर बसल्या होत्या.गुंडाळलेल्या, चुरगळलेल्या गठ्ड्यात नोटांची पुरचूंडी दादापुढे ठेवली.

''दादा, हे हाजार रूपये.काय करायचं ह्याचं. हे तुमचेयत. तुमी घ्या.''

''माझे कसे?''

''दुस्काळात तुमच्याकुन न्हे ले होते.''

दादांना काहीच संदर्भ लागेना. लाखोंची उलाढाल. रोजच शेकड्यांनी भेटणारी माणसे. राजेशाही राहिली नाही पण राजाला मानणारी माणसे आहेत. काम-धाम काढून येतात. जमेल तशा गरजा भागवाव्या लागतात. शे-पन्नास, हजार-चार हजार आपण सहजी देतो, ती सगळीच माणसे पुन्हा

भेटतातच असे नाही. त्यांचे काम होते. तेवढ्या पुरता सबंध संपतो. अन् ह्या बाईलातर आपण पैसे दिल्याचेच आठवत नाही. दादा नुसतेच उभे.

''दादा मला रिणातून मोकळं करा.'' बाईंचा आर्जवी आवाज.

दादा विचार करतात.जिथे माणसे, आपले हक्काचे तर काही देतच नाहीत, उलट दुसऱ्याचे आणून खावून बसतात. अशा या जगात मोल-मजूरी करणारी ही मावली. या काळात तिने-तिच्या कुटुंबाने किती कमावले असेल? पोटाला खाउन मागे काय टाकले असेल. अन् तिची ही अठ्ठाविस वर्षातील सगंळी माया-पुंजी माझ्या स्वाधीन करीत आहे. का? तर शब्द दिलाय. या इमानाचे मोल नाही. दादांचे डोळे भरून येतात. दादा  बघतात. त्याही या उदात्र दर्शनाने गहिवरून गेलेल्या. देवाचा प्रसाद ज्या भक्तीभावाने हातात घेतला जातो तशा त्या नोटा बाळदादांनी हातात घेतल्या. कपाळी लावल्या. हा प्रामाणीकपणा, ही इमानदारी-लखलखता दागिना होता. त्याने त्या नोटाच काचेत बसवून बैठकीत लावल्या.राजे-राजवाड्यांच्या बैठकी शौर्याच्या प्रतिकांनी सजलेल्या असतात. मोहिते पाटलांच्या खानदानी बैठकीत हे सगळे  शिकार केलेले हिस्त्र पशू पेंढा भरून ठेवलेले आहेत.तुम्ही आता कधी गेलात अकलूजला तर बाळदादांच्या बैठकीत आवश्य जा. तुम्ही परके असा, अनोळखी असो तुमचे आदरातिथ्य जरूर होईल. पण त्यात अडकून पडू नका. बैठकीच्या भिंतीवर बघा. तिथे तुम्हाला एक काचेची तसबीर दिसेल. त्यात कुणाची छबी नाही की, चित्र नाही. त्यात दिसतील  त्या पाचच्या-दहाच्या चुरगळलेल्या-घड्या पडलेल्या-मळकट नोटा. जवळ गेलात तर तुम्हाला गंधही येईल कदाचित! तो आहे चंद्राबाईच्या कष्टाच्या घामाचा. या वासाचे मोल तुम्हाला जाणवले, तर तुम्हाला कळेल. ही प्रशस्ती आहे प्रामाणीकपणाची.हे पदक आहे इमानदारीचे. ज्या बिकट परिस्थितीत, रोजी-रोजगारी करूनही चंद्राबाईने इमानदारी जपली. त्याला तोड नाही आणि ही इमानदारी जपली.  या इमानदारीची कदर करणाऱ्या बाळदादाची मोहिते पाटलाचीही कृती दाद द्यावी अशीच आहे.बेइमानीच्या या जगात उसणे पैसेच काय पण अख्या बँका बुडवणाऱ्या पुढाऱ्यांना या इमानदारीचा अर्थ कळेल का? माझे ते माझे - आणि तुझे ते ही माझे असे वागणाऱ्या, लोकाकडून वरची कमाई घेणाऱ्याच्या, कोटीच्या-कोटी घोटाळे करणाऱ्याच्या या जगात  इमानाची कहानी म्हणजे काजव्याचा प्रकाश, पण तो अंगचा आहे, सदगुणांचा आहे. इमानदार आणि इमानदारीची कदर करणारी व्यक्ती असतील तर तो समाजही इमानदारीच्या सत्याच्या मार्गावरून चालणाराच असेल. म्हणूनच ही गोष्ट सर्वांना सांगितली पाहिजे. ■

हळूहळू भालू गावात व घरात रूळू लागला त्याला तिसरी सोयरीक सांगून आली. बापाला लेकाच अस वाऱ्यावर हिंडण बधवत नव्हत. त्यानं त्याच झटक्यात लगीन उरकून टाकलं. भालू तो भालूचं, त्याच्या नशीबी बायकूच नव्हती. त्याच व्हायचं तेच झाल. त्या तिसऱ्या बायकोन कोणाला न सांगता दोन दिवसाचा संसार टाकून पळ काढला. भालू आपल्या नशीबावर खापर फोडून गावात राहीला.




# भालू

**विद्याधर पांडे**
प्रसिद्ध साहित्यिक, अंबाजोगाई

तीन हात उंचीच धोतरात गुंडाळलेलं आर्ध धड काकटभर कुडत्यात बसलेलं छाताड, तिरप्या टोपीत ठेवलेलं ओबड धोबड मडक्यावाणी मुंडक, पायाच्या पंज्यावर टचकत चलणार, वाळल्या लाकडाच गंडर, लव्हारकीच्या नावाखाली सुतारकी करून शब्दाची पाचर ठोकणार चालत बोलत झाड म्हणजे भालू. नाव तसं रूपडही भालू.

जेमतेम दुसरी तिसरी शिकून अक्षर ओळख झालेला भालू दोन भावाच्या पाठीवर जन्मलेली लव्हाराची तिसरी औलाद. शाळा सोडून घरी बसली तशी गावकीच्या बारदान्यात बापाबरोबर लुडबुड करू लागली. भालूच्या या लुडबुडीत चार पाच आसाम्या कमी झाल्या. लेकाची पाचरच बापाला अडचणीची होऊ लागली. तसं बापानं त्याला माळवदाची लाकडं खरेदीचा धंदा लावून बाहेर गावी हाकला पण हा पट्ट्या धंद्याचा बट्याबोळ करून वांद केल्याबिगर कधीच माघारी फिरला नाही. भालूचे भाऊ किसू आणि भिमा या दोघाचे लग्न झाले. त्यांनी काम करत करत प्रपंच सावरला. लोकांच्या घरावर माळवद टाकत टाकत स्वतःच्या घरावर दहापाच खण माळवद टाकलं तशीच चार खणाची माडी सुताराच्या उरावर चढविली.





एका दिवशी भालूला सोयरे आले. भालू पोरगी बघायला गेला पास केली आणि लगेच वैशाखात लगीन उरकीलं. लग्नात नवरदेवाला नवा कोरा धोतर जोडा, पिवळ्या रंगाच खमीस, लाल भडक रंगाचा लबरी बुटाड, डोक्यावर पांढरी फेक टोपी असा नवरदेव नटविलेला. लगीन लागलं त्याच रातीला सुपारी खेळायचा खेळ मांडला. भालनं दोन बोटात सुपारी धरली नवरीला सुटता सुटना तवा तीनं भालूच्या बोटाला करकचून चिमटा काढला अन् त्यानं आग मायव म्हणून सुपारी वरली पकड ढिली केली आता बारी होती नवरीची. तीनं दोन हाताची घोड मिटी मारली ती भालूला सुटता सुटना, बेजार होऊन त्यानं सुपारीचा नाद सोडून दिला.

सुपारीचा खेळ उरकला. वरातीची तयारी झाली होती. पांढरं म्हतारं घोडं मिरवायला आणल होत. तडमताश्याच्या तालावर भालू घोड्यावर बसताना रिकीबितला लबरी बुटाचा पाय निसटून बदकन खाली पडला. बुटक्या घोड्यानं ननगुश्या गाढवाला वरातीदिवशी हाबाडा दाखविला. पुना कसातरी घोड्यावर नवरदेव चढविला. वरात वाजत गाजत गावात निघाली. करवल्याच्या काकाला बसून नवरी त्याच्या माग माग जाऊ लागली. वाटत बोलवेल त्याच्या घरी जाऊन साखर खोबर, दुध जे मिळलं तो पाहुणचार घेऊ लागले. अर्ध्या वाटत अणीख एक घोटाळा झाला. घोड्याला कुणीतर खोडी केली त्याच्या शेपटाला फटाकडीची लड बांधली अन् पेटवली. त्याच्या आवाजान घोडं बिचकलं उड्या मारू लागलं. पहिल्या लाथेनं आकडून बसलेला भालू बदकन खाली पडला. तसाच लंगडत लंगडत उठला अन् घराकडं पळू लागला.

घोड्याची व्हटाळी धरलेला दारू पिलेला वाण्याच्या नवरीला आडवा झाला अन् म्हणाला गावाला येडा दिल्याबिगर गावात जायच नाय मंजी नाय. वरातीत बत्ती घेतलेल्या मांगाच्या इंद्रेन बनी वटेवर आदळली तीच मेंटल फोडलं अन सगळीकडं अंधार झाला. करवल्यान बोकांड्यावर घेतलेली नवरी जमीनीवर टिकविली ती ती तराट घराकडं सटकली.

दारू ढोसून तारवटलेली हौसी मंडळी गोंधळात भरकटले अंधारात जमलं ते काम करू लागले. दोनचार इबलीस गाबड्यांनी वरातीत नाचायला आणलेल्या अर्जून्या लुगड्या संगट गावाबोहरच्या धनगराच्या कोट्यात नेला.

पहिल्या दिवशी नवरा नवरीची रातर तारांबळीतच गेली तिकड अर्जून्याला कोट्यात घेवून गेलेले गाबडे त्याला आळी पाळीनं आवळून म्हणायचे भाल्या काय करीत असल र. तर दुसरा म्हणायचा हे बघ असा करीत असलं. त्याची दिवस उजडूस्तर बेजारी केली. सकाळी सकाळी पोर लव्हार वाड्याजवळच्या मारवड्याच्या वट्यावर बसून भाल्याला हाका मारू लागले. भालू काही घराच्या बाहिर निघायला तयार नव्हता. घोड्याच्या लाथनं मांडी सुजली होती. वरून पडल्यानं टिचर शेकलं होत.

बारहाल दोनचार दिवसात भालू कसा बसा नीट झाला. तवर नवी नवरी येती जातीला माहेरी गेली तशी वापस आली. देवळ्याच्या आईचा आंगुरा लावुन आले. रातच्याला आरादी गोळा करून जागरण गोंधळ घातला आन भालू नव्या नवरीला घेऊन एकदाचा माडीत घुसला. कवाड लावून घेतल. मग काय राजा पाचर ठोकाया हापलेल्या लव्हारान भातं फुकून फुकन लालबुंद झालेला गजणी ऐरणीवर घेऊन हातोड्यानं ठोकायची सूडून आरात खुपसायला गेला. तसी नवी नवरी घोड्यासारखी भाल्याच्या पेकाडात लाय घालून बोंबलायला लागली. बोंबलत बोंबलत उठली आन दरवाजा उघडून जी पळाली ती माघारी सापडीलच नाही. शेजारच्या लव्हारांनी रातीचा सारा खेळ ऐकीला होता.

भालूच्या रातीच्या भानगडीची खबर हा हा म्हणता साऱ्या गावात पसरली. जिकडं तिकडं एकच कुजबुज सुरू झाली. लव्हाराच्या भाल्याची नवरी रातीच पळून गेली. भालू गावात वावरायला शरमू लागला. माणसायली का पळून गेली त्याला काय निमित जोडाव याचा ईचार करू लागला. तशी त्याला त्याच्या कुवतीसारखी एक आयडीया सुचली तवा भालू घराच्या बाहीर निघाला. त्याला कुणी ईचारल की, मणायला लागला जावद्या तिच्या माया काळी बी व्हतीन वकटी बी व्हती. दिवळी झाल्यास दुसरी. दुनयेत काळ पडलयं का? कधी कधी एका रातीच सर्फ तिकीट दिऊन म्हणायचा चांगली नव्हती लई काळी व्हती. बर झाल गेली ती. आपलं काय नुकसान झालं. दोन चार हजार आले साऱ्या घराबाराला नवे कापडं मिळाले. पर चार पाच मासे सोन घेऊन गेली तिच्या मायला. हे भालूचं विचारणाराला उत्तर ठरलेलं असायच.

वर्षसहा महिने गेले पुना लगीन सरायी सुरू झाली. तसा भालूचा वारू फुरफुरू लागला. सोयरे धायरे येऊ लागले. एक दिवस कसातरी मेळ लागला लगीन जमलं. गाजावाजा न करता उरकून घेतलं. दुसऱ्यांदा भालू नवरदेव झाला. तसा कामाला लागला. दुसवट्याचा नवरदेव नवी नवरी तशी ती

आपीशी आन उपाशी माडीवरली खोली.

लई दिवसाची बटून गेलेली बाशिंग बळ जड असलेली पोरगी. गरीबीच्या व्यापातून आईबापाला कसा का होईना घावलेला जावाई. या सगळ्या गोष्टीचा ईचार करून कशी तरी तीन चार दिवस ती नांदली. पण नाही तिला बी सयीन झालं पाचव्या दिशी हाणला झंगारा.

आई बापाच्या भेटीला जाते म्हणून सासूसासऱ्याला सांगून गेली ती आलीच नाही. इकडे भालू त्याचे आईबाप तिच्या परतीची वाट बघू लागले. दोन चार महिने झाले तरी आली नाही. मग भालूचा मोठा भाऊ किसू जाऊन आणाव म्हणून गेला. पण ती म्हणाली मला काय नांदायच नाही.
किसून ईचारल आमच काय चुकलं बिकलं तर नाही. तसा तिचा बाप म्हणाला हे बघा सोयरे हो तुमचं पोरगं सोन्यावून पिवळ हाय पर गाढव हाय. माझी लेक काय येणार नाय. तुमच्या भावाला कुठलीबी बघा आमची आडकाठी नाय. भालूचा भाऊ तोंडात मारल्यावणी माघारी आला. तस सगळेच विचारू लागले काय झालं म्हणून. किसू म्हणाला उद्या परवा तिचा बाप घेऊन येणार हाय. तिची माय दुखण्यात पडलीय. काय सांगाव म्हणून त्यान थाप हाणली. भालूनं काय वळखायच ती वळखील आन गप्प बसला. आन दुसऱ्या दिवशी पहाटच गाव सोडून निघून गेला.

दोन वर्षापासून भालूचा मुक्काम लाकडाच्या अड्ड्यावर होता. तेथे अनेक गोष्टी शिकला होता, लाकडाच्या धंद्यात बरेच नवे चेहरे त्याला भेटत असत. त्या भेटीत तो बरेच अनुभव घेत होता. गावाच्या बाहेर पडलेला भालू चांगलाच नादात रंगला होता. भालूचा दोन नंबरचा भाऊ भिमा मेल्याची खबर भालूला लाकडाच्या अड्ड्यावर येऊन सांगितली. तो गावाकडे आला मग तो गाव सोडून परत गेलाच नाही. त्यानं गावातच शेतकऱ्याची नौकरी धरली.

हळूहळू भालू गावात व घरात रूळू लागला त्याला तिसरी सोयरीक सांगून आली. बापाला लेकाच अस वाऱ्यावर हिंडण बघवत नव्हत. त्यानं त्याच झटक्यात लगीन उरकून टाकलं. भालू तो भालूचं, त्याच्या नशीबी बायकूच नव्हती. त्याच व्हायचं तेच झाल. त्या तिसऱ्या बायकोन कोणाला न सांगता दोन दिवसाचा संसार टाकून पळ काढला. भालू आपल्या नशीबावर खापर फोडून गावात राहीला. त्याला सगळ्या गोष्टीची सवय पडल्यामुळं त्याला लोकांच्या बोलण्यात काहीच वाटत नव्हतं.

गावच्या संस्कृतीची जपणूक व्हावी म्हणून गावात सांस्कृतिक सभागृहाच्या इमारतीला आमदार फंडातून आमदारांनी निधी उपलब्ध करून दिला. त्या कामाचं टेंडर निघाल. जसा गावात कधी कधी कोणाच बी टेंडर निघायच तसच. गावच्या पाटलाच्या पोरांन ते काम करायच ठरविलं. त्यान कोणाच तरी नेहमीसारखं रजिस्ट्रेशन पैदा करून स्वतःच्या नावानं टेंडर फी भरली. तस त्याचा शानपणा उघडा पडला. ही गावची शहाणी संस्कृती अशा मार्गान का व्हईना पर उघडी पडली.

अधिकाऱ्यानं दुरूस्ती करून निभावून घेतलं.

सांस्कृतिक सभागृहाची इमारत गावच्या इशीत हळूहळू वर चढू लागली.गावच्या पाटलाचं पोर गुत्तेदार त्यामुळं गावच्या पोरीबाळा पाटलाच्या कामावर जोमानं नटून थटून येऊ लागल्या. इमारतीच्या ईटा पाण्यात बुडवून गंवड्याच्या हातात देता देता थापीत वाळू सिमेंटचा माल घेऊन ईटाच्या सांदीत बसवू लागल्या.

गावचे टुकार पोरं हळूहळू त्या सांस्कृतिक सभागृहाच्या इमारतीजवळ येऊन त्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊ लागले. खिडक्यांच्या बरोबरीनं भिंती वाढू लागल्या. तसतसी त्या गावच्या इमारतीत गावची संस्कृती रंग भरू लागली. हातभट्टीची ढोसणाराला आडूसा झाला. तसाच गांजा ओढणाराला त्या संस्कृतिनं ओसरा दिला.

रातीला पोतीच्या टायमाला माणसाची वरदळ कमी झाली की, पेटलेली पोरपोरी त्या सांस्कृतिक इमारतीत हातात हात घालून  आन कशात काय घालून धिंगाणा घालू लागली. या धिंगाण्यात गवळ्याच्या संगीतीचं संगीत जोमान सगळ्यापुढं वाजू लागलं. तिच्या सांस्कृतिक कामात भलेभले गार होऊ लागले. चारपाच जणाली गवळ्याची संगी आवरना तवा पोरांना लव्हाराच्या भालूची याद आली.

असच एका दिवशी संगीला घेऊन दोनचार गाबडे इमारतीत घुसले. तस एकान हळूच भालूला धुंडाळून आणलं. लई दिवसान इसावलेला भालून सवताचा इंगा दावला तवा संगी गडबडा लोळून बोंबलू लागली भालूला सोडून सारेच पळून गेले. त्याला कुठं पळाव समजना तवा संस्कृतिच्या खिडकीवर चढून उडी मारली आन नेमका चांभाराच्या दारात पडला, तर तिथं गावच्या सरपंचाचा तिथला सांस्कृतिक कार्यक्रम भरात आला होता. सरपंचाचा तिथला गावची संस्कृति जपणारा कार्यक्रम बघून भालू जरा धटच झाला. मग जी होयील ती होयील मोठ्या रस्त्यानं न भिता भालू गावच्या पाटलासारचे दमदार पावलं टाकीत घराकडं गेला.

सकाळी सकाळी भालूला बघून पोर हसायला लागली. तवा भालू म्हणला काय झालं खिदायला आर त्याला काय भ्याचं. गावचा कर्ता जी करतोय तसलच आपून बी केल. काय वेगळ केलं का? आन त्यान चांभाराच्या घरातला प्रसंग पोराली रंगवून सांगितला.

भालू लाकडाच्या अड्यावर राहिल्यापासून चांगलाच सराळला होता. त्याला कोणाचीच पर्वा वाटत नव्हती. तसेच त्याच्या पराक्रमाच्या गोष्टी गावच्या रंगेल बाया एकमेकीला चवीन सांगत होत्या. ते ऐकून नन्ही भालूच्या नादाला लागली. अन काय करायचं ती करून बसली. तसी तिनं गावत एका सांस्कृतिक नावाची भर टाकली.

शेतात भालू बैल घेऊन येता जाता नन्ही भी सरपण गोळा करायच्या निमतान जायची. भालू वाटत भेटला की, हळूच ओठान चिमटा घ्यायची. कुठ निघालं की माय, बैलामागून नन्हूस गाढवं. या नन्हुशा गाढवाचे पराक्रम गावच्या संस्कृतित वाढू लागले. त्याच ध्यान एके दिवशी घरातच टेकलं. मेलेला भाऊ भिमा त्याच्या बायकूवरच त्याचा जीव जडला. तसा घरातच वैणी वैणी करीत तिच्या भवताली फिरू लागला. त्या रांडव वैणीला आंघोळ करण अवघड झाल. हे घरचं संकट सांगाव कुणाला.

बाईचा नवरा मेला तस मोकळी पडली त्या शब्दाची वेगळीच भिती. त्या भितीनं व भालूच्या कचाट वागण्यानं ती घरातल्या घरात जीव मुठीत धरुन जगू लागली. एका दिवशी भालूनं नजर ठेवून वैणीच्या वाकळत शिरायच ठरवलं. तसा बेंडकुळीवाणी पायऱ्या चढू लागला. बापाची बी नजर त्याच्या करामतीकड होतीच. भालूला माडीच्या पायऱ्या चढताना बघून बापानं अडविल पण इरेला पेटलेला भालू आवरता आवरना. हातात सापडलेल्या इटकरीनं बापाला घायाळ करून माडीवर चढलाच.

सकाळी सगळ्या गावात बोंब झाली. पण भालू काही घाबरला नाही बापानं केस करून चार आठ दिवस जेलमधी घातला तस त्याच्या मालकाला सांगून तस पुन्हा वागणार नाही या हमीवर सोडवून आणला. तरी धान खायला लकलेलं जनावर कुपाटीवरून उडी मारून धान खातचं. तस भालूच सांस्कृतिक कार्य घरातल्या घरातच चाल राहिलं. भालूला मुद्दामच एका दिवशी त्याच्या मालकानं विचारल गाव म्हणतय ते खर हाय का?

तसं भालू म्हणाला,

''गावकर्त्याला कुठ बी श्यान खायची सवय हाय, भाडखाऊ गरिबाच्या अंगाला बी श्यान लावतोया. त्या कडूची नजर आमच्या भावजयीवर पडलीया माणूनशान श्यान खाल्यावाणी बराळ्या लागलाय,''

'' मालक तुमीच सांगा थोरली भावजय मायी समान असतीया का नाय?''

'' मायीसंग कुणी जायील का? ''अस उत्तर देऊन मालकाला त्या वेळपुरत गप्प केलं,

चोरी आणि सिंदकळी सपादत नाही म्हणतात ते काही खोट नाही. भालूचा प्रताप एके दिवशी उघडा पडायचा तो पडलाच. मार्च महिन्याचं दुपारच किर्रर ऊन होत. रानात झळ्या लागत होत्या. मालकाच्या रानात उसं लावायची तयारी चालू होती. शेतात वाफे तयार होते. पाट भरून वाहात होता. मजूर शेजाऱ्याच्या फडातून उस तोडून बैलगाडीन मालकाच्या बांधावर बाभळीच्या झाडाखाली आणून टाकीत होते. मालक बाभळीच्या सावलीत बसून हातान उसाचे तुकडे करून बेणं तयार करीत होता. तेवढ्यात गावात भाकरीला गेलेला भालू धापा टाकत मालकाजवळ आला आणि म्हणाला मालक जरा हिकडं या अवघड बोलायचयं. भालू घामानं भिजून गेला होता. त्याला बोलायचं सुदरत नव्हतं.

भालू हळूच म्हणाला,

'' मालक लई भानगड झालीया वैणीला दिवस गेल्यात. दीड महिना झालया ती बाजूला बसली नाय सकाळ पासन सारखी वकाया लागलीय. घरी रोटीला गेलो तवा घरात सगळा कालवाच. मला काय कराव काय नाय ते समजनाच गेलय मालक. माझ मन हाय की दवाखाना गाठावा आन अपकार करावा. काय खर्चच्या येल ती येल, दोन चार महिने फकट नौकरी घालीन. पर मालक तुमीच बघा.''

मालकाला ऊसाचं बेणं तोडून लावायची घाई होती. लव्हाराच्या बेण्यानं हे काय मांडलया म्हणून मालक चिंतेत पडला होता. तेवढ्यात मालकाला भालूचे मागचे शब्द आठवले. तसा त्याला म्हणाला,

'' भाल्या अखीर मायीसंग गेलास कीर कडूबेण्या. तुला माणूस मनाव की हैवान. कराव ती बी कराव नाही ती बी कराव. बापाच्या तोंडाला म्हातारपणी काळं लावलस.''

मग भालू गयावया करू लागला. मालक एवढ्याबार काय बी मना पर येळ मारून न्या. म्या जनमभर उपकार इसरायचा नाय. कसा तरी मालक राजी झाला. दुसऱ्या दिवशी शेतातला कामधंदा सोडून त्यान तालुक्याच्या दवाखान्यातला डॉक्टर गाठला. त्याला पाचशे रू. फी ठरली पण भालूला एक हजार सांगितली. भालून त्याच्या वैणीला दवाखान्यात शरीक केलं.

भालूच्या मालकाला डॉक्टर म्हणाला, '' या बाईजवळ दुसरी एखादी बाई किंवा मुलगी लागेल. ॲबॉरशन झाल्यास खुप रक्त वगैरे जात. तेव्हा सारखं स्वच्छ कराव लागत माझ्याकडे नर्स नाही.'' डॉक्टरच म्हणनं मालकानं भालूला सांगितलं तसा भालू म्हणाला,

'' आमचेत कुणी पोरगी बिरगी नाय म्याच केलया म्याच निस्तारीन.''

डॉक्टरनं भालूच्या वैणीचा अपकार केला. भालून दोन तीन दिवस तिची करूनी ती सेवा केली. भालू मोठ्या संकटातून सुटल्यागत गावाकडे वैणीला घेऊन गेला. भालू आता बिनधास्त झाला होता. कारण त्यानं डॉक्टरकडून वैणीचं कुटुंब नियोजनाच ऑनरेशन करून टाकलं होत. हळूहळू भालू पूर्ण निसवला होता. हैब्रीड ज्वारीच्या कणसांसारखा भेडा झाला. वैणी आन भालू राजरोस नवराबायकू सारखं वावरू लागले. त्याच्या पोटाची अन सगळीच व्यवस्था चोख होऊ लागली. त्यान लग्नाचा नाद सोडून दिला. वैणी व भालू दोघही स्थिरावले. गावच्यानी व घरच्यानी त्यांचा नाद एकदाचा सोडून दिला. ■

मी खडबडून जागा झालो. चिखल तुडवत दावनी पर्यंत आलो तर. सगळ्या शेळ्या मरून पडलेल्या. मायेने एका शेळीला सांभाळलेले. मी एका शेळीजवळ जात होतो, रडत होतो. वडील मला समजावत होते. आमच्या घरावर अवकाळी पावसाच्या रूपाने संकट कोसळ होतं. शहाणी माणसे येऊन समजावत होती. तलाठी यांनी पंचनामा करावा. नुकसान भरपाई मिळेल म्हणून कोणी प्रयत्न करत होते.



# अवकाळी

**दत्ता वालेकर**
प्रसिद्ध साहित्यिक,घाटनांदूर

दिवस उन्हाळ्याचे डोंगराकडून एक ढग निघाला इपरीत वारं सुटलं अवकाळी आभाळ भरुन आलं. वाऱ्या मागं टपाटपा पावसाच्या धारा सुरु झाल्या. की मग ते दिवस आठवतात आठवणींचे आभाळ फिरून येत. विजांचा थयथयाट नाच सुरू होतो, मुसळधार पाऊस असा मुसळधार शिवारातल्या झाडनं झाड उभे राहिले नाही कवा बी टपा टपा थेंब सुरू झाले म्हणजे, तो दिवस मनामध्ये येऊन गपकन मनामध्ये विजांचा लखलखाट सुरु होतो. आभाळ भरून येतं आणि डोळ्यातून धारा सुरु होतात.त्याला कारणही तसंच हाय.

दसरा दिवाळीचे सुगी दिवस. फुलोऱ्यातआलेली बहरलेली माझे दहावीचे वर्ष अभ्यास चांगला चालू सराव परीक्षा चाचणी परीक्षा सर्व प्रकार गुरुजी हाताळत होते. घरी सारखं चर्चा व्हायची पुढल्यावर्षी पोरगा तालुक्याला शिकायला जाणार आहे. त्यातच आजी म्हणायची नाही नाही मी तिकडे शहरात माझ्या नातवाला पाठवणार नाही. आजीचं आंधळ प्रेम. आईला फक्त मी शिकून मोठा व्हावा असं वाटायचं वडिलांची वेगळीच अडचण वडिलांनी पाच शेळ्या पासून सुरू केलेला शेळ्या राखण्याचा व्यवसाय आता त्या पाच पासून पन्नास-साठ शेळ्या झाल्या होत्या, म्हणून त्या राखण्यासाठी अडचणी येत होत्या. एकेदिवशी झालं ही तसचं बाप शेळ्या चारून येत होता वाटत लंगडी शेळी भरभर चालत नव्हती. मग बाकीच्या शेळ्या पुढे जात होत्या. मग त्यांच्याबरोबर जाऊ की त्या पुढच्या शेळ्या बरोबर जावं या अडचणीत असताना पुढील शेळ्या शेतकऱ्यांच्या पिकातमध्ये गेल्या


होत्या शेतकरी शिव्यांची लाखोळी वाहत होता, अरे गंगा शोभतं का तुला हे शेळ्या राखण्या होत नाहीत तर कशाला एवढे जास्त करायच्या, बाप काहीच बोलत नव्हता. रागं रागं शेळ्यांना मारत होता. त्यांच्या डोक्यात एकच होतं की पोरगं शाळा शाळा करतोय त्यांनी शेळ्या राखण्यात मला मदत करावी. दहावीचे वर्ष आसल्यामुळे माझा अभ्यास चागलाच चालू होता.

मग एके दिवशी योगायोगही तसा झाला शाळेमध्ये माझं काही कारण नसतानाही सर मला मारत होते. गुरुजीनी सांगितलेला गृहपाठ पेन्सिल नसल्याकारणाने करू शकलो नव्हतो ते कारण शुल्लक होत. मला मारत असतानाच माझ्या पायाला काहीतरी लागल्याचा भास झाला, बाजूच्या बाकावर बसलेल्या सखी नावाच्या मुलीने माझ्याकडे पेन्सिल फेकली होती. मी मागचा पुढचा विचार न करता ती पेन्सिल उचलली. हा प्रकार बऱ्याच मुला-मुलींनी पाहिला खरं म्हणजे वय प्रेम-बिरम कळण्याइतक नव्हतं आणि त्याकाळी कागद-पेन शिवाय दुसरं कुठलंही साधन नसल्यामुळे फक्त चर्चेशिवाय काहीच नव्हतं. सखी आमच्या गल्लीत सातवी पासून तिच्या मामाकडे आली होती.पण माझं आणि तिच कधीच बोलनं नव्हत. गृहपाठ उद्या पूर्ण करून आणतो असं सरांना विनंती करीत होतो. तरीही सर मारत होते.

मी घाबरतच घराकडे निघालो होतो. सखी तिच्या मामाच्या इथे राहून शाळा शिकत होती. शाळा सुटल्यावर  मुलीच्या घोळक्यातून माझ्याकडे बघून म्हणत होती काय..काय माणसं काय भित्री असतात ग, मी खाली मान घालून घरी आलो. वर्गात झाल्या प्रकाराची पोर चर्चा करत होती, माझंही मन काठ काठनं भरुन येत होत. सखीच्या मामाचा मुलगा राम्या आमच्याच वर्गात शिकत होता.त्याला हे सहन होईना त्यांन मला अडवून म्हणाला. उद्या जर तू सखीला बोललास तर दगडया तुला एका दगडातच गार करील. मी खरच भित्रा होतो.

मग मी घरी आल्यानंतर हातातील दप्तर खुंटीला अडकलं आणि खुंटीवर ची शेळ्याची दावण हातात घेऊन बापाच्या माग गुमान निघालो. त्या दिवशीपासून मी लगडी शेळी लहान लहान कोकर घेऊन सांभाळत होतो. गाव शिवारात बसून आणि शेळ्यांचे दूध, शिवारातील रानमेवा खाऊन मी ते शाळेचे दिवस विसरत चाललो होतो. शिवरात्र होऊन चार आठ दिवस झाले होते मी शेळ्याकड चांगला रमलो होतो.

असाच एक ढग डोंगराकडच्या कोपऱ्यातून वर येत होत. येता येता सारा शिवार त्यान झाकून टाकला. चार पाच वाजताच काळाकुट्ट अंधार विजांचा थयथयाट चालू होता. शिवारात सारी सुगी उभी होती अमराई फुलोऱ्यावर नवतोवर घेऊन फुलली होती. पण अचानक सुटलेल्या वाऱ्याने मनात धडकी भरली होती.घाईघाईनच शेळ्या दावणीवर आणल्या. वाडीतून भाकरी आल्या होत्या. आम्ही



जेवणासाठी बसलो. पहिला घास घेतला असेल नसेल टप टप टप टप थेंब सुरू झाली.काय करावं कळना झाले. बरंच दूर असलेल्या वरच्या आवडातील कोठ्यावर जाऊन थांबलो. कोणी मनित होतं गारा चालू आहेत.. त्यात वारा बी वारू धावा वा तसं धिंगाणा घालीत आहे. एकमेकाला बोललेलं काही आवाज येत नव्हता. कानात फक्त सू.सू..सू...धाड.. धाड... धाड...एवढाच आवाज येत होता. एवढ्यात मोठयाने वीज कडाडली. आवाजाने माझ्या जवळचे पिल्ले, कोकरे मोठमोठ्याने ओरडू लागली. कुणालाच काही सुचत नव्हतं.

पाऊस उघडण्याचा नाव घेत नव्हता. सकाळी जेव्हा शेळ्यांचे पिल कोकर मोठ्याने ओरडत होती. मी खडबडून जागा झालो. चिखल तुडवत दावनी पर्यत आलो तर. सगळ्या शेळ्या मरून पडलेल्या. मायेने एका शेळीला सांभाळलेले. मी एका शेळीजवळ जात होतो, रडत होतो. वडील मला समजावत होते. आमच्या घरावर अवकाळी पावसाच्या रूपाने संकट कोसळले होतं. शहाणी माणसे येऊन समजावत होती. तलाठी यांनी पंचनामा करावा. नुकसान भरपाई मिळेल म्हणून कोणी प्रयत्न करत होते. रातचा पाऊसच ईपरीत होता गावात कुणाचे मातीचे घर पडले तर कुणाचे पत्र उडाले लैईच इपरीत.

कोणीतरी बातमी आणली. रात्रीच्या पावसाच्या टायमाला. सखी व राम्या रेल्वेने पळून जात होते. दोघांनी उडी मारली... राम्यापटरी खाली गेला. सखी मात्र वाचली होती. राम्याच्या मामाची मुलगी सखी. तिच्यावर त्याचा पूर्वीपासूनच डोळा.

परवा त्यांच्याच नात्यातला एक मुलगा. जिल्हा परिषद च्या शाळेत शिक्षक म्हणून लागला होता. त्याला कुणीतरी निरोप दिला. आमच्या वाडीत दासूची मुलगी फार सुंदर आहे. त्यानुसार तो शिक्षक राम्याच्याच ओळखीने राम्याच्या घरी आला. चहा पाणी झाल्यानंतर राम्याच्या आईने पाहुण्याच्या बरोबर राम्याला सखीच्या घरी जाण्यास सांगितले. सखीलाच बघण्यासाठी तो आला. राम्याचं सखी वर एकतर्फी प्रेम होतं. ते तिला माहिती नव्हतं आणि दोघांच्याही घरात कोणाला माहित नव्हत. राम्या पाहुण्याबरोबर जात होता खरं पण त्याच्या मनात वेगळंच चाललं होतं. पाहुणे सखीच्या घरी गेल्यानंतर चहापाणी झाले, मुलगी दाखवण्याचा ही कार्यक्रम उरकला पाहुण्यांना पाठवण्यासाठी रामही सोबत बस स्टैंड वर गेला होता. पाहुण्यांनी राम्याजवळ मन मोकळं केलं होतं. मला मुलगी पसंत आहे. तसं तुमच्या मामाला तुम्ही कळवा. हे शब्द ऐकताच रामचा जीव आणखीनच जाळीत अडकलेल्या शेळीच्या पिल्यासारखा झाला होता. चारा त्याच्यासाठीच टांगलेला वर असतो. पण जाळीतून त्याला त्याचं तोंड पुरत नाही आणि दुसरच मोठं बकरं येऊन तो चारा खात असतं. त्या पिलाला काहीच करता येत नाही.

पाहुण्यांनी निरोप दिला आणि ते एसटीने गेले. खरे पण इकडे राम्याला रात्रभर झोप नाही. राम्या स्वतःलाच म्हणू लागला ही जर वेळ गेली. तर आयुष्यातून आपली सखी आपल्यापासून दूर गेली.

रात्र झाली होती, बाहेर जोराचा पाऊस चालू होता. रात्रीच्या अंधारात पावसाच्या आवाजाने काहीच कळत नव्हतं. अशा रात्रीच्या अंधारात धो धो पावसात दोन किलोमीटर असलेल्या रेल्वे स्टेशनवर राम्या सखीला घेऊन कसा गेला. रेल्वेतून तर दोघांनी उडी मारली होती. सखीला ही खूप मुक्का मार लागला होता, रामच्या डेढ बॉडीचा पंचनामा झाल्याशिवाय आमच्या शेळ्या मेल्या त्याच्याकडे कुंणांचेही लक्ष देणार नव्हतं. राम्याची आई धाय मोकलून रडत होती. पण राम्याचा बाप झाडाच्या बुडाला पाठ देऊन बीड्यावर बिड्या ओढत बसला होता. चौकशी करणाऱ्याला एकच सांगत होता अवकाळी दुसरं काय, मलाही या पावसानं सार वाहून गेल्यानं अवकाळी काय असत ते कळालं होत. ■

आजही मला त्या तळ्याच्या पाळूवर नजर गेली की,  प्रत्यक्ष त्या पाळूवर मी आणि बाबन शेख उभा आहे असे वाटते. एखादी आठवण ही खोल रुजत आणि रुतत गेली की तिची साठवण होते. माझ्या मनातील त्या तळ्याच्या अन्यही आठवणी आहेत पण मी त्या इथे सांगणार नाही. कारण त्या सांगतानाच माझे हुंदके मलाही आवरताा येणार नाहीत. काही अनुभवाच्या अस्पष्ट रेखाटनातच त्याची स्पष्टता दडलेली असते हेच खरे.

# तळ्यावरची भाकर



**प्रा.डॉ.रुद्देवाड बी.पी.**
मराठी विभाग प्रमुख, स्वा.रा.ती.म.,अंबाजोगाई

पोटापाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी मानवी जगण्याची आयुष्यभर आदळ आपट व खटाटोप चाललेला असतो. गरीबी आणि श्रीमंती ही दोन्ही माणसाच्या नशिबी लागलेली सुंदर विशेषणे आहेत. पोट भरण्यासाठी मिळेल तिकडे, मिळेल तसे काम स्वीकारुन आपल्या कर्माचे फेरे चुकवण्यासाठीच की काय ही दोन पदांची यात्रा (दोन पाय) वाट फुटेल तिकडे मनात फक्त काम .... काम आणि काम याच आशेनं भाकरीचा प्रश्न मिटविण्यासाठी सातत्याने चालत असते. कुमठा (बु.) या गावातील एका गरीब कोळी समाजातील माझा एकोणीशे सत्तरचा जन्म असून माझे घर एका साध्या, सामान्य पण इमानदार माणसाचे व कुटुंबाचे घर. गावातील माणसे मला आजही सांगतात की, तुझे आजोबा राजाराम मानेजी (कोळी) रुद्देवाड व तुझी आज्जी मंजुळाबाई हे अतिशय कष्टी, मेहनती, इमानदार माणसं होती. ही विधानं आणि माझ्या आजी आजोबांचे कष्टातील दिवसाबाबतचे वर्णन आजही माझ्या मनात अगदी भिजलेले व जिवंत आणि ज्वलंतपणे भरुन आहे हे मी विसरुच शकत नाही. भाकर ही भूकेचा आणि जगण्याचा मोठा आधार असते. भाकरीवर आजपर्यंत विविध लेखक, कवी व साहित्यिकांनी लेखन केलेले असून हे लेखन मनाला भावणारे व विचार करावयास प्रवृत्त करते. गौतमबुद्धांची भाकर, नारायण सुर्वेयांची भाकर व उत्तम कांबळे यांची भाकर ही जीवनाचे तत्व आणि तत्वज्ञानही सांगणारी भाकर आहे. माझी भाकर अशाच स्वरुपाची पण थोडी वेगळी आणि तळ्यावरची भाकर आहे.

जगात भाकर सर्वांसाठी सारखीच असून ती महत्वाचीही असते. ही माझी भाकर इ.सन. १९८७ व १९८८ या काळातील भाकर असून या भाकरीत विविध असे कष्ट, भाव, रंग, रुप,

आकार,स्पर्श, ऊकार आणि हुंकार, वाद-विवाद, संवाद, माणसं, माणसांचा स्वभाव, सेवा, सहकार्य, विनोद, विश्रांती, नवी आशा, निराशेची व्यथा, दिशाहिनता, मुकेपणा, हाल-आपेष्टा, दया आणि दातृत्व, मैत्री, हास्य, वेदना, भरकटलेपणा, परकेपणा, पोरकटपणा, अज्ञान, अंधःकार, सामाजिक दूरस्थपणा, एकलकोंडेपणा, हरवलेपणा, कुचंबणा, होरपळ, भटकंती, बेघरपणा, निराधारपणा अशा अनेक वेगवेगळ्या विशेषणांनी नावारुपास आलेली ही माझी त्या काळातील घाबरलेली, बावरलेली, लाजलेली, मरगळलेली, रडलेली, आखडलेली, बंदिस्त असलेली माझी प्रामाणिक आणि रक्तामासातील संवेदनशील भाकर, भूकेच्या पोटासाठी वारंवार एकेका घासासाठी लाखवेळा मला छळलेली ही भाकर म्हणजे माझी तळ्यावरची भाकर होय.

कडक उन्हाळ्याचे दिवस होते. माझ्या कुमठा (बु.) गावापासून पश्चिम दिशेला सात किलो मीटर अंतरावरील एक छोटे वायगाव नावाचे गाव असून त्यात अलिकडेच एक तळे आहे. हे तळे आजही कायम माझ्या स्मरणात आहे. या माझ्या भाकरीची खरी कथा-व्यथा स्पष्टपणे सांगणारे हे एकमेव तळे आहे. भाकरीच्या शोधासाठी हे तळे मला रोज कामासाठी बोलवायचे. कुमठा (बु.) ते वायगाव या सात कि.मी.च्या अंतरास दररोज पूर्ण करण्यासाठी पायपीट करावी लागत होती. सकाळी आठ ते संध्याकाळी सहा असा नित्याचा प्रवास व कामाचा कालावधी असायचा. या तळ्यावर काम करण्यासाठी वायगाव, सय्यदपूर, बोडका, कुमठा (बु.) या गावातील लोक येत होते. मी या वेळेत एक बारावी अनुत्तीर्ण झालेला विद्यार्थी होतो. खरे तर अकरावी आणि बारावी हे दोन वर्ष पुर्णपणे तळ्याची कामे करणे व शिवणखेड परिसराजवळील येवरी गावातील शेत शिवारात लेवलिंगची काम करण्यात गेली. माणसाचा खऱ्या जगण्याचा इतिहास त्याच्या कर्मातून घडत असतो. वायगाव येथील तळ्याच्या कामासाठी वगवेगळे ग्रुप असायचे. त्यावेळीही दुष्काळाचे सावट होते. त्यामुळे सामान्य जनतेला काम केल्याशिवाय भागतच नव्हते. तळ्यातील माती व मुरुम खोदून तळ्याच्या पाळूवर आणून टाकून तो पाळू उंच करण्यासाठी लाकडी खोक्यानुसार रोजगार मिळत होता.

तेथे फार काही गर्दीतील काम नव्हते पण अत्यंत गरीब लोक तेथे कामासाठी हसखास येतच होते. त्यात मीही होतोच. तळ्यावरील कामाच्यावेळी मी बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थी असल्यामुळे, दुष्काळामुळे व गरीबीमुळे मला तळ्यावरची कामे करावी लागली. कुमठा गावातील कामगारांचेही तळ्यावरील कामासाठी वेगवेगळे ग्रुप होते. प्रत्येकांचा एक ठरीव असा ग्रुप होता. आमचा ग्रुप फार मजेशीर, आनंदी व विनोदी होता. आमच्या ग्रुपचे मुख्य गट नेते युसूफ अब्दुलसाब शेख होते. या गटात काही दिवस शादुल अब्दुल शेख, माझा छोटा मित्र बाबन हुशेनसाब शेख, मी स्वतः, बाबनची आई इंतियाजबी शेख असे आम्ही सर्वजण होतो. काही दिवसानंतर ग्रुप विभक्त होवून काहीजण

दुसऱ्या ग्रुपमध्ये जायचे व काहीजण आमच्या ग्रुपमध्ये यायचे. आमचा युसूफ शेख यांचा ग्रुप मात्र फुटलेला नव्हता. या ग्रुपमध्ये आम्ही काही ठरलेली माणसे कायमच होतो. युसूफ अब्दुलसाब शेख हे आमचे ग्रुप मॅनेजर हे अत्यंत गरीब, प्रेमळ, काम समजावून सांगणारे, कामामध्ये सर्व लहान थोरांना सामावून घेणारे होते. कामामध्ये ताणतणाव येवू न देणारे, मनावर व आनंदाने काम करण्यासाठी प्रेरणा देणारे, वेळ प्रसंगी हसवणारे आणि कामात सातत्य ठेवतच माणसाला प्रसन्न करणारे व्यक्तिमत्त्व होते. या व्यक्तिविषयी आजही माझ्या मनात अत्यंत आदर आहे. याच गटात माझ्यापेक्षा दोन वर्षाने लहान असणारा माझा मित्र बाबन हुशेनसाब शेख हाही होता. हे व्यक्तिमत्त्व फारच वेगळं होतं. एक विनोदी, निरागस, उमेदी, ताकतवान, कामामध्ये झोकून देणारं, मनाला सातत्याने प्रफुल्लित करुन कामात आळस व दुर्लक्ष न होवू देणारं असं हे एक अप्रतिम व दर्जेदार व्यक्तिमत्त्व होतं. बाबन शेख यांच्यामुळे मीही अगदी मन लावून कामे केलेली आहेत.

गरीबी असल्यामुळे बऱ्याच वेळा बऱ्याच ठिकाणी आम्ही दोघे मिळून कामे केलेली आहेत. तळ्यावरच्या कामाचा आनंद आणि मौज काही वेगळीच होती. कडक उन्हात पाळूवर माती टाकणे, खोदणे, भरणे अशी विविध कामे करावी लागत. दुपारी दीड ते दोनच्या दरम्यान जेवणाची वेळ असायची. तळ्याच्या पाळूच्या बाजूलाच खाली एक छोटी विहीर आहे व रस्त्यावरच बाजूला वायगाव ते कुमठा (बु.) गावाकडे जाणारी सडक आहे. तिथे आंब्याची भली दोन मोठी झाडे व ऐन रोडवरच्या एका छोट्या पुलाजवळच आमच्या जेवणाची पंगत बसायची.

बऱ्याचवेळा आम्ही या पुलारवच बसून जेवण करत होतो. काही वेळा दाट आंब्याच्या झाडीत म्हणजे रोडच्या पलिकडील बाजूस थोड्या अंतरावर असलेल्या दुसऱ्या विहिरीवरही आमचा जेवणाचा मुक्काम असायचा.

माझ्याकडे हायब्रीडच्या दीड किंवा दोन काळ्या भाकरी व पांढऱ्या डब्ब्यात पातळ वरण किंवा पिठले असायचे. सर्वजण एकत्र बसून जेवण करत होतो. मी मात्र आपला डब्बा थोड्या वेगळ्या अंतरावर घेवून गटाचा अंतर ठेवून जेवण करत होतो. दिवसभर काम करुन भूक लागायची. कधी कधी भाकर पुरायची नाही, कमी पडायची. कधी कधी जेवणच आवडत नव्हते. कधी कधी स्वतःलाच स्वतःचा रागही यायचा व वाईटही वाटायचे. कधी कधी नशिबाला व देव आणि दैवालाही मी दोष देत होतो. आपण गरीब आहोत, पर्याय नाही, पुढे काय होईल अशा प्रश्नांनी मी बैचेन होता. पण अगदी प्रामाणिकपणे, निष्ठेने, आनंदाने काम करुन मी जगत होतो.माझी तळ्यावरची भाकर काळी, साधी, कमी होती पण ती अत्यंत मेहनतीची, कष्टाची, उन्हातली, तळतळणारी, विचार करणारी, सदैव काळजीत अडकलेली पण ती आनंदाची, शांततेची, संयमाची, नियमाची, शिस्तीची, आदराची,

करुणेची, माणुसकीची, प्रेमाची, सहकार्याची, संवेदनेची भाकर होती. ते तळे, ती भाकर, त्या वेदना, तो प्रसंग, ते अनुभव, ती स्थळे, ती माणसे, ती गावे, तो संवाद, ती मानसिकता आणि ती माणसे आजही माझ्या कायम स्मरणात असून ती माझ्यातून कधीच संपत नाहीत. अशा विरारक अनुभवातील हे माझे तळे व ही माझी तळ्यावरची भाकर आहे.

आजही माझ्या गावाकडे जाताना मला त्याच तळ्यावरुन जावे लागते. तिथल्या आठवणी, तिथली माती, तो परिसर, ती झाडे, ते प्रसंग, त्या कामाप्रसंगातील घटना, ती माणसं आजही माझ्या मनात कायम घर करुन बसलेली आहेत. ती माझ्या नजरेतून कधीच सुटत नाहीत व मिटतही नाहीत. माझ्या वेदनेला त्याकाळी सामर्थ्य उभं करुन देण्याचं काम एका अर्थानं बाबन शेख यांनी केलं असं म्हणावं लागेल. आपलं जीवन हसत-खेळत, आनंदानं काम करत, विनोदानं संवाद साधत कसं जगायचं हे आदर्श पाठ बाबन शेख यांच्याकडूनच मिळाले. कारण या व्यक्तिमत्वामुळे मला दुःखाची व कष्टाची तीव्र जाणिव वाटत नव्हती. अत्यंत अडचणी, दुःख व वेदना समोर असली तरी त्यांच्या विनोदी संवादामुळे व हसण्यामुळे माझं मन हलकं व्हायचं. माझ्या सबंध आयुष्यातील एक हसता खेळता जिवंत चित्रकार म्हणून व नायक आणि खलनायक म्हणूनही बाबनचा उल्लेख करता येईल.

तळ्यावरच्या भाकरीचा एक हसता खेळता प्रासंगिक नट म्हणून बाबनला मानावे लागते. कारण कामं शाधून ती कामं आनंदानं करण्यात आणि करवून घेण्यात बाबनचं एक वेगळं कौशल्य, विनोद व आनंद होता. त्याचे अनेक प्रसंग माझ्या स्मरणात असून एक अत्यंत धाडसी असं हे व्यक्तिमत्व होतं. आजही मला त्या तळ्याच्या पाळूवर नजर गेली की, प्रत्यक्ष त्या पाळूवर मी आणि बाबन शेख उभा आहे असे वाटते. एखादी आठवण ही खोल रुजत आणि रुतत गेली की तिची साठवण होते. माझ्या मनातील त्या तळ्याच्या अन्यही आठवणी आहेत पण मी त्या इथे सांगणार नाही. कारण त्या सांगतानाच माझे हुंदके मलाही आवरताा येणार नाहीत. काही अनुभवाच्या अस्पष्ट रेखाटनातच त्याची स्पष्टता दडलेली असते हेच खरे. तळ्यावरची कामं आनंदानं करत करत शिक्षण सुरुवात ठेवल्यामुळं आज मी प्राध्यापक झालो पण असे असतानाही का कोणास ठाऊक त्या तळ्यावररुन जाताना आजही मला की प्राध्यापक नाही तर एक कामगार आहे असेच सातत्याने वाटते. ते तळे, ती भाकर आणि तो बाबन व मी अशा अनुभव संपन्नतेतच आजही ते चित्र माझ्यासमोर जसेच्या तसे उभे राहते. ते नजरेतून कधीच सुटत नाही आणि तळ्यावरची भाकर ही आजही जीवंत, बोलकी, संवादी, विनोदी, रडवणारी व अडवणारी आहे. माझी तळ्यावरची शहाणी भाकर. ■

अंगावर कितीबी काठ्या पडल्या तरी त्यांच लक्ष अजिबात इकडं - तिकडं जात नव्हतं. आखाड्यात जसं दोन पैलवानात कुस्ती लागावी अन कुणीच मागं सरकू नये, डाव चांगलाच रंगात यावा तशी ह्या दोन बैलाची टक्कर चांगलीच रंगात आली व्हती. प्रत्येकजण आपआपल्या परीनं ह्या दोन बैलाच्या भांडणाचं कारण शोधू लागला व्हता. एवढ्या वेळात गावातली तरणीबांड पोरं हातामंदी मोबाईल शुटिंगचे कॅमेरे घेऊन पुढे सरसावली.



# टक्कर


**- सिद्धेश्वर इंगोले**
साहित्यिक,परळी वै.


यंदाचा पाऊस काळ कमी झाल्यानं दरवर्षीसारखा उत्साह दिसून येत नव्हता. गणू आपली बैलं घेऊन गुराडीच्या तळ्याकडं निघाला व्हता. उन्हाच्या झळा बसत व्हत्या. दुपार टळून गेली तरी आणखी ऊन उतरलं नव्हतं. वाटत गोरोबा भेटला, काय रं, गणू, लई उशीर केलास बैलायंला धुवायला. तळ्यावर कुणीच न्हाई, सम्देजण बैलं धुऊन गेलेत, अन तू आता चाल्लास व्हयं ? गोरोबाचं म्हणणं ऐकल्यावर गणू सांगू लागला, आरं बाबा मी कधीच तळ्याकडं येत न्हाई. दरवर्षी मी आपलं नदाडालाच बैलं धुऊन टाकतो. औन्दा नाईलाज झाला म्हणूनंच घेऊन आलो बैलायंला. गनबा काईबी म्हण पर ह्या वर्षी पोळ्याला काईच मजा न्हाई राव. सम्द्याची तोंडं सुकलेत. उगं आपलं करायचा म्हणून सण साजरा करायची येळ आलीय. गोरोबाच्या बोलण्याला होकार देत गणू म्हणाला, काय करावं दोस्तां, ह्या वर्षी सारखा दुस्काळ ह्याच्या आधी कधी मी बगितला नव्हता. बैलाचा सण हा वरसातून एकदाच येतो, मंग साजरा तर करावाच लागंल की. गोरोबाचं अन गणूच बोलणं चालू असतांना बैलानं ओढ दिली आणि गणू गोरोबाला म्हणाला, बरं जाऊ दे उद्या भेटू मिरवणुकीच्या टायमाला. बँड कुणाचा हाय ? साळबांचाच ठरीव. तुझ्या जोडीम्हागं माजीबी जोडी ठिवतो. चल जातो म्या. गणू लगबगीनं तळ्याकडं निघाला.

कधीकाळी सांडवा वाहून जाणाऱ्या तळ्यात नुसता गाळंच दिसत व्हता. पाणी खूप लांबवर गेलं व्हतं दरवर्षीच्या मानानं तळ्यात आर्धसुद्धा पाणी नव्हतं. गणूनं लगबगीनं बैलं पाण्यात न्हेले अन त्यानं बैलाला पवनी घातली. गरज्या अन हिऱ्या दोघांचाही रंग पांढरा असल्यानं पाण्यातून भाईर आल्यावर दोघंबी पांढरेशिपट दिसू लागले. त्यांच्या अंगावर कुठलाच शेणामातीचा डाग दिसत नव्हता. उद्या

पोळ्याचा सण म्हणून दोघंबी खुशीत व्हती. उद्या आपली मिरवणूक निघणार हे त्यान्ला बी म्हाईत व्हतं. गणूनं बैलायला पाण्यातून भाईर काढलं. तळ्यापासून गणूचं शेत खूप लांब व्हतं. वरलाकडच्या शिवारात जायचं म्हणलं की गावा भाईरचा चौक वलांडूनच पुढं जावं लागायचं.

बैलं चौकाच्या जवळ आले अन गरज्याला समोरून येणारा खलश्या दिसला. गरज्या पळतच सुटला थेट खलश्याच्या अंगावर. गणू त्याच्या मागं हाकलण्यासाठी पळाला, तंवर गरज्या खलश्या ची टक्कर लागली व्हती. दोघांचीबी टक्कर अशी जुपली की कुणीच मागं सरकायला तयार नाही. गणू गरज्या ला हाकारु लागला पण गरज्या चं लक्ष त्याच्याकडं अजिबात नव्हतं. गणू खलश्याच्या मालकाला नामूला म्हणाला, एं नाम्या आरं हाण की तुझ्या बैलाला. तुझ्या बैलाला बघून गरज्या चवताळलाय. तुझ्या खलश्याला हाकार रं, तसा नामू सुद्धा गणूला म्हणाला, तूच हाकाल तुझ्या गरज्याला, त्योच आलाय खलश्यावर गणू स्वतः लाच म्हणू लागला, 'मायला काय ह्या बैलाची दुश्मनी हाय कुणाला ठावं, एवढ वैर कुठूंन आलं कुणाला म्हाईत'.

गर्दी जमू लागली कुणीच मागं सरकायला तयार नव्हतं माणसा-माणसातलं भांडण असलं तर माणसाला त्याच्यात पडून सोडविता तरी येतं. चार गोष्टी समजावून सांगता येतात. पर इथं ह्या बैलाला कुणी सांगावं. अंगावर कितीबी काठ्या पडल्या तरी त्यांच लक्ष अजिबात इकडं - तिकडं जात नव्हतं. आखाड्यात जसं दोन पैलवानात कुस्ती लागावी अन कुणीच मागं सरकू नये, डाव चांगलाच रंगात यावा तशी ह्या दोन बैलाची टक्कर चांगलीच रंगात आली व्हती. प्रत्येकजण आपआपल्या परीनं ह्या दोन बैलाच्या भांडणाचं कारण शोधू लागला व्हता. एवढ्या वेळात गावातली तरणीबांड पोरं हातामंदी मोबाईल शुटिंगचे कॅमेरे घेऊन पुढे सरसावली. मधूनच एकाचा आवाज आला, एं हाणम्या जरा बाजूला सरक की, आरं लाईव्ह शूटिंग चालू हाय फेसबुकला, काय मजा यायल्याय राव. पैसे दिऊन सुदीक असा डाव बगायला मिळाला नसता. गर्दीतून दुसरा आवाज आला, खलश्या - गरज्या कोण जिकल ?लावा शंभर अन मिळवा दोनशे. कुणीतरी टक्करीवर सुद्धा सट्टा लावला व्हता पोरांनी सट्ट्या मध्ये पैसे सुद्धा टाकले. कोण जिंकल ह्याची पोरांमध्ये चर्चा सुरु झाली. सितू इज्याला इचारू लागला, कोण जिंकल रं ? गरज्या का खलश्या? मला तर वाटतंय गरज्याच जिंकणार. कसला तगडा गडी हाय. तसा दुसरा त्याला उत्तर देत म्हणाला, अन खलश्या काय कमी हाय व्हय ? खलश्या जमू देणार न्हाय गरज्याला. लोकांच्या तोंडून वेगवेगळ्या चर्चा येऊ लागल्या. गणूला तर काहीच सुचंत नव्हतं. हिऱ्या तिथंच शांत उभा व्हता. तो देखील आपल्या साथीदाराचा पराक्रम बघू लागला. काय केल्यानं दोघांची टक्कर सुटंल याचा विचार गणू करू लागला. त्याचे सगळे प्रयत्न फुकट केले. बैलं काही ऐकायला तयार नव्हते. नामुनं बरेच प्रयत्न केले पण त्याचा बी काई उपयोग झाला न्हाई. टक्कर लागली टक्कर लागली

म्हणून सगळ्या गावात बातमी पसरली. गावातली चिल्लर पार्टी लहान मोठे सगळेच जण टक्कर पाहायला चौकात आले. गरज्या अन खलश्या वर कितीतरी काठ्या मोडल्या पण दोघेही मागं सरकले नाहीत. दोघांची टक्कर सोडायच्या अनेक युक्तृया गावातले लोक करू लागले.

बैलाच्या टक्करीची बातमी ऐकून शामराव सुद्धा तिथं आले. त्यांनी बघितलं तर बैलं मागं सरकनात. शामरावानं गणूला इचारलं, गणू ह्याच्या आधी कधी दोघांची अशी टक्कर लागली व्हती का ? न्हाई तात्या, कधीच न्हाई. गणूनं उत्तर दिलं. मायला ह्याच्या आधी मी कधीच असली टक्कर अन असलं भांडण बघितलं नव्हतं आत्ता काईतरी करायला पाहिजे. तात्या बोलून गेले. गरज्या अन खलाश्याचं धुतलेलं अंग माताडाने पार भरून गेलं व्हतं. खांदेमळणी च्या दिवशी दोघांनी अशी माती मळणी खेळली व्हती. गणू च्या डोस्क्यात एक गोष्ट आली अन पटकन तो म्हणाला, तात्या, काल खलश्या ढवळीला पडकात ढुसण्या देऊ देऊ मारत व्हता हे गरज्यानं बघितलं व्हतं. काल मी नाम्याच्या शेताजवळून बैलगाडी आणत व्हतो तवा ही सम्द घडलं. गणूनं काल घडलेली घटना तात्याला सांगितली. तात्यांनं नामूला बोलविलं अन सांगितलं, पटकन जा अन ढवळीला घिवून ये. त्याच्या शिवाय टक्कर सुटायचा वाण दिसत न्हाई. नामू एक जनाच्या मोटार सायकलवर बसला अन गावातल्या त्याच्या कोठ्यावर आला. ढवळीला सोबत घेतलं अन पळतच गावातल्या चौकात आला. गणूनं लांबून आवाज दिला, ढवळे ये, ढवळे ये. गरज्याच्या कानावर ढवळी हा शब्द पडला तसं गरज्याचं लक्षं विचलित झालं. त्यानं वर बघितलं तर ढवळी पळत येत व्हती. गरज्यान खलश्याला सोडलं, पळत सुटला अन थेट ढवळी जवळ जाऊन उभा राहिला. सगळ्यांनी एकच सुस्कारा सोडला. सुटली एकदाची टक्कर. तात्याची युक्ती फळाला आली. तात्या गणू ला सांगू लागले, आज दोन महिन्यानं दोघां माय लेकराची भेट झाली. तू दोन महिन्याखाली ढवळीला नामूकडं ईकून टाकलंस अन माय लेकराची ताटातूट केलीस. काल माईला जवा खलश्या मारत व्हतां तवा गरज्याला काई करता आलं न्हाई. त्याचा राग गरज्याच्या मनात पक्का बसला व्हता. आज खलश्या तावडीत सापडला म्हणून गरज्या त्याच्या अंगावर चवताळून गेला. खलश्याला त्यानं घोळशीलं अन मायला मारल्याचा बदला घेतला. तसा गणू म्हणाला, तात्या खरंच माणसामंदी लेकराला खरचटलं तर माई च्या काळजाला लागतंय, तीच लेकरं पुढी चालून माईला मारायला सुद्धा कमी करीत न्हाईत. पर इथं ह्या बैलात... माईला मारलेलं बघितलं म्हणून गरज्यान पिटाच केला की. चांगला बदला घेतला. चला, घेऊन जातो आता गरज्याला. नामू खलश्या व ढवळीला घेऊन निघून गेला. गरज्या व हिऱ्याला घेऊन गणू सुद्धा निघाला, तवर चौक रिकामा झाला व्हता. ■

वानराने एकदम खिरिच्या भांड्यावर झडप घातली व भांड्यावर झाकलेलं झाकण बाजूला सारले तर काय! शिजून मऊशार झालेली चमचमीत गुळधाव रंगाची खीर शिजून कोमट खाण्यालायक झाली होती. एव्हाना मांजर मात्र लवकर आली नव्हती. खीर पाहून प्रत्येकजण म्हणजे वानर, गाढव व उंदीर हे जिभल्या चाटू लागले.

# जुना खड्डा नवं झाड



**विश्वंभर वऱ्हाड**
ज्येष्ठ साहित्यिक,अंबाजोगाई

वानर, गाढव, मांजर व उंदीर एकदा एका जंगलामध्ये फिरत असताना योगायोगाने एकत्र आले आणि गप्पा मारत बसले. गप्पा रंगत असतानाच मांजरीला अचानक जुनी आठवण झाली. तिला तिचा पुर्वजन्म आठवू लागला. _ तुम्हाला आठवतं का आपण फार...फार वर्षापूर्वी एकदा एकत्र सामुदायिक पद्धतीने खीर शिजवून खाल्ली होती. हो... आणि ती खीर तू एकटीने चोरून खाल्ली होती असे उंदीर मध्येच म्हणाला...हे प्रामाणिकपणाणे कबूल करत मांजर पुढे म्हणाली, म्हणून तर तेव्हापासून ही मानव जात मी दिसता क्षणीच खीर खीर...क्षीर-क्षीर...म्हणत म्हणत छिर-छिर असं म्हणून झिडकारतात. 'चोरटी' असा टीच्चा पडल्यामळे अविश्वासाने मला घरातून हाकलून देतात. याप्रकारे हा मला लागलेला डाग अजूनही निघालेला नाही. तरीपण मी आता कोणाच्या घरात गुपचुप शिरत नाही. मडऊ अर्थात 'मै आडऊं' अशा स्वरुपाची भाषा वापरुन परवानगी घेतल्या शिवाय घरात शिरत नाही.

'' मला काही आठवत नाही बुवा...पुन्हा कोणी सविस्तर सांगितले तर बरे होईन'' या गाढवाच्या विनंतीला मान देवून वानर परत का त्यांच्या पूर्वस्मृती जागृत करत पूर्वानुभवाची कथा सांगू लागले....फार-फार वर्षापूर्वी म्हणजे अगदी सत्ययुगातच म्हणाना हो यागोष्टीच्या दरम्यान दोन युगे पार पाडली. आपण सर्वजण फिरावयाला आलो असता एकत्र आलो होतोत. फिरून आपणा सर्वांना भूक लागली होती. म्हणून आपण सर्वांनी मिळून खाण्याची योजना आखली होती. त्याकरीता प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे जमेल तसे सहकार्य केले होते. मांजरीने विरजण्यातील ताजे गरम दूध _ आणले होते. उंदीर दादाने तांदूळ व काडीपेटी आणली होती, गोपाळ शेठ (गाढव) ने वाण्याकडून

गुळ व कुंभार दादाकडून मडके आणले होते, तर मी स्वतः झाडावरून लाकडे काढली होती.

तुम्हाला का? खीर शिजवून पूर्ण झाली होती पण थंड होईपर्यंत आपण फिरण्यासाठी बाहेर गेलो होतोत. पण या मनुताईला खीर खाण्याचा मोह आवरला नाही. म्हणून आपण सर्व जण फिरण्याचा आनंद लुटीत असतानाच खीर खाण्याच्या हेतूने मांजर एकटी परत आली होती व तिने संपूर्ण खीर खाऊन फस्त केली होती आणि ती साळसूदपणे परत फिरायला निघून गेली होती. मग आपण सर्वजण फिरणे झाल्यानंतर एक-एकजणं परत येऊन पाहतो तर काय! भांड्यात खीर नव्हती. यावेळी खीर खाऊन पुन्हा फिरायला गेलेली मनुताई थोडी उशीरा सावकाशपणे फिरून आली होती. जणू की, मी नाही त्यातली.......!

खीर कोणी खाल्ली? कोणी खाल्ली? अशी ओरड सुरू झाली. कोणीच कबूल होत नव्हते. मग ही खीर कोणी खाल्ली हे शोधण्यासाठी आपण एक युक्ती योजली होती. ती म्हणजे, गावात जावून एक घागर आणली होती. ती पाण्यावर । पालथी घातली व त्या तरंगत्या घागरीवर प्रत्येकाने उभे राहून प्रतिज्ञा । घ्यावयाची ठरवले होते . ज्याने खीर खाल्ली असेल तो तरंगत्या घागरीवर राहिल्यास घागर बुडेल व तो चोर समजण्यात येईल आणि त्याला शिक्षा दिली जाईल. त्याप्रमाणे प्रथम गाढव पास चढून ओरडून प्रतिज्ञा घेऊ लागले.

हॉ.ऽ.क्...हॉ.ऽ.क् करी..., वरच्या डोंगरी..., मी खीर खाल्ली ती बुड-बुड घागरी,...गाढवाने खीर खाल्ली नव्हती...घागर बुडाली नाही मग उंदीर घागरीवर चढून म्हणू लागला... चिवचिव करी, वरच्या डोंगरी मी खीर तर बुड-बुड घागरी...घागर बुडाली नाही. ठरावा प्रमाणे मग मी ही घागरीवर चढून आत्मविश्वासाने मोठ्याने म्हणालो,

हुप्प...हुप्प करी वरच्या डोंगरी मी खीर खाल्ली तर बुड-बुड घागरी.. तोपर्यंत घागर बुडाली नव्हती याचा अर्थ मांजरीनेच खीर खाल्ली हे सिध्द होत असतानाही मांजर आना-भाका घेवू लागली व म्हणू लागली मी पण खीर खाल्ली नाही. मी तर तुमच्या माघाऊन फिरून आले. हे तुम्हा सर्वांनाच ठावूक आहे. कदाचित असू शकतं की, मांजरी शिवाय वाघ, सिंह, कोल्हा, लांडगा वगैरेंना कोणाला तरी खीरीची चाहूल लागली असेल व त्याने ती खाल्ली असेल. पण ते आता मांजरीच्या प्रतिज्ञेनंतरच स्पष्ट होणार होतं. पण याहीवेळी जर घागर नाही बुडाली तर क्वचितच कोण्यातरी प्राण्याने डाव मारला असे समजल्या जाणार होतं. प्रतिज्ञा घेण्यासाठी तिघांनी मनुताईला आग्रह केला, तिच्यावर दबाव आणला. तसा आपला कायदेशीर करारही होता. मग मांजर मोठ्या जड पावलाने आणि जड अंतःकरणाने घागरीवर चढू लागली, तिचे पाय लटपटू लागले, अंतरमन गुन्हा केल्याची साक्ष देत होते, अखेर ..मॅऊ-मॅऊ करी वरच्या डोगरी. असं म्हणताच हळूहळू घागर पाण्यात बुडु लागली व मांजरीनेच चोरी केल्याचे निष्पन्न झाले आणि सर्वांनी तिचा धिक्कार करून तिला ताडन करण्यात आले.

वानराने हा पूर्व इतिहास सांगीतल्यानंतर सर्वांच्याच स्मृती जाग्या झाल्या व जे पूर्वी झालं ते झालं ते सत्ययुग होते असं म्हणत पुन्हा अणखी अशाच प्रकारे खीर करून खाण्याचा बेत मात्र हे कलियुग असल्याने पूर्वीसारखा तोंडी कराराचा उपयोग चालणार नव्हता. म्हणून त्यासर्वांनी लेखी करार केला व पूर्वी प्रमाणेच ज्याने ज्याने जे जे वस्तु-सामान आणले होते त्याने त्याने याही वेळी त्या त्याच वस्तु आणल्या...त्याची खीर तयार करण्यात आली. पूर्वीप्रमाणेच खीर थंड होईपर्यंत सर्वजणं फिरायला गेले. मागच्यावेळी मांजरीने खीर चोरून खाल्ली तिला चांगलाच धडा मिळाला होता. याची तिला आठवण झाली. ती स्वतःच्या मनात म्हणत होती आपण आता परत अशी चूक करून चालणार नाही...प्रामाणिकपणाने वागले पाहिजे नाहीतर आपणास चोरीचा, भ्रष्टाचाराचा ढब्बा लागेल.

ठरल्या वेळेप्रमाणे एकामागून एक सर्वजणं खीर खाण्यासाठी जमू लागले. याही वेळी असे ना होवो या चिंतेने व शंकेने प्रत्येकजणं भांड्याकडे सरकत होती. वानराने एकदम खिरिच्या भांड्यावर झडप घातली व भांड्यावर झाकलेलं झाकण बाजूला सारले तर काय! शिजून मऊशार झालेली चमचमीत गुळधाव रंगाची खीर शिजून कोमट खाण्यालायक झाली होती. एव्हाना मांजर मात्र लवकर आली नव्हती. खीर पाहून प्रत्येकजण म्हणजे वानर, गाढव व उंदीर हे जिभल्या चाटू लागले. इतक्यात वानर मागचेवेळी सत्ययुगात मांजरीने खीर खाऊन फस्त केली होती. आपणास काहीच मिळाले नव्हते. आता मांजर येईपर्यंत आपण खीर खायला काय हरक. ते सर्वांना पटले. पटले म्हणजे काय? स्वार्थाची बाब कोण नाही? माकड, उंदीर व गाढव या तिघांनी खिरीवर ताव मारला व खिरीच्या भांड्यावर झाकण ठेऊन परत जंगलात फिरायला जाण्याचे नाटक केले. जरावेळाने भुकेने खडबडलेली मांजर जिभल्या चाटत खीरीच्या स्थळाकडे निघाले. आता गेल्यावर सगळे मिळून खिरीवर ताव मारणार आहोत असे मनात मांडे खान चालूच होते. मांजर एकदाचे खिरीच्या भांड्याजवळ आले. पण सर्वांच्या साक्षीने खिरीचे भांडे उघडे केलेले बरे या हेतूने तिने भांड्याला स्पर्श देखील केला नाही. थोड्याच वेळात सर्वजणं झाले. वानराने भांडे उघडले मांजरीने आत डोकाउंन पाहिले तर काय भांड्यात खीरीचा कण देखील नाही! मांजर काळवंडून बसले. खीर कोणी खाल्ली?... कोणी खाल्ली?... एकच गलका सुरू झाला. सर्वजणं परत मांजरीलाच दटावू लागले. याही वेळेस तूच खीर खाल्लीस! असा आरोप करु लागले. मांजर गयावया करत होती ! म्हणाले नाही मी मुळीच खीर खाल्ली नाही. मी कसलीही शपथ घेत. वाटल्यास पहिल्या सारखेच घागरीच्या निवड्या प्रमाणे प्रथम मी घागरीवर उभी राहुन प्रतिज्ञा घेते. मग कळेल यावेळेस कोणाच्यावळा घागर बुडते तर...!

घागर आणण्याचे मांजरीने सुचवले. प्रत्येकजण एक दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहु लागले. अखेर त्या तिघांनीही घागर आणण्याबाबत मांजरीला कडाडून विरोध केला. मग मांजर घागर आणावयास गेली घागर आणली, ती खोल ढोहात पाण्यावर पालथी घातली.। प्रत्येकाला घागरीवर उभे राहून शपथ

घेण्याचे आव्हान करू लागली पण कोणीच जागचे हलले नाही. अखेर मांजर स्वतः होऊन प्रथम पाण्यात शिरून घागरीवर उभे राहून मोठ्याने म्हणू लागले, म्याऽऊ म्याऽऊ करी वरचे डोंगरी मी खीर खाल्ली तर बुडबुड घागरी यावेळी गुन्हा केला नव्हता, खीरीकडे ढुंकून देखील पाहिले नव्हते. घागर हलली नाही की डूलली नाही. शांतपणे मांजरीसगट पाण्यावर तरंगत होती. कारण मांजर निर्दोष होती. आता बाकी तिघांना शपथ घेण्यासाठी मांजर आग्रह करीत होती. वानर, उंदीर व गाढव एकमेकांना मतले व पाण्यात जाऊन घागर बाहेर काढली. एक मोठा दगड बघून दगडावर घागर आदळून तिचे तुकडे तुकडे करून मांजरीच्या अंगावर फेकले. हे योग्य नाही. गुन्हेगारास शिक्षा व्हायलाच पाहिजे, न्याय मिळाला पाहिजे. ही लोकशाही आहे. तुमची गाढवशाही की माकडशाही नाही. कान, मिशा, अन् शेपूट ताठ उभे करत मांजर ओरडत होती आणि हे निरावलेले तिघेही मांजरीची खील्ली उडवीत होते. मध्येच गाढव मांजरीवर म्हणाले,....लोकशाहीची भाषा करणारे मांजरे, तुला माहित नाही का? लोकशाहीत एका जास्त मताने उमेदवार निवडून येतो, कौल मिळतो, न्यायनिवाडा होतो. इथं तर तीन मतं ठणकाऊन सांगतात की तूच खीर खाल्लीस म्हणून. मी लोकशाही चांगली समजतोय, लोकशाहीला जवळून पहातोय, आता लोकशाही आणि न्याय आमच्या मतावर चालतोय, आम्ही लोकशाहीला कोळून पितोत. लक्षात ठेव असे म्हणत गाढवाने एका लाथेस मांजरीला उलथे-पालथे केले.

मांजरे याही वेळी तूच खीर खाल्लीस विचार सर्वांना उंदीर म्हणाला...तोवर माकड व गाढवही उंदरालाच साथ देत म्हणाले....

''हो...हो... ऊंदीर बरोबर व सत्य बोलत आहे. मांजरे तूच खीर खाल्लीस...'' मांजर शपथ घेण्याविषयी आग्रह धरत असतानाच वानर म्हणाले,

''ए. टवळे, बऱ्या बोलाने चालती हो..आलीस कुठली दीडशहाणी म्हणे शपथ घ्या..'' असे म्हणत वानराने तर तिच्या शेपटीला गरगर फिरवले व भिरकाऊन दिले....

बिचारं मांजर... गरीब मांजर... ताटाखालचं मांजर... निर्दोष मांजर तिला गरीब बिचारीला कोण न्याय देणार ?... दाद तरी कोणाकडे मागावी...

पहिल्यावेळी एकट्या मांजरीने खीर खाण्याचा गुन्हा केला होता. तिघे गुन्हेगार होते, लुच्चे होते, भ्रष्ट झाले होते, गुंड बनले होते अनितीचे पारडे पंचाहत्तर टक्क्याने जड झाले होते.... गुन्हेगारांची संख्या तीन तर इमानदार एक... पंचाहत्तर टक्के अनितीपुढे पंचवीस टक्के नियती कशी तग धरेल ? हेच ते अनेक पिढ्यातील अंतर... अनेक पिढ्यांच्या संस्कृतीतील अंतर व याचे प्रमाण पंचाहत्तरःपंचवीसम मांजर दिलगीर होऊन कान व शेपुट खाली घालून कसलाच धोका न पत्करता, झाकल्यापाठीने निपचीत निघून गेले व घोकत राहिले....आता गुंडाचे राज्य आले...मवाल्यांचे राज्य आले...! तिथे माझ्यासारख्या मांजराचे काय चालणार ?..... ■

आता मात्र ती थकली होती तिने बसस्टँडच्या बाजूकडील झाडाकडे आपला मोर्चा वळवला. माझी गाडी ६:३० होवूनही लागली नव्हती. कंट्रोल रुमशी संपर्क केला. तेव्हा उत्तर मिळालं ६:३० ची वेळ आहे, पण गाडी अंबाजोगाईवरुन येईल तेव्हाच जाईल. मग मी मनातल्या मनात आनंदी आनंद म्हणत पुढे सरकलो. झाडाच्या दिशेने नजर टाकली तर ती मुलगी एका वृध्द माणसाच्या शेजारी बसली होती. तो म्हातारा कदाचीत तिचा बाप असावा ती त्याला गाडीकडे बोट दाखवत रडत होती.



# आपुलकी

**प्रा.डॉ.देविदास खोडेवाड**
मराठी विभाग,
खोलेश्वर महाविद्यालय,अंबाजोगाई

माया, आपुलकी आणि प्रेम हे जात, धर्म, वंश वा गरीब-श्रीमंत पाहून फुलत नाही. या पैसा-संपत्तीपासून मिळत नाही तर ते मानवाला वा कोणत्याही जीवाला जन्मजातच मिळते. याचा प्रत्येय मला परवा एका प्रसंगावरुन अनुभवायास आला, खरतर मानवाचा स्वभाव, त्याची समाजाकडे पाहण्याची दृष्टीही, तो ज्या समाजात - परीसरात वावरतो त्यावरुन आकाराला येतो आणि अशा वेगवेगळ्या अनुभवाची गाठोडे त्याला सापडतात तेव्हा ती बहरत जाते. आज जग बदलत आहे. माणसं माणसापासून दूरावत आहेत. मोबाईलच्या युगात व्हॉट्सॲपच्या ग्रुपवर आपल्या गरजा व विचार व्यक्त करुन मोकळा होत आहे. हस्तांदोलन, गळाभेट सारं काही विसरुन गेला आहे. मात्र मी पाहिलेल्या प्रसंगाने माझ्या हृदयाला पुरता पिळ पडला. आपण पैशाच्या संपत्तीच्या मान-सन्मानाच्या मागे लागून जी खरी आनंदाची जागा, माणसं आहेत ते निरगट्ट मनाने विसरत चाललो आहोत, याचा प्रत्येय या प्रसंगाने मला आणि माझ्या हृदयाला आला. माया-आपुलकी आणि प्रेम यांची जाणिवही झाली.

मी परवा अहमदपूर (जिल्हा-लातूर) या बसस्टॉपवर अंबाजोगाईच्या गाडीची वाट पाहत उभा होतो. तशी वेळ सायंकाळ ६:०० ची. माझी गाडी ६:३० ला लागणार असं कंट्रोल रुमच्या

प्रमुखानं सांगितलं म्हणून मी एका ठिकाणी न थांबता माझ्या सवईप्रमाणे बसस्टँडमधील माणसं, परिसर न्याहाळीत होतो. लोक आलेल्या गाडीवर मेलेल्या जनावरावर तुटून पडलेल्या कुत्र्याप्रमाणे झोंबाझोंबी करीत होते. कुणी ड्रायव्हरच्या सिटकडून चढून जागा धरत तर कुणी बॅगा-गमजे आणि कोणी लहान लेकरं खिडकीतून टाकून जागा मिळवत होते. तर वृध्द माणसं आपलं काहीच चालत नाही म्हणून गाडीकडे दुरूनच गर्दीचा कानोसा घेत होती. हे सारं मी दूरुनच पाहत होतो खरं तर हे सारं मजेशीरच होतं. हे महाराष्ट्राच्या परिवहन विभागाच्या दारिदयाचं ओंगळवाणं दर्शन होतं. कोणी आनंदात तर कोणी दुःखात आणि हे सारं असच चालायचं म्हणून मी माझा मोर्चा दुसरीकडे वळला. तितक्यात एक भिक मागणारी तरुण मुलगी त्या गाडीकडे धावत येवून उतरणाऱ्या माणसांची चेहरे न्याहळू लागली. एक-एक पाय पुढे सरकावीत होती, आणि उतरणारी मानसं संपलेली पाहून एक पाय जोरात जमिनीवर आपटत रागाने परत फिरली. तसी ती १८-२० वर्षातली असावी. काळाकुट्ट रंग, मळकट-कळकट शर्ट, हाफ चड्डी घातलेली केस मुलांसारखेच लहान, पाय अनवाणी, हात थोडे वर करुन चालताना पोटमोहरी आकृती. एखाद्या तरुणासारखी. मुलगी म्हणून ओळख ती फक्त नैसर्गिक छातीवरची फुगवटे इतकीच.

मी विचार करत बराच वेळ तिच्या बारीक-सारीक हालचाली न्याहळत होतो आणि मनालाच प्रश्न करीत होतो की, ही मुलगी कोणाची बरं वाट पाहते ? का ती हारवली, रस्ता चुकली, प्रवासात भरकटलीतर नसावी ? का कोणी तीला भेटायला येत आहे? काहीच कळत नव्हतं अनेक गाड्या येत होत्या, जात होत्या ती पुन्हा धावत जायची आणि पुन्हा तीच कृती जमिनीवर एक पाय आदळून परत फिरायची.

आता मात्र ती थकली होती तिने बसस्टँडच्या बाजूकडील झाडाकडे आपला मोर्चा वळवला. माझी गाडी ६:३० होवूनही लागली नव्हती. कंट्रोल रुमशी संपर्क केला. तेव्हा उत्तर मिळालं ६:३० ची वेळ आहे, पण गाडी अंबाजोगाईवरुन येईल तेव्हाच जाईल. मग मी मनातल्या मनात आनंदी आनंद म्हणत पुढे सरकलो. झाडाच्या दिशेने नजर टाकली तर ती मुलगी एका वृध्द माणसाच्या शेजारी बसली होती. तो म्हातारा कदाचीत तिचा बाप असावा ती त्याला गाडीकडे बोट दाखवत रडत होती. आणि म्हातारा तिला गप्प करण्याचा प्रयत्न करत होता. म्हाताराही तसाच डोक्याचे, दाढीचे केस वाढलेला. तीन-चार गाठोडे सभोवताली, एकापाय लंगडा आणि एक हात गळ्यात बांधलेला तो कोठेतरी अपघातात जखमी झालेला असावा.

मुलीने पुन्हा झाड सोडलं, मुलगी ऐकत नाही म्हणून बापही गोठोडे सावरत तिच्या पाठीमागे जात होता. त्याला ही चालनं कठीन होतं. अंधाराची वेळ होती. बसस्टँडमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या

गाड्यांची गर्दी वाढली होती. फेरीवाले, गाड्यांच्या आवाजाने गोंगाट चालला होता. मध्येच हा म्हातारा जोरजोराने सुंदराऽऽऽ.. सुंदरा ऽऽऽ हाका मारत होता. मध्येच मुलगी दिसेनासी झाली, तेंव्हा म्हातारा कन्हत कन्हत पुढे झाला. माझीही धांदल उडाली बराचवेळ झाला म्हणून आपल्या गाडीची चौकशी केली तर काय? कंट्रोलर म्हणाला, 'काय साहेब आताच गाडी गेली की, आता ८:०० वा. मी शांतपणे हे वाक्य ऐकलं आणि पुन्हा त्या मुलीकडे मोर्चा वळवला. ती पुन्हा अंधारातून कानोसा घेत गाडीतली माणसं न्याहळीत होती. म्हाताराही तिच्या पाठीमागे थांबून तिला समजावत होता पण ती ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. मला पुन्हा-पुन्हा वाटत होतं. त्यांना विचारलं काय शोधताय?, कोण येणार आहे? पण मन काही तयारी करत नव्हतं. थोडं पुढं सरकलो आणि त्यांची केविलवाणी अवस्था पाहूण त्या म्हाताऱ्या बाबाला म्हणालो, तुम्ही कोणाची वाट पाहताय ?'

म्हातारा किलकिले डोळे वासून माझ्याकडे पाहत मुखातून बोलण्याच्या प्रयत्न करु लागला. पण त्याला बोलता येत नसावे, तो मुका असावा, त्याने एक हात गाडीकडे व एक हात मुलीच्या डोक्यावर ठेवत मला इशारा केला. तो इशारा मला कमी पण मुलीला जास्त कळला ती जोरजोरात रडू लागली. माऽऽ माऽऽ करत एकदा माझ्याकडे आणि एकदा गाडीकडे पाहू लागली. कदाचीत तिही मुकी होती. मी हे सारं जवळून पाहिलं पण ते माझ्याही आकलनाच्या पलिकडचं होतं. त्यांचं दुःख माझं कधीही होणार नव्हतं, तरीही मी आणि माझा पाय तेथून सरकत नव्हता. इतक्यात माझा फोन खनानला. तो मी कानाला लावताच पलिकडून आवाज आला, 'कधी पासून निघालात घरी यायचं की नाही ?'

मी तसा त्या मुलीच्या व्याकुळतेतून पुरता गहीवरलो होतो, स्वतःला सावरत म्हणालो,

''गाडी लागलीच नाही ५:०० वाजल्यापासून स्टँडवर आहे''

''असं कसं शक्य आहे?''

''आपल्या भारतात शक्य आहे, ६:३० ची गाडी कॅन्सल झाली''

''लवकर यां''

असा मी हो म्हटलं आणि गाड्या कॅन्सल होनं सततचं असतं, ते माझ्यासारख्या माणसासाठी किती चांगलं खोटं बोलणं सोपं जातं हे वाक्य मनातच बोलत मी पुन्हा त्या मुलीकडे मोर्चा वळवला तर काय; एका गाडीच्या खिडकीतून ती आत पाहत उड्या मारत होती. आनंदाने किंकाळ्या मारत, एकदा गाडीकडे आणि एकदा म्हाताऱ्या बाबाकडे धावत होती. हे सारे दश्य पाहन मलाही माहित नसलेल्या गोष्टीचा आनंद झाला. मी पुन्हा पुढे सरकलो तर काय त्या गाडीतून एक बाई उतरली ती काळी कुट्ट, पण नव्याकोर लाला साडीत, पदर डोक्यावरुन, विस्कटलेले केस, पदर

घट्ट ओढून दाबत होती. कपाळावर मला मोठं कुंकु, नाकात विकतकरीचीच पण भली मोठी नथ, पायात स्लीपर घट्ट घातलेली, हातात छोटीशी पिशवी तसं हे कुटुंब भिकारी नव्हतं पण, परिस्थितीने रस्त्यावर आलेलं असावं. ती कोणाला तरी भेटायला गेली असावी आणि तिला नवी कोरी साडी केलेली असावी असाच हा सगळा हा प्रकार.

ती प्रवाशांना सारीत खाली उतरली, तिकडून मुलगी धावतच येऊन गळ्याला पडली आणि माझा जीव भांड्यात पडला. मुलगी आनंदाने बागडत होती. तिच्या मायनं तोंड भरुन पापे घेतले. पिशवीतून बिस्कीटचा पुडा काढून दिला. ती हातातली पिशवी घेत मुलगी बापाकडे हात दाखवत खिदळत होती. म्हाताराही गाठोडे सांभाळत - सांभाळत पुढे-पुढे येत होता. मी ते माय-लेकीचं प्रेम डोळे भरुन पाहत होतो. गाडीकडे पाहून पाय आपटनारी मुलगी हासत दोघांचेही हात धरुन स्टँडबाहेर पडत होती. मी त्यांची पाठमोरी आकृती पाहत एका अथांग सागरासारख्या प्रेमाकडे पाहत उभा होतो. आपुलकी, माया आणि प्रेम, धन-संपत्तीत मिळत नाही. प्रिती मिळेल काहो बाजारी प्रिती मिळेल काहो शेजारी, या काव्यपंक्तींचा अनुभव घेत शांतपणे उभा होतो. तशी ८:३० ची वेळ झाली शेवटची अंबाजोगाई गाडी निघाली असा गजर माझ्या कानावर पडला आणि मी सावध होवून गाडीकडे वळालो तर काय गाडी भरुन फुटल्यासारखी भरली होती. तसाच दारात थांबून निघालो. त्रास तर होणार होता पण आलेला अनुभव जन्मभर सोबत राहणार होता ते माय-लेकीचं प्रेम बराच वेळ मनात घोळत होतं. आणि गाडी एक-एक गाव ओलांडत होती.

मन पुन्हा पुन्हा मनाला बोलत होतं. आपली मुलं सुखाशीन जगणारी. त्यांच्या पुढच्या पिढीचा विचार करणारे आपण. पुण्या-मुंबईत त्यांचे शिक्षण व्हावं म्हणून कर्जबाजारी होवून स्वतःच्या जगण्याचा, सुख भोगण्याचा कसलाही विचार करत नाहीत. दुसऱ्यांच्या सुखासाठी आपलं जगणं ऱ्हावून जातो. ही आपल जगणं हिरावून घेणारी कॉन्हेटरी मुलं आपल्या पदरात या मुलीसारखं प्रेम टाकतील का ? छे! सारा जंजाळ, नुसतीच बेगडी प्रतिष्ठा, प्रेम, माया आणि आपुलकी गरीबतच फुलेते, बहरते हे मात्र नक्की ! दोन मनाच्या झगड्यात अंबाजोगाई केव्हा आली कळालेच नाही. माझं मात्र चांगलं आहे दुःखाच्या प्रसंगातही त्याला अनुभवता आपल्याचा आनंद घेतो आणि आनंदात तर आनंदी-आनंद...

■